
शनिवार । २७ एप्रिल ७४ । एक रुपया

# साप्ताहिक माणूस



राखी
दर्द
जागवणारा
आवाज

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : तेरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २७ एप्रिल | अंक : अट्ठेचाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |

# मुख्यमंत्र्यांच्या तालुक्यातील दहशतवाद

जगदीश कदम

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय वसंतरावजी नाईक हे पुसद तालुक्यातले आहेत. मंत्रीमहोदयांचा तालुका पूर्वीपासूनच धाडसी आहे. खुद्द साहेबच एक धाडसी शिकारी आहेत. आदिवासी समजल्या जाणाऱ्या बंजारा समाजात विलक्षण धीटपणा असतो हे सिद्ध करून देणाऱ्या अनेक घटना या तालुक्यात पूर्वी घडल्या आहेत आणि सध्याही घडत आहेत.

पेनगंगेच्या काठावर असलेल्या करोडी, बिटरगाव, पेवा आदि गावाच्या परिसरात वाटसरूंना लुटण्याचे आणि बेदम मारण्याचे सत्र काही बंजारा गुंडांनी सुरू केले आहे. हे गुंड म्हणजे याच भागात असलेल्या बेलखेड, नागापूर या गावचे लमाणी होत. या गुंडांचे नाव घ्यायला लोक कचरतात. कारण 'आमचे नाव जर कोणी उच्चारले तर त्याला ठार करू' अशा प्रकारच्या धमक्या याच गुंडाकडून दिल्या जातात. या गुंडांना अपवादात्मक कुठे पकडलेच गेले तर मंत्र्यांचे वगलबच्चे आणि गुंडांचे दादा त्यांची जामिनावर सुटका करतात.

करोडीच्या शिवारात आजपर्यंत पाचपंचवीस माणसांना बेदम मारण्यात आले. एवढेच नव्हे तर जागलीवर झोपलेल्यांना सुद्धा काही कारण नसताना मार खावा लागला. करोडीचा दत्ता आणि त्याचे दोन सोबती, बिटरगावचे आनंदराव पाटील आणि इतर चारजण, मनुल्याचे टोपाजी जाधव आणि त्यांचा मुलगा अशा कितीतरी जणांना आपल्या शेतात झोपले असता बंजारी दहशतवाद्यांनी झोडपून काढले आणि वरचेवर काढीतच आहेत.

याच बंजारा गुंडांनी वाटसरूंना लुटण्याचा प्रकार चालविला आहे. कोणाची सायकल, कोणाचे घड्याळ तर कोणाचे जवळ असेल ते सामान हिसकावून घेऊन त्याला नरम करून सोडण्याचा चंगच या गुंडांनी बांधला आहे. त्यामुळे दिवसा-ढवळ्या एक दोघाला प्रवास करणे कठिण झाले आहे.

परवा रईच्या दुकानदाराला तोंडावर शाल टाकून बेशुद्ध होईपर्यंत मार दिला आणि त्यांचे संपूर्ण दुकान लुटून नेले. या चोरी प्रकरणात १८ बंजारा गुंडांनी चोरी केल्याचे कबूल केले असे समजते.

याच बंजारा गुंडांच्या साथीदारांनी पोफाळी साखर कारखान्याजवळच असलेल्या गंगनमाळातून अस्सल सागवानी लाकडे चोरण्याचा नित्यनियमाने धंदा सुरू केला आहे. रखवालदाराच्या हातातील घड्याळ किंवा जवळ असलेले सामान हिसकावून घेऊन त्याला मार दिला जातो आणि 'जर आमची नावे तू कोणाला सांगितलीस तर तुझी नोकरी जाईल' अशी धमकी दिली जाते.

सागवानी लाकडाप्रमाणेच गावरान दारूची विनापरवाना खुल्लमखुल्ली विक्री करण्यात यांनी बरीच प्रगती केल्याचे समजते. आम्हाला नाईक सरकारकडून संपूर्ण अधिकार मिळाले आहेत असे ते बिनदिक्कतपणे बोलून दाखवितात. बिचारी भोळी, भित्री जनता या गुंडांच्या वर्चस्वाखाली चिडीचूप बसते आणि त्यांचे वर्चस्व मुकाटपणे मान्य करते. पण अन्यायाची सीमा संपल्यामुळे आज माहिती असलेला प्रत्येक नागरीक या गुंडांची बिंगे फोडीत आहे.

येळंब या गावच्या शिवारात नुकतेच एका अज्ञात इसमाचे प्रेत सापडले. जवळ जवळ पाच ते सहा दिवस ते प्रेत एकाच जागेवर सडत पडले होते. शिरडजवळ आणखी कोण्यातरी व्यक्तीचे रक्ताने माखलेले कपडे सापडले. परिस्थितीची पाहाणी करण्याच्या दृष्टीने मी आणि माझे दोन विद्यार्थी मित्र निघालो असता गुंडांनी आमचा पाठलाग करून अर्ध्या वाटेतूनच परतवून लावले. त्यामुळे 'मानवत प्रकरणाची' आठवण होऊन लोक भीतीने कचरून जात आहेत आणि जर का यापुढे आणखी काही विपरीत घडले तर या भागातील सर्व जनता बंजारी गुंडाकडे बोट दाखवील याची जाणीव ठेऊनच संबंधितांनी पुढचे पाऊल उचलावे.

मानवतेला फासावर चढवून नीतिमत्तेचे मंदिर ढासळवणारा आणखी एक किळसवाणा प्रसंग नुकताच उमरखेड जवळ घडला. एक म्हातारी स्त्री आणि तिच्या सोबत असलेल्या दोन मुली ह्या

गोवऱ्या वेचण्यासाठी शेतातून फिरत असताना काही गुंडांनी त्यांच्या-वर अचानक हल्ला चढवून त्या दोन मुलीची सर्व वस्त्रे जबरदस्तीने फेडून घेतली आणि त्या साठी ओलांडलेल्या म्हातारीच्या कासोटचाला हात घालून विष्टाखाऊपणा केला हे काम बंजारी गुंडाचेच आहे असे आसपासचे लोक बोलत आहेत.

उमरखेड, पुसद, हदगाव या परिसरात एवढे घबराटीचे वाता-वरण निर्माण झाले असूनसुद्धा पोलीस संरक्षण मिळत नाही ही गोष्ट अत्यंत खेदजनक आहे. वसमतसारख्या खेडचात मुलाखतीसाठी आलेल्या उमेदवारांवर गोळीबार करण्यास या सरकारची पोलीस यंत्रणा एका पायावर तयार असते. पण भर दिवसा लूटमार करणाऱ्या, दरोडे घालणाऱ्या, दारू पिऊन नंगा नाच करणाऱ्या, स्त्रियांना नागवे करणाऱ्या गुंडांविरुद्ध हीच पोलीस यंत्रणा मूग गिळून बसते. असे का व्हावे? साप निघून गेल्यावर फरकंडीला मारीत बसण्यात ही पोलीस यंत्रणा कुठला शहाणपणा दाखविते? या भागात एवढे वातावरण तंग असताना वेळीच तपास का सुरू करू नये? या मागे दोन कारणे पर्यायाने उद्भवतात. एक तर पोलिसांचा हलगर्जीपणा आणि दुसरे कारण म्हणजे त्यांच्यावर असलेल्या एखाद्या बड्या धेंडाचा दबाव.

या दोन कारणाने पोलीस यंत्रणा आपल्या षंढत्वाचे प्रदर्शन वारं-वार करीत असल्याचे दिसून येते. मानवतसारख्या प्रकरणाने याचा प्रत्यक्ष पुरावाच उपलब्ध करून दिला आहे.

एखाद्या मंत्र्याच्या संरक्षणासाठी परगावाहून पोलीस संरक्षण दल मागविण्यात येते. त्यांच्या केसालाही धक्का लागू नये याची डोळचात तेल घालून खबरदारी घेतली जाते. पण ज्या नागरिकांकडून ती व्यक्ती उच्चपदावर विराजमान होते त्या नागरिकांना कुठल्याही प्रकारचे संरक्षण मिळत नाही. एखाद्या मंत्र्याच्या बायकोला गलतीने चुकून धक्का लागला तर धक्का देणाऱ्या व्यक्तीची आर्जवे धुडकावून देऊन त्याला विनयभंगाच्या आरोपाखाली सजा भोगीत बसावे लागते. आणि इकडे वयात आलेल्या मुलींचे वस्त्रहरण होत असताना कोणीही आवाज उठवीत नाही. प्रत्यक्ष त्या भागातील संबंधित सत्ताधीश 'प्रकरण दडपून टाका' अशी भाषा बोलतात. पुरावा देणारांचे तोंड दाबतात आणि वर धमकीचे लॉक्स बसवितात. याच संबंधीत आमदार-खासदारांना किंवा निवडणुकीच्या वेळी तोंड वासून मते मागणाऱ्या धेंडांना समस्त जनतेने जाब विचारला पाहिजे. या प्रकरणाची कसून तपासणी कर, नसता तुझी आहे नाही तेवढी अब्रू खुंटीला टांगविली जाईल अशी धमकी दिली पाहिजे. प्रत्येक नागरिकाचा संताप भडकला पाहिजे. मूठभर पोलिसांच्या संरक्षणात बसलेल्या बेजबाबदार वृत्तीच्या अधिकाऱ्यांना खुर्चीवरून खाली खेचले पाहिजे. भ्रष्टाचाराचा वास ज्याच्या अंगाला येत असेल त्या अधिकाऱ्याला पाच-दहा जणांनी मिळून भर रस्त्यावर झोडले पाहिजे. मूठभर गुंडगिरांच्या गुंडेशाहीला आळा घालून जनतेचे राज्य जनतेनेच चालविले पाहिजे. □ □

---

# हरिजन महिलांनी कुटुंबनियोजन करू नये ! श्रीमती मुथू यांचा बदसल्ला

तामिळनाडूचे समाजकल्याण मंत्री श्रीमती सत्यवाणी मुथू या दि. १४-४-७४ रोजी मद्रास येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळचाच्या अनावरणाच्या वेळी थोडे ताल सोडून बोलल्या असे वाटते. त्यांनी सांगितले की 'हरिजन महिलांनी कुटुंब नियोजन करू नये. अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी जेवढी जास्तीत जास्त मुले होतील तेवढी हवीत.'

कुटुंब नियोजन करण्याचा उद्देश फक्त अन्नधान्याचे प्रश्न सोड-वायला सरकारला सोपे जावे एवढाच नसून, प्रत्येक जन्मणाऱ्या मुलाचे संगोपन, शिक्षण वगैरे उत्तम रीतीने करावयाची आर्थिक शक्ती पालकांना असावी हाही एक मुद्दा आहे. आपल्या कमाईपेक्षा खर्च जास्त झाला व सर्व पैसा पोट भरण्यातच गेला तर येणाऱ्या पिढीच्या शिक्षण, कपडे, औषध व इतर आवश्यक गरजा तशाच राहून जाणार. मग असली पिढी अन्यायाविरुद्ध काय लढणार?

कुटुंब नियोजन कुठे फसत असेल तर इथेच की, जो मध्यम किंवा उच्च मध्यम वर्गीय आहे, त्याला कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटून ते नियोजनाच्या मार्गाने जाऊन आपले कुटुंब आणखी सुखी करून घेत आहेत. परंतु, ज्यांना खरोखरच कुटुंब नियोजनाची गरज आहे असे बहुसंख्य गरीब लोक त्यापासून दूर आहेत व त्यामुळेच नियोजनाच्या फायद्यास मुकत आहेत व आपले जिणे आणखीन दरिद्री व दुःखी करून घेत आहेत. तर अशा लोकांना आवश्यकता ओळखून कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवावयाचे सोडून एक जबाबदार मंत्र्याने बेजबाबदारीचा सल्ला देणे अत्यंत अयोग्य आहे. त्यांना तामिळनाडू सरकारने वेळीच आवर घालावा व त्यांना मंत्री मंडळातून काढून टाकावे.

हे सर्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळचाचा अनावर-णाच्या वेळी त्यांच्या साक्षीने होत आहे ते त्याहूनही अत्यंत दुःखद आहे. हे येथेच कुठेतरी थांबायला पाहिजे.

रमेश कुलकर्णी, तेरगा

# लोकशाहीत एक दिवस जावेच लागेल !

माहितगार

विधिमंडळ काँग्रेस पक्षात असंतोष नाही, पक्षात व मंत्रिमंडळात फूट नाही असे पत्रकारांना एकीकडे सांगण्यात आले, त्याच वेळी मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक सत्य बोलून गेले, त्यामुळे काँग्रेस पक्षात असलेल्या गटबाजीवर प्रकाश पडला. माणूस भांबावून गेला की त्याच्या हातातून अनेक चुका होतात. अशा चुका होऊ लागतात तेव्हा वस्तुस्थिती अधिक प्रकाशात येते ! 'नेतृत्त्वाविरुद्ध आमदारात असंतोष नाही; दोन गट नाहीत. आमदारांना नेतृत्त्वात बदल नको आहे परंतु वृत्तपत्रातील बातम्यांमुळे तसे वातावरण निर्माण झाले आहे' असे नरेंद्र तिडके यांनी खास चर्चेच्या दुसऱ्या फेरीनंतर पत्रकारांना सांगितले. कोणताही प्रश्न न विचारता पत्रकार शुद्धलेखन लिहून घ्यावे तसे तिडके यांचे वाक्यन् वाक्य लिहून घेतात ! काही पत्रकार चमचेगिरी करण्यासाठी नाईकांच्याकडे जातात. 'साहेब, तुम्हाला काही सांगायचंय!' असे अति नम्रतेने विचारतात. साहेब म्हणतात, 'तुम्ही आमचं कुठं छापता ?' 'आमचं कसं छापाल ?' साहेबांची दोन वाक्येच नरेंद्र तिडके यांच्या निवेदनावर बोळा फिरवून गेली. साहेबांच्याच मनात 'आमचं–तुमचं' आहे. म्हणजे पत्रकार आमच्या गटाचे छापीत नाहीत. त्यांचं म्हणजे विरोधी असलेल्या गटाचे छापतात, असेच स्वच्छपणे श्री. नाईक सांगतात ! नेत्यांच्या मनातच आमचे–तुमचे आहे, तर अनुयायी 'इकडे–तिकडे' विखुरले जाणारच ! असे झाले की असंतोष बाहेर पडू लागतो. वृत्तपत्रात यासंबंधी बातम्या आल्या की मात्र पत्रकार काही तरी राजकारण खेळत आहेत, असे म्हणणे म्हणजे स्वतःला फसवणे आहे. मुख्यमंत्री नाईक यांनी बैठकीनंतर ही वाक्ये उच्चारली, पण त्याच्या आधी–बैठकीला वर जाताना ते पत्रकारांजवळ बोलले तेही महत्त्वाचे आहे. बैठकीला सुरुवात होण्याच्या आधीपासून पत्रकार जमले होते. स्वागतासाठी उभे राहावे अशा पद्धतीने ते लिफ्टजवळ उभे राहिले होते. बैठकीचा वृत्तांत सांगणारा कोणी मिळेल का, हे हेरण्यासाठीही ते तिथे उभे राहिले असावेत ! थोड्याच वेळात श्री. नाईक आले. नमस्कार झाले. काही पत्रकार विनोदाने म्हणाले, 'साहेब, वर यायचं काय ?' 'तुम्हाला यायची गरज काय ? तुम्हाला तर खालपर्यंत ऐकू येतं म्हणे ?' साहेबांनी आपल्या संशयी मनाचा झरोका उघडा केला. 'पण आज लाऊड स्पीकर बंद केलेत–त्यामुळं पंचाईत झालीय !'–पत्रकारांचे उद्‌गार. आता मात्र साहेब स्पष्टच बोलले. 'खाली ऐकू येतं तर बातम्या तिसऱ्या दिवशी कशा आल्या ?' (ज्या बैठकीत नाईकांवर कडाडून टीका झाली त्या भाषणांचा वृत्तांत बैठक झाली त्याच्या तिसऱ्या दिवशी सविस्तर प्रसिद्ध झाला होता.) लिफ्ट वर जाण्याच्या बेतात होती तरी एक पत्रकार म्हणाला, 'बैठकीच्या दुसऱ्या दिवशीच थोडा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे. वेळेचा प्रश्न असल्यामुळे लगेच दुसऱ्या दिवशी सविस्तर भाषणे देता आली नाहीत !' बैठकीच्या आधी व नंतर श्री. नाईक पत्रकारांशी जे व ज्या पद्धतीने बोलले त्यामुळे त्यांनीच पक्षात फूट असून एक गट आपल्याविरुद्ध आहे याची कबुली दिली. तिडके पत्रकारांना कमलेही शुद्धलेखन घालोत ! तिसऱ्या दिवशी वृत्तांत कसा आला असं विचारून, नाईक यांनी, बैठकीत काय घडले हे माझ्या विरोधी गटाच्या लोकांनी तुम्हाला सांगितले आहे असेच सुचवले ! ते खोटे आहे असेही नाही. वसंतराव नाईक यांच्याकडे जसे गृहखाते आहे तसे पत्रकाराजवळ नाही. ते जसे माणसामागे सी. आय. डी. उभे करतात तसे सी. आय. डी. पत्रकारांजवळ नाहीत, त्यामुळे पत्रकारांना कोणी तरी माहिती देणारा बैठकीतील असणार हे ओळखायला अवघड नाही. पण का हो वसंतराव, तुम्ही वार्ताहरांना बोलावून असे कधी सांगतच नाही काय ?

आमदारांनी चर्चेची मागणी केली आहे ती नेहमीप्रमाणेच आहे व ही चर्चा झाली आहे असा खुलासा नरेंद्र तिडके यांनी केला होता. परंतु आमदार या खुलाशाने अधिकच संतापू लागले. तेव्हा २ एप्रिल रोजी बैठक बोलावणे भाग पडले. २ एप्रिलच्या बैठकीत मध्यरात्रीपर्यंत जेवढे म्हणून बोलले त्यांनी काय नाईकांवर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला ? नाईकांचे त्यांनी अक्षरशः वाभाडे काढले ! शेवटी ती चर्चा अपुरी ठेवावी लागली. अपुरी चर्चा वास्तविक लगेच दुसऱ्या दिवशी घेणे जरूर होते, पण तशी ती झाली नाही. तब्बल आठवड्याने, ९ एप्रिल रोजी, चर्चेचा दुसरा हप्ता पुढे चालू करण्यात आला. दरम्यान कोणाला दम देऊन तर कोणाला मंत्रिपदाची वा आणखी कशाची आश्वासने देऊन असंतोष कमी करण्याचा प्रयत्न झाला. त्याला तेवढे यश आले नाही. जिल्ह्यांचे प्रश्न समजून घेण्याच्या निमित्ताने प्रत्येक जिल्ह्याच्या आमदारांशी श्री. नाईकांनी चर्चा केली.

नऊ एप्रिलच्या बैठकीत खडाजंगी होणार होती याची माहिती गृहखात्याने मिळविली. या खडाजंगीमुळे नाईकांची 'इमेज' आणखी वितळणार होती. ते टाळण्याचे आटोकाट प्रयत्न झाले. पण त्याला यश येण्याची खात्री नव्हती. मग 'आपण सन्मानाने जाण्यास तयार आहोत' असे श्री. नाईक यांनी वसंतरावदादा पाटील यांना सांगितले असेही म्हणतात ! त्यानंतरच दादांनी खडाजंगी टाळली. 'पक्षाच्या हितासाठी चर्चा येथेच थांबवण्यात येत आहे' असे दादांनी सांगितले त्यामुळे पुढचा प्रसंग टळला हे खरे ! पण त्यामुळे तिडके यांनी घातलेले शुद्धलेखन वस्तुस्थिती ठरत नाही. चर्चा थांबवली नसती तर टीका झाली असती तशीच प्रतिटीका झाली असती. प्रसंग हमरीतुमरीवर आला असता. दोन्ही बाजूच्या लोकांनी एकमेकांचे वाभाडे काढले असते. पक्षात असंतोष नसता तर होणाऱ्या चर्चेने पक्षाच्या हिताला कसा काय धोका पोचला असता ? लोकशाहीत चर्चेने निर्णय होतात तर मग चर्चेने पक्षाचे हित धोक्यात येण्याचे कारण नव्हते ! पक्षात असंतोष नव्हता तर चर्चा का थांबवली हे तिडक्यांना विचारावे असे पत्रकारांनाही वाटले नाही !

पहिल्या बैठकीत नाईकविरोधी गटाच्या लोकांनी सरकारवर म्हणजे नाईकांवर जहरी टीका केली होती. कधी नव्हता एवढा भ्रष्टाचार बोकाळला आहे येथपासून तो आपल्या राजकारणासाठी जातीयवादाचे वीष पेरले आहे, मुंबईत शिवसेना व विदर्भात विदर्भवादाची विषवल्ली जोपासली जात आहे. येथपर्यंत गंभीर आरोप करण्यात आले होते. पहिल्या बैठकीत केलेले आरोप खोडून काढण्याची संधी नाईक यांच्या लोकांना दुसऱ्या बैठकीत मिळाली होती; परंतु त्यांनी आरोप खोडून काढण्याचा प्रयत्न केला नाही. आरोप खोडले जावेत असे श्री. नाईकांनाही वाटले नाही काय ? आरोप

खोडायला जायचे म्हणजे नव्या आरोपांना निमंत्रण देणेच ठरणार होते काय ? कारण नाईकांच्यावरील आरोप खोडून काढणारी भाषणे शांतपणे कोणी ऐकून घेतली नसती. त्यासाठी प्रत्युत्तरे देणारी भाषणे झाली असती. त्यात नेतृत्त्वाची शोभा राहाणार नव्हती. भीक नको, पण कुत्रे आवर असे म्हणण्याची पाळी आली असती. यासाठीच पहिल्या बैठकीतील आरोपांना उत्तरे देण्याचा प्रयत्न दुसऱ्या बैठकीत झाला नाही. उलट ही चर्चा थांबवण्यासाठी श्री. नाईकांना प्रयत्न करावे लागले. पण यामुळे झाले काय, आरोपांची नोंद झाली, जनतेपर्यंत आरोप गेले, नाईकांची बाजू जनतेपर्यंत पोचली नाही. हा नाईक गटावर झालेला अन्याय आहे, असे काहींचे मत. पण अन्याय कसा म्हणायचा हाही प्रश्न आहे. अन्याय दुसरा करतो. स्वतःच उत्तरे देण्याची संधी नाकारावयाची तर मग अन्याय झाला असे कसे म्हणता येईल ?

चर्चा थांबवून दादांनी फक्त आरोप होऊ दिले पण त्यांना उत्तरे होऊ दिली नाहीत असाही निष्कर्ष निघतो. आमदारांना चर्चा करू दिली नाही, पण श्री. नाईक यांनी थोडक्यात भाषण केले. त्या भाषणाच्यावेळीही नाईकांना व्यत्यय आलाच ! श्री. नाईक काही गोष्टींचे समर्थन करू लागले तेव्हा काही आमदारांनी ओरड केलीच की नाही ? मेहरबानी करून समर्थन करू नका असे बजावले गेले याचा अर्थ काय ? राजारामबापू पाटील यांनी आभाराचे भाषण करताना 'नाईकांच्या नेतृत्त्वावर विश्वास आहे' असे वाक्य उच्चारताच बापूंना ते वाक्य आमदारांनी पूर्ण करू दिले नाही हे कशाचे लक्षण मानावयाचे ? नेतृत्त्वाविरुद्ध असंतोष नाही याचे ?

श्री. नाईक यांनी आपल्या भाषणात जयप्रकाश नारायण यांचा उल्लेख केला तोही मूळच्या काँग्रेस आमदारांना आवडला नाही. जयप्रकाश नारायण यांनी पक्ष सोडला, त्यांना काय स्थान आहे याचा विचार करा असे श्री. नाईक यांनी सांगितले. त्यावर बैठकीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना काही आमदार म्हणाले 'एकेकाळच्या रिक्रुटिंग ऑफिसरला जयप्रकाशांच्या स्थानाविषयी काय समजणार ? जयप्रकाशांबद्दलचा उल्लेख आम्हाला बिलकूल आवडला नाही !' जनतेला दिलेली आश्वासने सरकारने पूर्ण केली नाहीत तर पक्षात राहावयाचे की नाही याचा आम्हाला विचार करावा लागेल असे वि. कृ. टेंबे म्हणाले होते. टेंबे यांनी जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण केली जात नाहीत त्याबद्दलचा संताप बोलून दाखवला होता. त्याला जयप्रकाशांनी पक्ष सोडला, त्यांची काय अवस्था झाली हे उत्तर नव्हते. श्री. नाईकांना एका गोष्टीची आठवण करून देणे योग्य ठरेल. काही वर्षापूर्वी शिवसेनेने सीमा प्रश्नावर दंगल केली. त्या दंगलीनंतर जयप्रकाशांनी पाहणी केली आणि नाईकांशी वर्षावर चर्चा केली. यावेळी जयप्रकाश नारायण यांनी उपाययोजनेसंबंधी नाईकांना अनुकूल मते व्यक्त केली होती. या चर्चेसंबंधी मी श्री. नाईकांना विचारले होते. तेव्हा मोठ्या खुशीत येऊन श्री. नाईक म्हणाले होते, 'ते त्यांनाच विचारा. फार चांगले मत दिले आहे' जयप्रकाश यांना स्थान राहिलेले नाही असे म्हणणाऱ्या नाईकांनाच जयप्रकाशांच्या सर्टिफिकेटची मातब्बरी त्यावेळी किती वाटत होती ! जयप्रकाशांना स्थान राहिले नाही तर मग त्यांच्या अनुकूल मताबद्दल खुशी मानण्यात तरी काय हशील होते ?

नेतृत्वात बदल करण्याची मागणी कोणी केली नाही असा युक्तिवाद केला जात आहे. नाईकांना बाजूला करावे असे स्पष्टपणे कोणी म्हटलेले नाही; पण आजच्या इतका भ्रष्ट कारभार कधी नव्हता. जातीयवाद, संकुचितवाद जोपासला जात आहे अशी टीका करूनही आमदारांना असा कारभार चालू देणारे नेतृत्वच हवे आहे त्यात बदल नको असे कोणाला वाटत असले तर टीका करणारे तरी ढोंगी आहेत किंवा ज्यांच्यावर एवढी प्रखर टीका होऊनही आपल्याविरूद्ध काही नाही असे म्हणणारे तरी निगरगट्ट आहेत, असेच म्हणावे लागेल,

नाईक आता मंत्रिमंडळ वाढीचा प्रयोग करतील असे बोलले जाते. तो करण्यामागे असंतोष कमी करणे हा जसा उद्देश आहे त्याचप्रमाणे या निमित्ताने काहीजणांची खाती काढून घेणे हाही उद्देश आहे. मंत्रिमंडळात वाढ न करता खाती बदलली तर अपमानाने पेटलेली माणसे आणखी असंतोष पेटवतील. हा धोका टाळण्यासाठी वाढ करून खाती बदलली जातील. खात्यात बदल करतानाही असा बदल केला जाईल की आज एकत्र येत असलेल्यांना एकमेकाबद्दल संशय वाटावा ! उदाहरणच द्यावयाचे झाल्यास शरद पवारांना बढती द्यावयाची म्हणजे त्यांच्याकडील गृहखाते काढून घेतले जाईल आणि शंकरराव चव्हाण यांच्याकडील शेती खाते कदाचित पवारांना दिले जाईल. म्हणजे मग शंकरराव चव्हाण व शरद पवार यांच्यात वितुष्ट ! पाटबंधारेमंत्री वसंतरावदादा पाटील आहेत. त्यांच्या खात्याच्या बैठकीला मध्येच, पूर्वी पाटबंधारे खाते शंकरराव चव्हाण यांच्याकडे होते म्हणून त्यांना मदतीसाठी बोलवायचे ! आपल्या खात्यात चव्हाणांची लुडबूड होत आहे असे वसंतरावदादांना वाटावे ! कृष्णा पाणी तंटयाचा निकाल लागल्यानंतर मिळालेल्या पाण्याचा वापर कशा पद्धतीने करावयाचा याचा विचार चालू असताना श्री. नाईकांनी श्री. चव्हाणांना बोलावून घेतले होते. दादा, शंकरराव चव्हाण, मोहिते, पवार आदींचे नाईक मुख्यमंत्रीपदावरून गेले पाहिजेत याबद्दल एकमत आहे. त्यासाठी ते एकत्र येत आहेत. त्यामुळे त्यांना एकमेकाविषयी संशय वाटावा, त्यांच्यात फूट पडावी यासाठी त्यांच्याकडे असलेली खाती बदलण्याचा घाट घातला जाण्याची शक्यता आहे.

मंत्रिमंडळातील वाढीचा प्रयत्न असंतोष कमी व्हावा यासाठी केला तरी येणाऱ्या नव्या मंत्र्यांत नाईक विरोधी गटात आज असलेले काही राहतीलच ! ते मंत्रिमंडळात आल्यावर नाईक विरोधी गटाची शक्ती वाढून नाईकांची डोकेदुखी वाढणार आहे. सत्तेच्या मागे लोक असतात; पक्ष बैठकीत झालेल्या टीकेमुळे वारे कसे वाहात आहे याची कल्पना आमदारांना असल्याने नव्याने येणाऱ्या मंत्र्यामध्ये नाईक विरोधी गटाचे काहीजण असणारच, त्यांच्यामागे थोडेतरी आमदार असतील. शिवाय मंत्री झाल्यामुळेही काहीजण त्या मंत्र्यांच्या मागे उभे राहणार हेही विसरून चालणार नाही. स्वतः श्री. नाईक सत्तेच्या केंद्रस्थानी असल्यामुळे त्यांच्यामागे जे लोक आहेत त्यात नव्याने फार वाढ होण्याला वाव राहिलेला नाही. कारण ते लोक पूर्वीपासूनच श्री. वसंतराव नाईक यांच्या मागे आहेत. नाईक मुख्यमंत्री आहेत म्हणून त्यांच्यामागे उभे राहणारे या आधीपासूनच त्यांच्यामागे आहेत. त्यामुळे मंत्र्यांच्या संख्येत वाढ केल्याने होणारे फायदे नाईक गटाला फार मिळणार नाहीत. फायद्याचा मोठा वाटा नाईक विरोधी गटाला मिळेल. असे झाले की नाईकांच्या मागची डोकेदुखी कमी होण्याऐवजी वाढत जाईल !

काही कारण नसताना श्री. नाईक यांनी पत्रकार भेटीचा कार्यक्रम आयोजित केला. आणि गप्पा मारताना ते पत्रकारांना म्हणाले, तुम्हाला एकेक दिवस मंत्री-मुख्यमंत्री केले पाहिजे. पत्रकार वस्ताद निघाले. त्यांनी श्री. नाईकांनाच टोमणा हाणला, 'म्हणजे एकदा मुख्यमंत्री झालेला पत्रकार पुनः मुख्यमंत्रीपद सोडायचाच नाही !' 'असं कसं होईल ! लोकशाहीत एक दिवस जावेच लागेल' असे श्री. नाईक म्हणाले. या निमित्ताने श्री. नाईक यांनी आपले मनोगत तर सांगितले नाही ? □ □

# सोलकढी

## □ पिकलेले व शिकलेले विद्यापीठ

मुंबई विद्यापीठाचा पदवीधर तुम्ही कधी नीट न्याहाळला आहे काय? तसे एकदा कराच. मुंबई विद्यापीठ पदवीधरात जो एक चलाखपणा, चाणाक्षपणा, चारित्र्यवानपणा, चुणचुणीतपणा आणि चालूपणा दिसतो तो इतर पदवीधरात थोडासुद्धा दिसत नाही. ऑमलेट (अंड्याचे) आणि टॉमलेट (टोमॅटोचे) यांच्यात जो मूलभूत फरक आहे तोच मुं. प. व इ. प. यांच्यात आपल्या प्रत्ययाला येतो. असा फरक का पडावा हे आधी माझ्या ध्यानात नीटपणे येत नसे. मला वाटायचे, सगळी विद्यापीठे सारखी; म्हणून सगळे पदवीधरसुद्धा सारखेच. पण मुंबई विद्यापीठाचा नसलेला पदवीधर काहीसा वेगळा तर दिसायचा आणि माझा गोंधळ व्हायचा. अलीकडे मात्र मला हे कळून चुकले आहे की, सगळी विद्यापीठे सारखी हे आपले गृहीत तत्त्वच चुकीचे होते. बाकीची भारतीय विद्यापीठे एकमेकांसारखी असतील; पण मुंबई विद्यापीठ वेगळे आहे.

माझ्या जिज्ञासू स्वभावाला अनुसरून त्या वेगळेपणाचा शोध घेतला; आणि मला असे निखालसपणे आढळून आले की, मुंबई विद्यापीठाचा वेगळेपणा त्याच्या अद्वितीय चारित्र्यात आहे. मुंबई विद्यापीठातले विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि व्यवस्थापक, रेक्टर, कुलगुरू इतकेच नव्हे तर प्रयोगशाळा, क्रीडांगणे, वाचनालये, फळे आणि खडूसुद्धा चारित्र्यसंपन्न आहेत. चारित्र्य ही काही झटपट सिद्ध होणारी वस्तू नाही. अक्रोडाच्या वृक्षाप्रमाणे चारित्र्याचे संवर्धन पिढ्यान पिढ्या करावे लागते. मुंबई विद्यापीठाने ते केले आहे. या बाबतीत, गेल्या बारा-पंधरा वर्षांत, गोवर्धनदास, गजेंद्रगडकर, चिदंबरम, त्र्यंबकतात्या कृष्णाजी टोपे या महाबळेश्वरांनी जे अजस्त्र काम करून ठेवले आहे ते केव्हाच आख्यायिकास्वरूप झाले आहे.

पण चारित्र्याला एक शाप असतो. ते मलीन करायला क्षुद्रमनस्क मानवी कीटक टपलेले असतात. चारित्र्याचे प्रखर तेज त्यांच्या डोळ्यातल्या मेण-बाहुल्यांना सहन होत नाही. मुंबई विद्यापीठाचेच पाहा. एकत्र साकळून राहिलेले इतके चारित्र्य तुम्हाला कोठेही आढळणार नाही. पण विद्यापीठाच्याच कार्यकारिणी आणि निर्णयी प्रतिनिधी–मंडळातल्या काही बुद्रुक सभासदांनी चारित्र्याची झडती घ्यायचा घाट घातला आहे. त्यांच्या मते, मुंबई विद्यापीठाच्या परीक्षात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक पात्रतेपेक्षा त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक पात्रतेचा विचार अधिक केला जातो; त्यामुळे परीक्षा विभागातील कर्मचाऱ्यांनी आणि जबाबदार अधिकारी व्यक्तींनी आपली यथास्थित बरकत करून घेतली आहे; गेल्या चार-पाच वर्षात झालेल्या विद्यापीठीय बांधकामात फार मोठ्या रकमा इकडे तिकडे सरकल्या आहेत.

हे ऐकल्यावर आमची, नाही म्हटले तरी, थोडीशी धांदल झालीच. कारण मुंबई विद्यापीठाच्या निष्कलंक चारित्र्यावर आमची नितांत श्रद्धा. त्यामुळे आम्ही तत्परतेने पुराव्याचा बिनतोड मुद्दा उपसला. तर म्हणे केलेल्या आरोपांना पुराव्याचा भक्कम आधार आहे.


हे आपले उगाच. धमक्या देताना सगळे असेच धडाडधुम करतात आणि प्रत्यक्ष वेळ आली की बँड बँड करत बसतात. अशा धमक्यांना भिण्याइतके मुंबई विद्यापीठ कोवळे आणि बावळे नाही. ते चांगले पिकलेले आणि शिकलेले आहे. त्यामुळे उद्या यदाकदाचित खरोखरच अशा पुराव्याचा भैरव समोर उभा ठाकला तरी आपल्या (अखंड सौभाग्यवत) अखंड चारित्र्याच्या पुण्याईवर मुंबई विद्यापीठ त्याचे खिमट शिजवून सहज मोकळे होऊ शकेल.

—अनंतराव





छ्या: छ्या ऽऽ,
माझी तक्रार बिलकूल नाही. मी सत्तेवर रहावे अशी जनतेची फार इच्छा आहे. हेच स्पष्ट होते.
डोकेदुखीच्या गोळीची नुसती किंमत ऐकून डोकेदुखी गायब!
वाटाघाटी
गाडी आली गाडी आली झुक झुक झुक ऽऽ
(कां) मिश्रा
जॉर्ज स्टेशन



चौतीस सालात पांच...
टचांईच्या काळात जपानी गायी रद्दी खाऊन सुध्दा जगतात बरं!
मग जपानी गायीत अन् आमच्यात फारसा फरक नाही. आम्ही सुध्दा रद्दी अन्नच खाऊन जगतो हं!!
चव्वेचाळीस सालात पन्नास...
चौपन्न सालात जेमतेम पांचशे...
चौसष्ठ सालात हजार... अन् चौऱ्याहत्तरात पांच हजारावर भ्रष्टाचाराचे आरोप...
केले गेले आहेत माझ्यावर...हॅऽऽ हॅऽऽ तरी बरं चाललंय आमचं!
श्याम जोशी

शतपावली

# व्रती

रवींद्र पिंगे

निमित्त तर किती साधं झालं ! संसारातल्या अनंत कटकटीमुळे टेकीला आलेल्या तिच्या आईला वर्तमान पत्रात छापलेलं एक चित्र मिळालं. चित्रात एक अस्ताला टेकलेली श्रांत म्हातारी बाई खुर्चीवर बसलेली होती आणि टवटवीत नजरेची एक तरुणी तिच्या खांद्यावर हात ठेऊन उभी होती. कदाचित त्या मायलेकी असतील, कदाचित शेजारणीही असतील. महत्त्व त्या नात्याला नव्हतं. चित्रातलं तारुण्य त्या म्हातारपणाला सांभाळून घेत होतं. म्हातारपणाला तारुण्याचा दिलासा होता. एकमेक एकमेकीला आधारभूत होत्या. एकीला अफाट आकांक्षेला आकाश मोकळं होतं, दुसरीला अनुभवांच्या पहाडामधल्या पायवाटा माहीत होत्या. तिच्या आईला वाटलं, हे चित्र म्हणजे जणू आपल्याच संसाराचं प्रतीक आहे. तिने ते नीट कापलं. लेकीची अभ्यासाची वही उघडली आणि त्यात ते चिकटवलं. तेवढं करून ती माऊली थांबली नाही. दौतटाक घेऊन त्या चित्राच्या खाली तिने लिहिलं,

‘हे चित्र माझ्या काळजाला भिडलं. हे हुबेहुब तुझं नि माझंच चित्र आहे. फक्त रूपं वेगळी आहेत. ह्यातली तरुण मुलगी म्हणजे तू नि ती म्हातारी बसल्याय ती मी. जीव पाखडता पाखडता म्हातारी झालेली ती चित्रातली आई आता आधारासाठी आपल्या तरण्या लेकीकडे पहात आहे. मोठेपणी तू माझा असाच सांभाळ करशील ना ? तू चार पैसे मिळवशील तेव्हा कुठे माझ्या तोंडात दोन घास पडणार ?’

ते चित्र आणि त्याखालचा हा मजकूर वाचून ती दहा वर्षांची बाललेखिका थरारून गेली.

काही दिवस असेच उलटले आणि टेबलावर आईने लिहून ठेवलेली दुसरी चिठ्ठी तिला सापडली. आईने लिहिलं होतं,

‘लिहिण्याचा तुला छंद जडला आहे ही फार नामी गोष्ट आहे. तुझ्यासाठी मी पेन्सीली आणल्या आहेत. त्या नीट वापर. लिहीत रहा म्हणजे तुझं नाव मोठं होईल.’

ह्या दोन चिठ्यांचा अर्थ काय ?

नेमका अर्थ तळहातावर काढून दाखविण्याइतकी ती धड मोठीही नव्हती आणि त्यातल्या भावनेच्या भरतीचं पाणी मनाच्या किनाऱ्यावर न फेसाळण्याइतकी ती अजाणही नव्हती. तिचं वय अवघे बारा वर्षांचं होतं. मात्र बाळपणातल्या बारा वर्षांत तिने आईवडिलांच्या व्यस्त संसारातला झंझावात पोटभर पाहिलेला होता. तिचा बाप एक अफलातून प्राणी होता. त्याने जगरहाटी केव्हाच झुगारून दिली होती. शहरी जीवनाकडे पाठ फिरवली होती. जंगल हद्दीतलं एक खेडेगाव गाठून तो चिमुरड्या मुलामुलींसाठी आश्रमीय पद्धतीची शाळा उघडून बसला होता. अमेरिकेतली पहिली बालवाडी ह्या ब्रॉन्सनची. लहान बच्चांना त्यांच्या कलाने घेऊन हसत खेळत शिकवायची वेगळीच सोपी पद्धत त्याने शोधून काढली. पालकांनी पैसे दिले तर घरी धान्य यायचं. नाहीतर जंगलात जाऊन फळं आणायचा, नदीतले मासे पकडून बायकोच्या स्वाधीन करायचा. मात्र, स्वत: कधी कुणाच्या स्वाधीन झाला नाही. तो तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी. निव्वळ पोट भरण्याच्या पलीकडलं श्रेय तो शोधायचा. व्यापारी पेढीवर चाकरमानेगिरी करणं त्याच्याने जमण्यासारखं नव्हतं. हातात छडी घेऊन पंतोजीपण करणं तर त्याच्याने धकण्यासारखंच नव्हतं. आणि नुसती जंगलात वसती करून संसार निभण्यासारखा नव्हता. म्हणून बालवाडी काढली. इमर्सन आणि थोरो ही दोन शहाणी तत्त्वज्ञ माणसं त्याचे खास दोस्त. ह्यात सर्व आलं. इमर्सन फक्त चिंतनशील लेख लिहिणारा माणूस आणि थोरोने तर अरण्यातला आदिवास पत्करलेला. अशा जगावेगळ्या गोत्रांत गुरफटलेला तत्त्वज्ञ वृत्तीचा माणूस संसारात काय फत्ते मिळवणार ? तो नि त्याचा बैल, दोघेही झोपी गेलेले होते.

लुईसाची आई ॲबा मात्र पक्की संसारकरू बया होती. बाशिंग बांधल्या क्षणापासून तीने नवऱ्याला धारेवर धरलं होतं. अंडी आणा, बटाटे आणा, लाकूडफाटा आणा, कापडचोपड आणा, तेलतूप आणा असा भुंगा तिने त्याच्यामागे सततचा लावला होता. एकदा स्वारी बहुत मिजाशीने व्याख्यानांच्या दौऱ्यावर गेली. चांगली वीस पंचवीस व्याख्यानांची साखळी गुंफली होती. महिनाभर रक्त आटवल्यावर राजश्रींच्या पदरात काय पडलं ? दोन वेळचं मोफत भोजन आणि सगळ्या दौऱ्याची दक्षिणा म्हणून फक्त एक डॉलर ! शिवाय वाटेत महाशयांचा कोट चोरीला गेला तो वेगळाच. असा हा नग संसारकृत्य काय करणार होता ? त्याची बालवाडीही बंद पडली. वास्तविक पाहाता तो भुकेनेच मरायचा. पण इमर्सन मैत्रीला जागला. त्याने आपल्या मुलींची त्याला शिकवणी दिली. इमर्सनला गोरगरीबांचा फार लळा. त्याच्या पडवीत दोन घमेली सदाचीच ठेवलेली असत. एका घमेल्यात शेतातून आणलेले बटाटे असत. दुसऱ्यात दाणे असत. कुणीही यावं नि न विचारता जरूरीप्रमाणे त्या वस्तु बेशक घेऊन जाव्यात असा शिरस्ता होता. इमर्सनला तो आधार झाला. एकदा त्याच्या मनात आलं की रानात झोपडं बांधून रहावं नि कच्या भाजीपाल्यावर जगावं. विचार स्फुरताक्षणीच त्याने आपली शहरी वस्ती हलवली. लेन नावाच्या कडक निसर्गोपचारी मित्राला बरोबर घेऊन तो रानात संसार करू लागला. लुईसासकट सगळेजण हवालदील झाले. ब्रॉन्सन मात्र आपल्याच मस्तीत होता. अरण्यवासात फुलत होता. एकदा लेनशी त्याचा बेबनाव झाला. भांड्याला भांडं लागलं. लेन चालता झाला. मित्रवियोगाचे दुःख ब्रॉन्सनला असह्य झालं. त्यानं अंथरूण धरले. पुढे लेन परतला. जसा अकारण गेला होता तसाच अकारण परतला. ब्रॉन्सनला त्याचा इतका आनंद झाला की आपला संसार लेनच्या ताब्यात देऊन ब्रॉन्सनच निघून गेला. म्हणाला, ‘शाबास. भल्या माणसा, तूच चालव माझा संसार.’

ह्या असल्या आवर्तात लुईसा नामक एका कोवळ्या पिंपळपानाचा काय पाड लागणार होता ? जन्मजात शहाणपणानं मात्र तिने काही गोष्टींची चित्तात पक्की गाठ मारली होती.

ही सर्व भावनाशील अनिकेत माणसं स्थिर नाहीत. आपण ह्यांच्यासाठी मायाळू घरदार करून दिलं पाहिजे, हे आयुष्यातलं पहिल्या क्रमांकाचं कर्तव्य. वडिलांना लेखनावाचनाला एक स्वतंत्र मोकळी खोली करून दिली पाहिजे. मुख्य म्हणजे त्यांना पैशांच्या बाबतीत निश्चित केलं पाहिजे. भटक्या नवऱ्याचा संसार रेटता रेटता टेकीस आलेल्या आईला उठाबसायसाठी एक मोठी खोली आणि भरपूर दिलासा दिला पाहिजे. धाकटी बहीण ॲन हिला उच्च शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली पाहिजे. भावंडांचं हवं नको

पाहिलं पाहिजे, चाकरमाणसांना न विसरता आणि हे सगळं स्वतः खर्ची पडून बिनबोभाट केलं पाहिजे.

ती हे डोंगराएवढालं कामं कशी करणार होती ?

इथे तिच्या मदतीला आईच्या त्या दोन चिठ्ठ्या आल्या. आपण लेखणीच्या बळावर पैसे मिळवू शकू ? पण गोष्टी लिहितात म्हणजे नेमकं काय करतात ? कथानकं कशी जुळवतात ? त्यांत काय खुब्या असतात ? एका कथेचे किती डॉलर्स मिळतात ? कुठली मासिकं कथा छापतात ? कुठले वाचक त्या वाचतात ?

तिला कथालेखनातलं ओ म्हणता ठो कळत नव्हतं. म्हणून अनुभवालाच तिने गुरू केलं.

इतरांना सांभाळून घेण्यातच माणुसकी आहे, इतरांना दिलासा देण्यातच कृतार्थता आहे, एकमेकांना धरून राहणाऱ्या माणसांच्या गोष्टी लिहून वाचकांना धीर देण्यातच लेखनाची सफलता आहे, ह्या तीन तत्त्वांबद्दल प्रथमतः ती निःशंक झाली. तिचं प्रारंभीचं सटरफटर लेखन ह्याच तत्त्वांच्या आधाराने सुरू झालं. सर्वच लेखकांना जे सलामीचे उफराटे अनुभव येतात, ते तिला रगड आले. कधी साहित्य उलट टपाली परत आलं, कधी प्रसिद्ध झाल्याचं कळलंच नाही, कधी कुणी दखल घेतली नाही. मात्र जेव्हा केव्हा पाच पंचवीस डॉलर्स मिळाले ते तिने आईवडिलांना गरम कपडे घेण्याकडेच वापरले. पुढे तिच्या लक्षात आलं की, आपलं अनुभवविश्व तोकडं आहे. मर्यादित आहे. आपण भिंतीवरून उडी मारून पलीकडे गेलं पाहिजे, जगातली माणसं कशी वागतात ते पाहिलं पाहिजे आणि जागृतीच्या ह्या मोक्यावरच फार मोठी संधी तिच्यापुढे चालून आली. अमेरिकेत यादवी युद्ध सुरू झालं होतं तिथे गुलामगिरीविरुद्ध लढणाऱ्या घायाळ सैनिकांची सुश्रुशा करण्यासाठी, त्यांची देखभाल करण्यासाठी तरुण मुलींची गरज होती. लुईसाने ही संधी हेरली. आपल्याला युद्धभूमीवरल्या हकीगती कळतील, जिवाच्या करारानिशी झुंजणाऱ्या वीरांच्या हृदयात डोकावून पाहता येईल, एका वादळी अनुभवाशी हस्तांदोलन करता येईल, ह्या हिशोबाने लुईसा परिचारिका बनून सैनिकी इस्पितळात दाखल झाली.

पहिल्याच पावलाला ती लटपटली. ते दाढीमिशा वाढलेले घायाळ सैनिक तिच्याने पहावेनात. ती त्यांना कथाकादंबऱ्या वाचून दाखवू लागली, त्यांच्या जखमा धुवू लागली, औषधपाणी करू लागली. पण युद्धातलं हत्याकांड अमानुष होतं. सुख, समाधान, शांतता, समृद्धी, सर्व सर्व हरवून बसलेल्या त्या सैनिकांचा मूक आक्रोश तिच्याने ऐकवेना. तशात एका सैनिकाने तर तिच्या मांडीवरच प्राण सोडले. एक सचेतन देह निमिषार्धात अचेतन होऊ शकतो हा वेगळाच अनुभव तिने घेतला आणि त्या सैनिकी इस्पितळाला भयभीतपणे आजारी पडून रामराम ठोकला. निश्चय करून, की अनुभव घेण्यासाठी असं दूर जाण्याचं कारण नाही. ती आपल्या आईवडिलांच्या संसारात परत आली. ज्या मर्यादित जगात आपण वावरतो, त्या जगाकडे डोळे उघडून अलिप्तपणे पाहिलं, तर भरपूर काही दिसू शकतं, त्यातूनही लेखनाला प्रेरणा मिळू शकते, हा नवा धडा ती गिरवू लागली.

आता तिचं संथ, शांत लेखन सुरू झालं. हळू हळू बोलबाला होऊ लागला. खास लुईसाचा म्हणून एक वाचकवर्ग वाढू लागला. आईबाप खुशाल झाले.

पण बोहोल्याचं काय ?

लग्नाचा विषय तिने कटाक्षाने टाळला होता. ज्याला एकटक कुटुंबाचं कल्याण साधायचं आहे आणि विशेषतः ज्या मुलीला आपल्या आईवडिलांच्या निरंतर सेवेत अंशमात्र अंतराय येऊ द्यायचा नाही, तिने गृहिणी-जीवनाची आंस एक तत्त्व म्हणून दूर ठेवली पाहिजे अशी तिची धारणा पक्की झाली होती. आईबाप, आपण, आपले आप्त, आपलं कुटुंब, हा एक किल्ला आहे. तो आपण आत राहूनच लढवला पाहिजे अशी तिची भावना होती. त्या भूमिकेशी ती एकनिष्ठ राहिली. लग्नाचा तिने एकप्रकारे धसकाच घेतला होता. जोडीदार कसा मिळेल, आई-बापांना हिडीसफिडीस करेल काय, आपल्या लेखनसमाधीशी तद्रूप होईल काय, वगैरे हजार विवंचना तिला ग्रासत होत्या. त्यापेक्षा अविवाहीत राहून जन्मदात्या मातापितरांचा सांभाळ करीत करीत जीवनयात्रा चालू ठेवण्यात कुठलं सुख उणं होणार होतं ? लैंगिक आसक्तीची मातबरी तिला वाटतच नव्हती. तिच्या धाकट्या बहिणीच्या प्रियकराने घेतलेला मुका तिच्या नजरेला एकदा पडला होता. त्यावेळी ती रोमांचित न होता, उलट तिच्या जीवाचा थरकापच उडाला होता. कलावंत कामासक्त असतात असा एक घोर गैरसमज आहे. अर्धकच्चे, किंवा विद्येच्या अमोघ शक्तीशी पुरेसा परिचय न झालेले अर्धकलावंत विकारवश असतात आणि प्रसंगी ते विकृतीच्या गर्तेत पडतात. परंतु गुणी कलावंतांना वेळीच विवेक सुचल्याचे दाखले हवे तितके आहेत. बहुसंख्य कलावंत दुपदरी जीवन जगतात, नि त्यातला एक झुळझुळीत पदर चोरटचा, छुप्या जीवनाचा असतो हे सूर्यप्रकाशाइतकं लख्ख सत्य आहे. ह्यात वादच नाही. मात्र त्याची प्रेरणा कामासक्तीत बहुशः नसते. अपुलकी, आदर, कृतज्ञता, अर्पणोत्सुकता, दिलासा, संधी आणि अत्तरासारखी सुगंधापुरती कामातुरता, ह्या सर्वांच्या मिश्रणातून कलावंताच्या छुप्या कामजीवनाची निर्मीती होत असते. लुईसा कलावंत होती. तिचं जीवन मात्र परोपरीने एकपदरीच होतं. तो पदर म्हणजे स्वतः सदाचं लिहीतं राहून त्या बळावर मातापित्यासकट सकल कुटुंबाचा सांभाळ करणं. तशात तिचा दैवयोग इतका उजळ होता की कुमारिकांच्या समर्पित जीवनाचा निःस्वार्थ जयजयकार करणारा प्रभावी भाष्यकार थिओडॉर पार्कर ह्याचं एक प्रवचन तिच्या कानावरून गेलं आणि आपली सारी जिंदगी कुटूंबासाठी समर्पित करण्याच्या तिच्या इच्छेचं रूपांतर कडकडीत व्रतात झालं. नाही म्हटलं तरी चुंबनालिंगनाचा समावेश असलेल्या गृहस्थी जीवनाची तिने खोलवर कुठे तरी भ्या घेतली होतीच. आता पार्करचं प्रवचन ऐकल्यापासून विवाहाची तिला गरजच भासेनाशी झाली.

तिची नव्यानं दोन लग्नं लागली. एक लेखणीशी नि दुसरं अविरत कुटूंबसेवेच्या कल्पनेशी. ह्या दोन्ही स्वयंवरांमधला उन्माद तिने भरपूर भोगला. एकमेकांनी एकमेकांना मनःपूत आधार दिला पाहिजे, दिलासा दिला पाहिजे, लहान मुलांवर वात्सल्याचं चांदणं शिंपलं पाहिजे, ह्या मध्यवर्ती कल्पनेवर आधारलेली 'लिटल वुमेन' ही तिची कादंबरी म्हणजे प्रकाशन क्षेत्रातला चमत्कार ठरली. शंभर वर्षं सतत वाचली गेलेली जगातली ती कदाचित एकमेव कादंबरी असेल. ह्या कादंबरीवर लुईसाने पर्वताएवढा पैसा मिळवला. तिने जग हिंडून पाहिलं. म्हाताऱ्या वडिलांना शांतपणे म्हातारपण काढता यावं म्हणून गढी बांधून दिली. तिचे सर्व सन्मान पाहिल्यानंतर तिच्या आईने समाधानाने डोळे मिटले. वडिल तर खूपच वर्षं जगले. तिच्या बहिणींचे, पुतण्यांचे, सर्व कुटुंबियांचे संसार तिने आनंदाने सांभाळले. तिने रस्ता जरी ओलांडला तरी लोक म्हणत, 'ती पहा लुईसा अॅलकॉट.'

दयेची देवता म्हणून सन्मानाने ह्यातभर निष्कलंक चारित्र्यानिशी वावरलेल्या ह्या कनवाळू लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वातल्या एका बारक्याशा बाबीचा नीट उलगडा अजिबात होत नाही. तिने प्रासाद बांधले, संसार मांडून दिले, सर्वांच्या सुखसोई पाहिल्या, मात्र तिला स्वतःच्या घरात काही लिहिता आलं नाही ! राहत्या घराच्या जवळ एक हॉटेल होतं. त्यातली एक खोली तिने स्वतःसाठी कायमची मुक्रर केली होती. त्या भाड्याच्या बंद खोलीत बसून ती विलक्षण झपाटयाने मनःपूत लिहीत बसे. जनात असावं पण जनात विरघळून जाऊ नये ह्या शहाणपणाच्या मंत्राची कदाचित तिला उपजच होत असेल ! ☐ ☐

# शांतता - वकील परिषद चालू आहे

डॉ. अरुण लिमये

वार न कर्त्याचा शनिवार; दि. १३ एप्रिल ७४ नेहरू मेमोरियल हॉलचा रम्य परिसर. सेंट–अत्तराचा वातावरणात घमघमाट. सोबतीला सुरेल सनईवादन चाललेले होते. हॉल गच्च भरलेला. बरीचशी मंडळी सुटाबुटात नटून थटून आलेली. काही थोडे काळा कोट-टायमध्ये. कल्लेवाले तुरळक यंग टर्कही होते. पुणे जिल्ह्यातील वकील मंडळी परिषदेसाठी जमलेली होती. त्यात 'लॉ'चा विद्यार्थी या नात्याने अध्यक्षांच्या खास परवानगीने निरीक्षक म्हणून मीही हजर झालो. दारातच ओळखीचे वकील भेटले. आता इथे तुमची काय भानगड ? तुम्हाला पाहिले की निदर्शनाचा धसका बसतो. खरे असो, खोटे असो. 'चळवळ्या' विशेषण मागे चिकटल्याचा हा नकोसा परिणाम.

हसत हसत आत जाऊन चांगलीशी जागा पटकावतो. तेवढ्यात निवेदकांचे स्वागतपर प्रास्तावीक चालू होते. विनोदी पद्धतीने ९ सूत्रधारांची ओळख करून दिली जाते. थोड्याच वेळात कलाकार श्री. अण्णासाहेब किर्लोस्करांची पदे, खाडीलकरांची पदे व बाकी वगैरे सादर करणार आहेत, पडदा वर जातो नि 'घाशीराम'ची क्षणभर आठवण येते. गळ्यात हार, कानात भिकबाळ्या, लाल–जांभळ्या पगड्या अशा वेषात ९ ब्रामणहुरींनी 'नमन' सुरू केले. एकेकाला मेयरचा चान्स द्यावा तसे प्रत्येकाला आलटून पालटून गाण्याचा चान्स होता. एकेकाचे आऽऽऽ सुरू झाले व टाळ्यांबरोबर शिट्ट्यांचाही पाऊस पडला. 'रसिक विद्वानहो–आपले स्वागत करणे परमकर्तव्य समजून म्हणतो की'—आऽऽऽश्री. ज्ञानेश्वर आडारकर वकीलांनी वाहवा मिळवली. मग पाच मिनिटांनी विश्रांती. स्टेजवर खुर्च्यांची मांडामांड वगैरे व नंतर 'भाषणे' कार्यक्रमास सुरुवात.

बॅरिष्टर आगरवाल हे स्वागत समितीचे अध्यक्ष. श्री. जेठमलानी व जज्ज श्री. भोळे यांची ओळख करून दिली गेली. नंतर त्यांनी शिवाजीपासून, पेशवे, टिळक, स्वा. सावरकर, चाफेकर, फडके, जयकर इत्यादी स्टॉप घेत घेत पुण्यनगरी महात्म्य सांगितले. नंतर उठले. बारचे अध्यक्ष श्री. गोगटे वकील. जुन्या क्रांतीकारकांचे इंग्रजी भाषण ऐकून थोडे वाईट वाटले. (पुढे रामदास परांजप्यांनी पहिल्यांदा मराठीत भाषण करून टाळ्या घेतल्या.) असो. गोगट्यांनी थोडक्यात परिषदेचे प्रयोजन सांगून वकिली पेशाचे सामाजिक महात्म्य वर्णिले. हा व्यवसाय नोबल प्रोफेशन असल्याने पैसा दुय्यम लेखावा असा विचार मांडला. 'नोबल' नसणारा व्यवसायच जगात बहुदा नसल्याने वेश्यांचे अधिवेशनातही पैसा श्रेष्ठ न मानता 'गिन्हाईकाचे समाधान' श्रेष्ठ मानण्याचा ठराव संमत होण्यास हरकत नसावी.

प्रमुख पाहुणे श्री. जेठमलानी यांनी उद्घाटनाचे भाषणातील वैयर्थ सांगत सांगत विनोदी शैलीने चांगले लांबडे भाषण केले. कायद्याचे ज्ञान कमी असले तरी फारसे बिघडत नाही. सत्यप्रकटन करायला शिकले पाहिजे हा मोलाचा उपदेश त्यांनी ज्युनिअर्सना केला. परंतु जाता जाता सत्ताधारी पक्ष, अशिक्षित जनता यांचेवर दुगाण्या झाडण्याची हौस भागवून घेतली. बॅ. अंतुल्यांवर टीका करताना, वकील म्हणून कुणाला ठाऊक नसलेले, दुसऱ्याचेकडून पुस्तक लिहून घेऊन स्वतःचे नाव छापणारे इतक्या खालच्या पातळीपर्यंत ते उतरले. तर 'नागव्यांना काय कळते ?' या थाटात विधानसभा सदस्यांना गालीप्रदान झाले. बरेचसे राजकीय मत्सराने भरलेले तर थोडेसे व्यावसायीक असे भाषण शेवटी कॉंग्रेसमनवरच्या विनोदानेच त्यांनी संपविले. टाळ्या मात्र भरपूर पडल्या. पुढे ठराव करताना श्री. जेठमलानीची विनंती धुडकावून प्रादेशीक बार प्रतिनिधित्वाचा ठराव बहुमताने पास झाला व न्यायालयातील वकिलांचे स्वातंत्र्य 'अबाधित' असल्याचे वलकिांनी सिद्ध केले.

उद्घाटनाबरोबरच कै. भाऊसाहेब गडकऱ्यांच्या फोटोचे अनावरण न्यायमूर्ती श्री. भोळेंच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी गडकऱ्यांच्या स्नुषेचे भावगीतगायन झाले. (एकुण वकील मंडळींना गाण्याची बराच शौक दिसतो.) रामदास परांजप्यांनी गडकरी महात्म्य सांगता सांगता, रिपब्लिकनावर कडी केली. डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचा संबंध त्यांनी बादरायण पद्धतीने गडकऱ्यांच्या शिकारीशी व जखमी होल्याच्या गोष्टीपर्यंत ताणून जोडला. अपेक्षित टाळ्या न पडता खसखस मात्र पिकली. जाऊ द्या झाले. केवळ ऐकीव माहितीवर अधारीत, स्टायलीश इंग्रजीत स्तुतीसुमने उधळण्याचा यशस्वी प्रयोग श्री. मोहित्यांनी केला. नानासाहेब पानसेही बोलले. (ही ऑलसो रॅनच्याच धर्तीवर.) न्यायमूर्तींचे छापील भाषण वाचन झाले. त्यात सामाजीक न्यायाचा रास्त आग्रह होता. त्यांच्या विशिष्ट शैलीमुळे रेडिओवर हळूहळू बातम्या सांगतात तसे मधून मधून वाटायचे एवढेच.

क्रीडास्पर्धांच्या बक्षीसाला सौ. जेठमलानींचा हस्तस्पर्श झाला. नंतर सी. आय. डी. पोलिसांनी गुन्हे शोधणाऱ्या पोलिसांचे मस्त प्रदर्शन केले. आरोपी पकडून दाखवायचे प्रात्यक्षीक बहारीचे झाले. पण आरोपीला 'हुषार' वकील मिळाला तर बिच्चारा चलाख कुत्रा पायात शेपूट घालण्याशिवाय काय करू शकणार ? हा विचार उगाचच माझ्या मनात आला.

दुपारी ठरावांवर चर्चा होती. चांगल्या वकिलाची सामान्य माणसाची व्याख्या फार सोपी आहे. कडाडून भांडता येते तो चांगला वकील याचे प्रत्यंतर ठरावांच्या वेळी खडाजंगीत आले. वकिली मुद्दे मांडले गेले. शब्दांचा कीस पडू लागला.

काही ठराव होते वकीलवर्ग, न्यायमूर्तींविषयी तर काही होते बंद-घेराव बद्दल चिंता व्यक्त करणारे. एकंदरीत तरुण, म्हातारे, ज्युनिअर, सिनीअर व शहरी, ग्रामीण असे तट होते. परंतु शेवटी सर्व ठराव बहुमताने पास झाले. वकिलांसाठी केवळ अपघाती मृत्युप्रसंगी तरतूद नसावी तर म्हातारपणीही प्रॉव्हिडंट फंडाची सोय हवी अशी सिनिअर्सची मागणी तर्कावर घासून ताणली तर राष्ट्रीयीकरणापर्यंत जाऊन पोहोचते. बेकार तरुण वकिलवर्ग त्याचे उत्साहाने स्वागतही करील पण परिषदेत मात्र तसा ठराव मांडला गेला नाही हे खरे. उलट, अधिक कष्ट करा म्हणजे अधिक पैसे मिळतात हा ठराविक भांडवलशाही संकल्पनेचा सूर सर्वांनी मिळून लावला होता. वकीलवर्गाच्या फायद्याचे ठराव होते. त्याला कुणाचाच विरोध नव्हता. उदा. रजा हवी, हायकोर्ट पुण्यात असावे, शासनाने आर्थिक मदत वाढवावी, वकिलांच्या फिया वाढवाव्यात, जज्जांचे पगार वाढवावेत. इ. परंतु खुमासदार चर्चा घडली ती वेगळ्याच ठरावांवर.

'माय लॉर्ड', 'युवर ऑनर' न म्हणता साधे सर किंवा मिस्टर जज्ज म्हणावे हा ठराव मागेच झाला आहे. त्याची अंमलबजावणी व्हावी एवढाच ठराव होता. परंपरावादी मानसिक गुलामगिरी प्रकट करीत होते. गादीचा मान, विष्णूचा अंश, 'खाविंद' मराठीत म्हणावे. इ. मासलेवाईक सूचना आल्या. असे न म्हणणे म्हणजे वकिली धंद्याची प्रतिष्ठा आपणच कमी करणे आहे. मुलाने बापाला नावाने हाक मारण्यासारखे आहे. अमगीहो अर्ग्युमेंटस झाली. तरुणांची बाजू घेऊन साठीच्या वकिलांनी बाजू मांडली. कोट-टॉय खेड्यात नको. मुंबईत चालेल. असलेही विक्षिप्त युक्तीवाद झाले. हवामानामुळे या युनिफॉर्मात कसे घामेजायला होते हे सांगणारे बहुनेकजण सुटाबुटातच होते. डेकोरम सांभाळायला हवा हेही मत दिसले. पण म्हणावे तसे तरुण वकील बोलले नाहीत. पुढे कोर्टातील भ्रष्टाचार व ज्युनिअर्सना संधी यावरील ठरावाचे वेळी मात्र दुसरे दिवशी तरुणात उत्साह संचारला

ज्युनियर कुणाला म्हणायचे? इथूनच वाद सुरू. एकाने काम करायची इच्छा आहे पण संधी नाही असे ठरविले तर दुसऱ्याने पहिली १५ वर्षे ज्युनिअरच असतो म्हटले. तर तिसऱ्याने वकील इन्कमटॅक्स किती भरतो यावरून ठरवावयास सुचविले. प्रकाश औटी, बाफना, गुळवणी धडाधड ज्युनिअर्स उठले. परंतु भाषा बंडाची नव्हती. तुकड्यांची होती. सांभाळून घ्यावे. फायनान्शियल गॅरंटी द्यावी, डिव्हीजन ऑफ लेबर करावे, सेशनला प्रसिद्ध असणाऱ्यांनी चॅप्टरला जाऊ नये वगैरे वगैरे करावे. मला मोठी गंमत वाटली. व्यापाऱ्यांनी कमी नफा घ्यावा, अशासारख्यात्र हा भाबडा आशावाद. सरळ सरळ राष्ट्रीयीकरणाची मागणी ही मंडळी मग का करीत नाहीत?

तेवढ्यात एक पुण्यातल्या वकील स्त्री उठल्या. सौ. अदिती वैद्य. १५ वर्षे प्रॅक्टीस करणाऱ्या सिनिअर्सनाच काही येत नाही. अर्ज कुठे द्यायचा? जज्जाकडे की शिरस्तेदाराकडे? हे कळण्यातच वर्ष जाते. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच वकिलीण स्त्रिया हजर होत्या. पुरुष प्रधान संस्कृतीवर जाम उखडलेल्या. लेबर ऑफीसर म्हणून कंपन्यात आम्हाला पोष्ट देत नाहीत. पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणून देत नाहीत. हे खरे तर घटनेविरुद्ध आहे. सेक्स डिस्क्रिमिनेशन आहे. तुम्हाला आर्मीत नर्स चालते मग कोर्ट मार्शलकरिता स्त्री वकीलीण का नाही चालत? किमानपक्षी घटस्फोटाच्या केसेस तरी– बायकांनी आपणहून आमच्याकडे यावे. पण सर्वांनाच वाटते. बायका कसल्या वकीली करणार? (कजाग, भांडकुदळ, चाणाक्ष इ. विशेषणे फुकटच देतात झाले.) कु. भाटिया व कु. दळवी या महिला तर लग्न न करता, करिअरीष्ट वकील बनण्याची भाषा करीत होत्या. विमेन लिबला अशा 'वकील' भेटल्या. मग आणखी काय हवे?

सर्वात वहारदार चर्चा झाली ती कोर्टातल्या भ्रष्टाचारावर. ओपनिंग बॅटसमन होते श्री. बाबा भिडे. चौकार, षटकार सुरू झाले. 'वकिलांनी आत्मपरीक्षण करावे, प्रतिष्ठित समजला जाणारा वर्ग आहे. पण दारू पिऊन कोर्टात येतात. अशीलाचे पैसे खाऊन कोर्टात भरीत नाहीत, तारखेला हजर रहात नाहीत. तरुण स्त्रीने वकीलाकडे जाण्याची सोय उरली नाही. मॅजिस्ट्रेट कारकुनाचे सहाय्याने पैसे खातात. वकीलपत्र यांना द्या सांगतात. पाच-पाच हजार मागतात. घेतात देतात. हिशेबाच्या जप्त केलेल्या वह्या कोर्टात बदलतात. शिरस्तेदाराला वकीलच लाचखोरीची सवय लावतात. ट्रायब्युनल-कडे जाण्याची सोय उरली नाही इतका भ्रष्टाचार आहे. प्रॉसिक्युटर पैसे खातात. अशील विचारतात एक्स्ट्रॉ काय लागेल ते सांगा. आपण सर्व चांगले आहात. मान्य आहे. पण स्वतः चांगले राहून भागणार नाही. दुसऱ्यालाही खाऊ देणार नाही म्हटले पाहिजे.

श्री. गोगटयांनी त्यांना साथ दिली. वकील उघड म्हणतात– मी पैसे खातो. द्या पकडून. ते शक्यच नसते. पण बोभाटा होतो. निकालावरून लक्षात येते. अमुक जज्ज पाहिजे. 'तजवीज' करा. व्यवस्था होते. वकिलांनी जज्जांचे दलाल बनू नये. (लोकमान्यांची तेजस्वी परंपरा लाभलेल्या व्यवसायाचे हे अधःपतन) श्री. सवाई हे त्यामानाने आशावादी सिनिअर 'गाठोडे का बरोबर न्यायचे आहे.' असले पुराणे आवाहन करीत होते. श्री. देवींनी डायरेक्ट ॲटॅक केला. पुण्यातल्या कुणा वकिलाला कशी मारहाण झाली. व चार हजाराची कशी गेम होती याचे वर्णन केले. सभागृहात कोडे ओळखावे तसे सर्वांनी जज्जाचे एकच 'नाव' घेतले. बरोबर आहे असाही गिल्ला केला.

मग उठला शिरूरचा तरुण, तडफदार वकील. श्री. कोठारी. त्याने पोटतिडीकीने सांगितले. आम्ही डरत नाही. मोर्चे काढले. आवाज उठवला. परिणाम? वर्षभर आमचेवर डूख धरला. ग्रामीण भागात एकच जज्ज तोच परमेश्वर. त्यावेळी तुम्ही शहरी आम्हाला कुठे संरक्षण देता? साधा मनाई दावा दाखल करायचा तर ५६ रुपये नव्वद पैशांचे तिकीट लागते. पण नाझरला १० रुपये, दिवाणी शिरस्तेदार ५ रु. नोटीशीच्या नकला करणाऱ्याला ५ रु.; बेलिफाला तर १० रुपयापासून ५०० पर्यंत वाटेल तेवढे. एवढे झाल्यावर वकिलाची फी द्यायला पैसेच उरत नाहीत एवढे होईपर्यंत अध्यक्षांची चुळबूळ सुरू झाली होती. एवढे खुल्लमखुल्ला बोलायचे म्हणजे काय? ठराव पास केला ठीक आहे. पण चर्चा रंगतच गेली. श्री. परांजपे म्हणाले ठराव नपुसक आहे. लाच खाणाऱ्या जज्जावर बहिष्कार घाला. 'नपुसक' शब्दावर बाबा भिडे व परांजप्यांची थोडा वेळ जुगलबंदी झाली. सर्वांनाच वैयक्तिक अनुभव सांगायचे होते. बोलायचे होते. मग गडबड गोंधळ सुरू झाल्याने सर्वानुमते ठराव पसार करण्यात आला. भिडे-गोगटे-आगरवाल कमिटीची नियुक्ती झाली. भाषणे जोरदार झाली. उपाय मात्र नेहमीचाच आजवर हमखास अयशस्वी ठरलेला.

घटनेच्या ठरावाने वेळ बराच खाल्ला. मग ताऽऽरांऽऽबळ म्हटल्या-वर जशी लगीनघाई उडते तसे उरलेले सर्व ठराव चर्चा न घडता वाचून पसार करण्यात आले. लॉचा अभ्यासक्रम पुस्तकी आहे. असा ठराव होता. त्यावर एक्सटर्नली लॉ करू द्यावे अशी अमेंडमेंट येणार होती. पण आलीच नाही. नाहीतरी बहुतेक सर्व नोकऱ्या करतात. कधीच कॉलेजात जात नाहीत, व झाबवाला गाईडे शेवटचे वीस दिवस वाचून पास होतात. इति बहुसंख्य तरुण वकीलवर्ग. बंद घेरावचा वादग्रस्त ठरावही चर्चेशिवायच पसार झाला. माझ्या विनंतीवरून ॲडव्होकेट बाजीराव कांबळेयांनी अस्पृश्यतानिवारण कायद्यासंबंधी ठराव दिला होता. परंतु वेळेअभावी आंबेडकर जयंती-दिनी त्यास फाटा देण्यात आला. चर्चा घडली नाही. मागाहून सब्जेक्ट कमिटी पास करील असे कळले. ठराव फेटाळला गेला नाही. हे नशीब.

परिषदेला जमलेली मंडळी एकंदर व्यवस्थेवर मात्र खूश दिसत होती. फळांच्या डिशेस भरपूर, अर्थात् सिनिअर्सना पाचशे रुपयांना काटल्यामुळे ते वैतागले असणार. पण जेवणावेळीचा कायदा वकिलांनीच मोडणे बरे नव्हे म्हणून केवळ फलाहार होता. स्वस्त दरात इतर पदार्थही होते. पन्हे-चहा फुकट. दोन नाटकांनीही बहार आणली. आणि परिषदेचे सूप वाजले. ☐ ☐

# पुन: एकदा सोल्झेनित्सिन

वा. दा. रानडे

हद्दपार रशियन लेखक अलेक्झांडर सोल्झेनित्सिन यांनी सप्टेंबर १९७३ मध्ये म्हणजे सात महिन्यापूर्वी रशियन नेत्यांना लिहिलेले एक पत्र नुकतेच माझ्या वाचनात आले, सबंध पत्र येथे देणे शक्य नाही कारण पत्राच्या स्वरुपात लिहिलेला तो एक प्रदीर्घ लेखच आहे. पण त्यातील महत्वाचे मुद्दे येथे देऊन त्या अनुषंगाने माझे काही विचार मांडीत आहे.


सोल्झेनित्सिन यांच्या विरुद्ध रशियाने जोरदार प्रचार मोहीम का उघडली, त्यांना हद्दपार का करण्यात आले याची कल्पना या पत्रात त्यांनी, व्यक्त केलेल्या मतांवरून येते. सोल्झेनित्सिन यांच्या मते यापुढच्या काळात रशियाला सर्वात मोठा धोका चीनशी युद्धाचा आहे. हे युद्ध व्हिएतनाम युद्धाप्रमाणे दीर्घकाळ कमीत कमी दहा ते पंधरा वर्षे चालेल. त्यात किमान सहा कोटी रशियन बळी पडतील असा त्यांचा अंदाज आहे. ते लिहितात, 'या युद्धानंतर रशियन जनतेचे या युद्धावरील अस्तित्त्व जवळ जवळ नष्ट झालेले असेल याचाच अर्थ रशिया युद्ध पूर्णपणे हरेल. ही हानी असेल विचारप्रणाली मधील युद्धातली आणि तीही एका मृत विचारप्रणालीसाठी. सर्वसामान्य चिनी माणसाबद्दल ही सहानुभूती वाटते. कारण या युद्धाचे सर्वात असहाय्य बळी ते ठरणार आहेत. हे युद्ध होऊ देता कामा नये. ते जिंकणे कोणालाच शक्य नाही. तेव्हा ते टाळणे हे आपलें कर्तव्य असले पाहिजे. या युद्धाकडे आपण झुकत आहोत त्याचे मुख्य कारण वैचारिक आहे. कम्युनिझमचे खरे पुरकर्स्ते कोण याबद्दल चिनी नेत्यात आणि तुमच्यात (रशियन नेत्यात) गेली पंधरा वर्षे संघर्ष चालू आहे. चीनला त्यांची विचार प्रणाली देऊन टाका. काही काळ त्यांना तिचा अभिमान बाळगू द्या. अपूर्ण आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्यांचे ओझे त्यांना आपल्या खांद्यावर घेऊ द्या! आपल्यातील संघर्षाचे मुख्य कारण दूर झाल्यावर जगातील संघर्षाचे अनेक प्रश्नही निवळून जातील आणि लष्करी संघर्ष मग फार दूरची शक्यता होईल. कदाचित तो होणारही नाही.

सोल्झेनित्सिन यांचा हा सल्ला रशियन नेत्यांना पटणे शक्यच नव्हते. कोणाही मार्क्सवाद्यास तो पटणार नाही. मार्क्सवाद्यांची काही भाकिते चुकली असतील, धोरण कार्यक्रम कार्यपद्धतीत काही चुका झाल्या असतील पण सबंध मार्क्सवाद किंवा कम्युनिझम ही त्यामुळे मृतविचारप्रणाली कशी ठरते? आणि ही विचारप्रणाली मृत असेल तर जगातील चाळीस टक्के लोकसंख्येचा प्रदेश तिच्या प्रभावाखाली अजून राहिला कसा? तेव्हा कम्युनिझमचा रशियाने त्याग करावा हे सोल्झेनित्सिन यांचे मत रशियाची आजची धोरणे न पटणाऱ्या मार्क्सवाद्यांना सुद्धा मान्य होणार नाही. (येथे मार्क्सवादी शब्द मार्क्सचा समाजवाद मानणारा समाजवादी या व्यापक अर्थाने वापरला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्टपक्षाचे सभासद या अर्थाने नव्हे.)

सोल्झेनित्सिन केवळ कम्युनिझमचाच त्याग करा एवढे सांगून थांबत नाहीत तर आर्थिक प्रगतीचाच त्याग करा असे सांगत आहेत. सतत आर्थिक प्रगतीच्यामागे लागल्याने मानवी संस्कृतीच नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. आर्थिक प्रगतीचे उद्दिष्ट सोडले नाही तर इ. स. २०२० ते २०७० या दरम्यान म्हणजेच पुढच्या शतकात मानवजात नष्ट होईल. पृथ्वीवरील नैसर्गिक साधन संपत्तीचे साठे झपाट्याने संपुष्टात येऊ लागले आहेत. तेल २० वर्षापेक्षा अधिक काळ, तांबे १९ वर्षापेक्षा अधिक काळ, पारा बारा वर्षापेक्षा जास्त काळ, पुरणार नाही. आणखी बरीच नैसर्गिक साधने जवळ जवळ संपत आली आहेत. इंधन शक्ती आणि पाण्याचे साठे फार मर्यादित आहेत. सध्यापेक्षा दुप्पट किंवा तिप्पट नवे साठे आपण शोधून काढले, शेती उत्पादन दुप्पट वाढविले, अणुशक्तीचा जास्तीत जास्त उपयोग केला तरीही एकविसाव्या शतकाच्या पहिल्या काही दशकात मानवजातीचा सामुदायिक विनाश होईल. नैसर्गिक साधनांचे साठे संपल्याने उत्पादन थांबून हा विनाश होईल किंवा उत्पादन प्रचंड वाढल्यामुळे वातावरणाचा विनाश होऊन हा संहार होईल. आर्थिक प्रगतीची कल्पना मानवजातीने सोडली नाही तर आपल्या हयातीतच ही सृष्टी जगण्यास अपात्र होईल. तेव्हा मानव जातीला वाचवायचे असेल तर तंत्र शास्त्राचा अवलंब स्थिर अर्थव्यवस्थेची उद्दिष्टे गाठण्यासाठी येत्या २० ते ३० वर्षात केला पाहिजे आणि त्याची सुरुवात आतापासूनच करावी लागेल. टेलहार्ड डी चार्डिन सोसायटी आणि क्लब ऑफ रोम यांच्या प्रयत्नाने शास्त्रज्ञांचे हे निष्कर्ष प्रसिद्ध करण्यात आले. सोल्झेनित्सिन यांना ते मान्य असून आर्थिक प्रगतीचे उद्दिष्ट सोडून स्थिर. अर्थव्यवस्थेचे आणि शून्य विकासाचे उद्दिष्ट पुढे ठेवा असे त्यांनी प्रतिपादले आहे.

शास्त्रज्ञांचे हे निष्कर्ष धोक्याचा इशारा म्हणून जरूर विचारात घेतले पाहिजेत. पण आर्थिक विकासाची चाकेच बंद करणे हा सोल्झेनित्सिन यांनी त्यावर सुचविलेला उपाय पटणारा नाही. जगाचा बराच मोठा भाग अजून अविकसित आहे. विकसित राष्ट्रांनी आपली साधन संपत्ती स्वतःच्या विकासासाठीच, मुख्यत: खर्च केल्याने आणि वातावरण प्रदूषित होऊ नये यासाठी पुरेशी काळजी न घेतल्याने सध्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. विकसित राष्ट्रांनी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा किमान एक टक्का भाग अविकसित राष्ट्रांच्या विकासासाठी द्यावा असा ठराव यूनोने केला पण ही किमान मदतसुद्धा फार थोड्या राष्ट्रांनी केली. अविकसित राष्ट्रांच्या विकासाचा फार मोठा प्रश्न जगापुढे आहे. आर्थिक विकासाचे उद्दिष्ट सोडून देऊन हा विकास कसा साधता येईल? तेव्हा सोल्झेनित्सिन यांचे मत मार्क्सवाद्यांना तर नाहीच पण जगातील कोणाही समाजवाद्यास मान्य होणार नाही.

सोल्झेनित्सिन यांच्या प्रदीर्घ पत्रातील वैचारिक दृष्टया महत्वाच्या वाटलेल्या दोन मुद्यांचाच येथे विचार केला आहे. ☐



रघुवीर मुळे

# असेही किस्से निवडणुकीतले

भारतीय लोकशाहीमधली कोणतीही निवडणूक असो. सत्ता आणि संपत्तीचा वापर येनकेन मार्गाने जसा होतो तसा वेगवेगळ्या युक्त्या लढवूनही निवडणुका जिंकल्या जातात. त्या युक्त्यांची झलक दाखविणारे आमच्या जिल्ह्यातले हे किस्से.

सिन्नर हा नासिक जिल्ह्यातला तालुका. सुप्रसिद्ध विडी कारखानदार श्री. शंकरशेठ वाजे यांनी काँग्रेस पक्षाकडे गेल्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी तिकीट मागितले होते. त्यांना पक्षाने तिकीट नाकारल्यानंतर ते स्वतंत्र उभे राहिले. निवडणुकीत जातीय राजकारण येणे अपरिहार्य असते. सिन्नर तालुक्यात वंजारी समाजाची मते जवळजवळ ३०–३५ टक्के आहेत. त्यामुळे हा 'ब्लॉक' जिकडे झुकेल तिकडे यश निश्चित हे ठरूनच गेले आहे. त्यातही श्री. वाजे यांच्याविरुद्ध श्री. रामकृष्ण नाईक यांना काँग्रेस पक्षाने उभे केले होते. श्री. नाईक यांची जात वंजारी. त्यामुळे हा 'ब्लॉक' त्यांच्या पाठीशी नाही म्हटले तरी उभा राहणे अपरिहार्य होते. श्री. नाईक यांची उमेदवारी घोषित होण्यापूर्वी त्यांचा सिन्नरशी काहीही संबंध नव्हता म्हणून 'पाहुणा उमेदवार नको' असा प्रचार प्रथम केला गेला. इंदिरा लाटेच्या प्रभावापुढे हा प्रचार थिटा पडत गेला तेव्हा इलेक्शन जातीयवादावर गेले. वाजे हे मराठा समाजातील प्रतिष्ठित गृहस्थ. शिवाजी महाराजांचे नाव घेऊन, त्यांच्या आणाभाकांनी वाजे यांना निवडून देण्याचे आवाहन करण्यात आले. एका गावात तर जाहीर सभेत त्यावेळचे तालुका पंचायत समितीचे सभापती श्री. सूर्यभान गडाख यांनी भाषणातून छत्रपतींच्या काव्यमय गौरवाची पायरी गाठली. आपल्या भाषणातून त्यांनी 'अशीच असती आई आमुची सुंदर रूपमती, आम्हीही झालो असतो सुंदर, वदले छत्रपती' या काव्यपंक्तीचा उल्लेख केला. ही सभा आटोपते न आटोपते तोच गावात काँग्रेस पक्षाची सभा सुरू झाली. जातीय राजकारण करून मते मागणाऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा अधिकार नाही असे एका वक्त्याने आपल्या भाषणातून तर सांगितलेच पण सभापतींच्या काव्याला काव्यानेच उत्तर दिले ते असे– 'कुठे छत्रपती आणि कुठे सभापती ? 'अशीच असती बाई आमुची सुंदर रूपमती, पोरेही सुंदर झाली असती वदले सभापती !' श्रोत्यांनी अर्थात दाद दिली आणि नंतर मतेही दिली.

इगतपुरी तालुक्याचा समावेश हा आदिवासी तालुक्यात होतो. तेथे ठाकूर, कुणबी आदी जमातींची लोकसंख्या जास्त आहे. जिल्हा परिषदेच्या एका जागेसाठी जबरदस्त मराठा उमेदवार उभा होता. त्याच्यावर कुणबी समाजाचे प्रेमही होते. तथापि त्याच्याविरुद्ध कुणबी समाजाचाच उमेदवार उभा राहिल्याने भीती होतीच. ही भीती वस्तुतः जाहीर सभेतून व्यक्त करण्याची काहीही गरज नव्हती. पण एका अतिउत्साही वक्त्याने भाषणात सांगितले. आपला उमेदवार अस्सल मराठी बाण्याचा, मराठी रक्ताचा आहे, तो निवडून येणारच. उलट 'तो' कुणबी ! कोणाचं बी ? कोण जाणे ? याचा परिणाम व्हायचा तोच झाला. अस्सल मराठी बाणा पराभूत झाला.

हा किस्साही इतपुरी तालुक्यातलाच. सुप्रसिद्ध समाजवादी कार्यकर्ते श्री. जो. सिमॉईस यांच्याविरोधी त्यावेळी विधानसभेसाठी काँग्रेसचे (सध्या भाक्रांदचे आमदार) श्री. मूळचंद गोठी हे उभे होते. दोघेही लोकप्रिय, पैशानेही सारखेच. आदिवासींच्या प्रश्नावर झगडण्यात दोघेही आघाडीवर. त्यामुळे जिल्ह्यात या लढतीबद्दल शेवटपर्यंत औत्सुक्य होते. श्री. जो सिमॉईस हे नाही म्हटले तरी ठाकूर या आदिवासी जमातीचे लोकप्रिय नेते होते. त्यांची मते खेचून आणणे काँग्रेसला कठीण होते. कारण ठाकूर जमात पैशाला विकली जाणारी जमात नाही. मग एक खाशी युक्ती सुचली. ठाकूर जमात ही शिकारी जमात. त्यातल्या त्यात रानातून रानडुकरे मारून त्याचे सामुदायिक वनभोजन म्हणजे या लोकांचा परमानंद. काँग्रेसवाल्यांनी प्रत्यक्ष मतदानाच्या आदल्या दिवशी ९–१० रानडुकरे छोटी-मोठी मोठ्या मुश्किलीने जमविली. आणि मतदानाच्या आदल्या रात्री पाड्या पाड्यातून सोडून दिली. पहाटे रानडुकरांची टोळी जंगलात आल्याची माहिती वेगाने पसरली. शिकारीची तयारी झाली आणि सगळे ठाकूर 'मतदार' शिकारीत गुंतले. ते मतदानाला आलेच नाहीत. याचा परिणाम ठाकूरांचा पाठिंबा असलेले सिमॉईस

पडले. (की रानडुकरांनी त्यांचीच शिकार केली ?)

परिषदेच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला होता. उमेदवाराची गर्दी नामनिर्देशनपत्रे भरण्यासाठी वाढत होती. शेवटच्या दिवशी ही गर्दी वाढते. याचे कारण असे की कोणी कोणी फॉर्म भरला, त्याचे डमी व पाठीराखे कोण ? आणि मागे कोण जाईल. (उमेदवारी मागे घेणे) व कच्चे कोण पडतील याचा अंदाज त्याच दिवशी येतो. मग शह-काटशह ठरला जातो. इलेक्शनसाठी भरावयाचे डिपॉझिट चलनाने ट्रेझरीत भरावयाचे असते. एका मतदार संघात मात्र अर्ज बरेच कमी आले होते. पण शेवटच्या दिवशी कोण पुढे येईल हे सांगणे कठीण होते. आणि व्हायचे तेच झाले. ज्या विरोधपक्षीय जबरदस्त कार्यकर्त्याने फॉर्म भरला तेवढाच जबरदस्त उमेदवार शेवटच्या दिवशी कॉंग्रेसने उभा करण्याचे ठरविले. फॉर्म भरण्यासाठी मंडळे जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीत आली व एका विश्वासू कार्यकर्त्याकडे डिपॉझिटची रक्कम देऊन त्याला चलन घेऊन ट्रेझरीत पाठविण्यात आले. आता विरोधपक्षीयात खळबळ उडाली होती. सामना जवळजवळ अटळ होता. विरोधी पक्षातील एका कार्यकर्त्याला युक्ती सुचली. तो सरळ ट्रेझरीत आला. आदिवासी विभागासाठी पांढरी चलनपत्रे चालत नाहीत, नाहीतर अर्ज नामंजूर होतील असे त्याला सांगून रंगीत चलनासाठी दीड तास हिंडवले आणि डिपॉझिट भरायचे तर नोटा कशाला आणल्या ? दहा पैशांची नाणीच हवीत असाही उपदेश केला. बिचाऱ्या आदिवासी विभागातील कार्यकर्त्याला याची कल्पना नव्हती. तो फसला. एवढेच नव्हे तर 'योग्य' माहिती दिल्याबद्दल त्याने आभारही मानले. आणि ५० रुपयांची दहा पैशांची नाणी घेण्यासाठी स्टेटबँकेत रांगेत उभा राहिला. नाणी मिळण्यास अर्थातच उशीर लागला. काय चाललेय याची उमेदवाराला अर्थातच कल्पना नव्हती. तो कचेरीत वाटच पहात होता. अखेरी जेव्हा नाणी व रंगीत चलने मिळाली तेव्हा त्या भोळ्या कार्यकर्त्याने सुटकेचा व समाधानाचा सुस्कारा सोडला. पण एव्हाना चलने भरण्याची ट्रेझरीची वेळ संपून गेली होती. डिपॉझिटच भरले गेले नसल्याने उमेदवारीचा प्रश्नच उरला नव्हता.

सर्वसाधारणपणे कोणताही पक्ष तिकिटांचे वाटप करताना त्या त्या मतदारसंघातील जाती-जमातींची बहुमत संख्या लक्षात घेऊनच उमेदवार उभे करतो. तथापी कधी कधी पक्षाचा जबरदस्त कार्यकर्ता जो त्या बहुमतवाल्या जन-जातीचा नाही तो तिकिटासाठी हटून बसतो. येनकेन प्रकारे त्याचा 'क्लेम' तिकिटासाठी असल्याने त्याला डावलणे शक्य नसते. मग अशावेळी सामनेवाल्याने डोके चालवले तर तो यशस्वी होतोच. याचे उदाहरण घोटी या नासिक जिल्हा परिषद मतदार संघातलेच पहा. या मतदार संघात आग्री समाज जवळ जवळ ७० टक्के आहे. तेथे कॉंग्रेसचे श्री. वालझाडे (तेली) यांनी तिकीट मागितले. बराच ऊहापोह झाला. वालझाडेंऐवजी आग्री समाजातीलच एखाद्या तरुण कार्यकर्त्याला तिकीट द्यावे असा एक सूर निघाला. या सुरात आदिवासी समाजातील तरुणाला संधी देण्याची इच्छा नव्हती तर हमखास बहुमत खेचता येईल असे तंत्र होते. अखेर श्री. वालझाडे हे जरी तेली समाजाचे असले तरी आग्री समाजात त्यांचे कार्य चांगले आहे म्हणून त्यांनाच तिकीट देण्यात आले. फॉर्म भरण्यासाठी मोठ्या संख्येने आग्री समाज तहसिलदार कचेरीतही आले होते. विरोधकही ते दृश्य पाहून गप्पगार झाले. पण कोणतीही जागा कॉंग्रेसला बिनविरोध जाऊ न देणे ही तर जिल्ह्याची परंपरा. अखेरी तीन महिन्याला २५ रुपये पगार घेणाऱ्या एका छोट्या कार्यकर्त्याला उभे करण्यात आले. त्यांचे नाव फसाळे. श्री. फसाळे हे पोलीस पाटील म्हणून काम करीत होते. त्यांनी राजीनामा देऊन वालझाडे यांच्या विरोधात फॉर्म भरला. वस्तुत: इलेक्शन टेंपो तयार होऊनही आग्री समाज आपल्या जमातीच्या उमेदवाराच्या मागे आला नाही. तो कॉंग्रेसचे श्री. वालझाडे यांच्याच मागे. विरोधक चिंतातूर असतानाच कॉंग्रेसनेच त्यांना एक नामी संधी दिली. वालझाडे यांना तेली समाजाने बैठक घेऊन पाठिंबा व्यक्त केला. गाड्या दिल्या, पैसा दिला आणि दुसऱ्या दिवशी गावागातून बोंब झाली की, समाज अखेरी समाजाला मिळाला आणि आग्री लोकांना टिपरी पाजून त्यांची मते घेऊ (टिपरी म्हणजे टिंक्चरपासून, फ्रेंच पॉलिशपासून तयार केलेली दारू) असे वालझाडे तेली समाजाच्या बैठकीत बोलले आणि मग मात्र सगळा आग्री समाज पेटून उठला. आम्ही एवढे लाचार आहोत का ? हाच प्रश्न जाहीर सभेतून फसाळे विचारू लागले व हा कलंक धुवून काढण्याचे आवाहन त्यांचे कार्यकर्ते करू लागले. खरे खोटे करण्याच्या भानगडीत कोणीच पडले नाही. कॉंग्रेसला आपली जागा गमवावी लागली.

विधानसभा निवडणुकीच्या वेळचा इगतपुरी मतदार संघातील आणखी एक किस्सा. जो सिमॉईस (समाजवादी) विरोधी मूळचंद गोठी (कॉंग्रेस) हा सामना. इगतपुरी विभागातील आदिवासींना फॉरेस्टच्या जमिनी मिळवून देण्यासाठी सिमॉईस यांनी आंदोलन उभारले होते. हा प्रश्न आदिवासींच्या जीवनमरणाचा असल्याने सिमॉईस यांच्या पाठीशी आदिवासी वर्ग उभा होता. इलेक्शनचे वातावरण दिवसेंदिवस रंगत होते खरे आणि समाजवादी पक्षाचा जोरही वाढत होता. हा तालुका ४८ सालापासून (भाताचा लढा) कॉंग्रेसविरोधीच आहे. कॉंग्रेसच्या बाजूचे श्री. गोठी हे शिकस्तीचे प्रयत्न करीत होते आणि मग निवडणुकीच्या आधी चित्र एकाएकी उलटले. आदिवासी झाडाकडून बैल जोडीकडे आकर्षिले जाऊ लागले. हा चमत्कार कसा घडला ? तीही एक युक्ती (आणि शुद्ध बनवाबनवीच होती) कॉंग्रेसच्या एका डोकेबाज कार्यकर्त्याने नासिकला जाऊन नासिक जिल्हा, त्यातील १३ तालुके, महाराष्ट्र, भारत, जग असे २५-३० नकाशे मिळतील ते विकत आणले. कॉलेजमध्ये जाणारी वीस एकवीस मुले गोळा केली. त्यांना फॉरेस्टर बीट गार्ड असे ड्रेस दिले. पाच जीपगाडयांतून या २० लोकांची विभागणी केली. प्रत्येक जीपमध्ये एक काथ्याचा बंडल, टेप, चुन्याचा डबा दिला आणि गावागावातून या जीप फिरू लागल्या. (बनावट) फॉरेस्टर-बीटगार्ड गावात जाऊन ग्रामस्थांनी सरकारी मालकीच्या जमिनीत कुठे कुठे पेरा केला ते विचारू लागले व सांगितले, आत्ताच हुकूम आला आहे, त्या जमिनी तुम्हाला देऊन टाकायला सांगितले आहे. जग-भारत-महाराष्ट्राचा नकाशा उगाचच चाळवला जाऊ लागला. ज्यांनी ज्यांनी प्लॉट केला

तेथे खुंट्या ठोकून चुन्याने आखण्याही झाल्या व जाताना ही मंडळी आदिवासींना आवर्जून सांगू लागली, "गेले १० वर्षे तो सिमॉईस नुसता बोंबलतोय. पण कॉंग्रेस किती कनवाळू आहे पहा. एका फटक्यात प्लॉट दिले." परिणाम बैलजोडीच्या घोडदौडीत झाला.

नासिक जिल्ह्यातील सर्वात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती नासिकची. त्यात पेठ, सुरगण्णा, नासिक व दिंडोरी या चारही तालुक्यांचा समावेश होतो म्हणून चुरसही अधिक. संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच झाली होती. अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवड करण्यासाठी संचालक मंडळाची बैठक बोलावण्यात आली. प्रत्येकालाच खुर्ची मिळावी असे वाटत होते. पण एकमताने जर निवड झाली तर चांगले असेही सर्वांनाच वाटत होते. शेवटी एका ज्येष्ठ सदस्याने प्रास्ताविक करून विचारले की ज्यांना चेअरमन–व्हाईसचेअरमन होण्याची इच्छा असेल त्यांनी हात वर करावा. जवळजवळ १४ संचालकांपैकी ११ जणांचे हात वर झाले. दोन जागांसाठी ११ जण. एकमत होणार कसे. तिघांचे मात्र हात खालीच होते. त्यांना पदाची अपेक्षा नव्हती. त्यातले एकजण श्री. उत्तमराव चव्हाण हे नगराध्यक्ष या नात्याने पदसिद्ध संचालक म्हणून तेथे असल्याने त्यांना खुर्ची मिळणार नव्हतीच. आता या अकरा जणातून कोणास अध्यक्ष, उपाध्यक्ष करायचे? हा पेच कसा सोडवायचा? शेवटी ज्यांनी खुर्ची मिळण्यासाठी हात वर केले नाहीत अशा दोघांनीच लवादाचे काम करावे व निर्णय द्यावा असे ठरले. त्यात नगराध्यक्षही होते. सर्वश्री आबासाहेब गायधनी, संपतराव पाटील (हात वर न केलेले) व उत्तमराव चव्हाण असे तिघे एक-दीड तास 'खल' करीत बसले. लवादाचा निर्णय एकमताने सर्वांनी मान्य करायचा हे तर आधीच ठरले होते. आणि नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याचा अवधी संपण्याच्या आत 'लवादाचा निवाडा बाहेर आला. लवादानेच आपले अर्ज दाखल केले व दोन खुर्च्या दोघात वाटून घेतल्या. बाकीचे ११ बिचारे करणार काय? लवादाचा निर्णय एकमताने मान्य करणे भागच होते. दोन मांजरे व माकड यांच्या लोण्याच्या गोळ्याच्या वाटपाची गोष्ट अशा रितीने प्रत्यक्षात उतरली होती,

सिन्नर तालुक्याचे ठिकाण. नगरपालिकेच्या निवडणुका आटोपल्या होत्या. नगराध्यक्षपदाची निवडणूक जवळ आली. तशी उत्सुकता शहरात होतीच पण श्री. मोठाभाऊ गोळेसर यांची बहुमतवाली पार्टी विजयी झाल्याने तेच नगराध्यक्ष होणार हे जवळजवळ निश्चित झाले होते. अल्पमतवाली विरोधी मंडळी निवडणूक बिनविरोध होऊ द्यायची नाही या तात्त्विक विरोधासाठी उमेदवार उभा करणार पण तो पडणार हेही ठरलेच होते. तहशिलदार वेळेवर आले. त्यांनी नगराध्यक्षपदाच्या जागेसाठी सूचना मागविल्या. अल्पमतवाल्या पार्टीने बहुमतपार्टीचे नेते श्री. गोळेसर यांचे नाव सुचविले. बहुमत पार्टीचे लोक-नगरसेवक थोडे गोंधळले. आपला उमेदवार यांनी कसा सुचविला? पण बरे झाले. आपला न् त्यांचा उमेदवार जर एकच त्याअर्थी श्री. गोळेसर बिनविरोध निवडून नगराध्यक्ष होणार म्हणून बहुमतवाली पार्टी गप्प राहिली त्यांनी उमेदवार सुचविलाच नाही. नंतर अल्पमतवाल्या पार्टीतल्याच एकाने त्यांच्यापैकी एकाचे नाव सुचविले. आता पुढे काय होणार हे चित्र स्पष्टच होते. मतदान होणार व बहुमताने श्री गोळेसर हे निवडून येणार हे जाहीर होईल. पण मधला 'कात्रज-घाट' बहुमतवाल्या पक्षाच्या लक्षात आला नाही. तहसिलदारांनी सांगितले, दोन सूचना आलेल्या आहेत. कोणाला आपली सूचना मागे घ्यायचीय काय? अल्पमतवाली पार्टीचे सूचक उभे राहिले व श्री. गोळेसर यांची सूचना मी मागे घेतो म्हणून सांगितले, आणि अल्पमतवाल्यांचा प्रतिनिधी नगराध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करावे लागले. असे हे राजकारण. पैशाने कमी यशस्वी होते, डोक्याचेच काम जास्त.

□ □

## श्री. विष्णुबाबा ब्रह्मचारी यांची दीडशेवी जयंती

गेल्या शतकातील एक साक्षात्कारी पुरुष आणि हिंदुसमाज सुधारक श्री. विष्णुबाबा ब्रह्मचारी (श्री. विष्णु भिकाजी गोखले) यांची दीडशेवी जयंती पुढील वर्षी (ऑगस्ट १९७५ मध्ये) येतआहे. त्या निमित्ताने, त्यांच्या कार्याबद्दल व विचारांबद्दल आस्था असणारी अनेक मंडळी शिरवली (ता. माणगाव, जि. कुलाबा) या त्यांच्या जन्मग्रामी जाऊन आली. शिरवली येथे श्री. विष्णुबाबांनी स्थापिलेल्या श्रीदत्त पादुका असून, तेथे त्यांच्या घराण्याच्या वास्तूची जागाही आहे.

शिरवली येथे आलेल्या मंडळीत पुण्याचे संशोधक श्री. रा. चिं. ढेरे, श्री. प्रभाकर कुलकर्णी (डेक्कन कॉलेज, पुणे), नागपूरचे प्रा. बाळासाहेब सकदेव यांचा समावेशहोता. ग्रामस्थ मंडळी, तसेच गोरेगाव, माणगाव भागातील आणि पुणे, मुंबई व नागपूर येथील काही प्रतिष्ठित लोक यांची सभा श्री. मोरोपंत पिंगळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत शिरवली येथे विष्णुबाबांचे स्मारक करण्याचा संकल्प सर्वानुमते प्रकट झाला. स्मारकाचे कार्य मार्गी लावण्यासाठी या सभेत एक अस्थायी स्मारक समिती स्थापन झाली. लवकरच या समितीचे एका रीतसर विश्वस्त संस्थेत रूपांतर होणार आहे. यत्या महाशिवरात्रीस श्री. विष्णुबावांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने शिरवली येथे एक मेळावा भरवून, स्मारकाच्या कार्यास विशेष चालना द्यावी, असा विचार ठरला. बाबांच्या दीडशव्या जयंतीच्या निमित्ताने त्यांचे चरित्र आणि निवडक विचार संपादून प्रकाशित करण्याचे काम श्री. रा. चिं. ढेरे यांनी सुरू केले आहे.

या निमित्ताने बाबांविषयीच्या आठवणी, आख्यायिका, दुर्मिळ कागदपत्रे, ग्रंथ आणि स्मारकयोजनेच्या पूर्तीसाठी देणग्या पाठविण्यासाठी जनतेस आवाहन करण्यात येत आहे. साधने व निधी देऊ इच्छिणाऱ्यांनी पुढील पत्त्यांवर संपर्क साधावा.

१. हरि विनायक दात्ये, हिंदुस्थान साहित्य, ३०९, शनिवार पेठ, मोतीबाग, पुणे ३०.

३. श्री. नरहर विष्णु परांजपे, मु. पो. शिरवली, ता. माणगाव, जि, कुलाबा.

३. मुकुंद आबाजी परांजपे, १०२–बो, माधवबाडी, नायगाव क्रॉस रोड, दादर मुंबई–१४.

सूर्योदयाचा समय. पण सूर्य नाही. ढगच ढग. अक्राळ विक्राळ. अनेक थर ढगांचे, एकावर एक. भल्या पहाटेच अंधारलेलं आकाश, क्रुद्ध समुद्रा सारखं खवळून उठलेलं.

हिमालयाहूनही विशाल, अजस्र मेघ अंगात आल्यासारखे, झपाटलेले. उन्मत्त हत्तींसारखे माजलेले. पहाटे पालथ्या आकाशाची घागर फुंकतेय. सोसाटयाचा वारा, ढगांचे हजारो फूट उंच ढीग उन्मळून टाकतोय. ढगावर ढग आदळताहेत. प्रचंड गडगडाट होतो आहे.

माझे विमान या झंझावात सापडलेले आहे. निसर्गाच्या या चेटुकी अवताराने मी मंत्रमुग्ध झालो आहे. माझे शक्तिशाली विमान निसर्गाच्या प्रचंड आवेगापुढे क्षुद्र ठरत आहे. असहायपणे झगडत आहे. केविलवाणी धडपड करीत आहे; वावटळीत सापडलेल्या, सुकल्या पानासारखी.

अन विमानात बसलेला, मंतरलेला मी मृत्यूशी झुंज देतोय, निकराची. पराकाष्ठा करतोय प्रयत्नांची, हे वादळ ओलांडून पलीकडे जाण्याकरता. मला तिकडे पोहचायचय; हिमालयाच्या अगदी आत असलेल्या, अरुणाचलातील त्या अरुंद खोल दरीच्या उतारावर वसलेल्या, सीमांत छावणीवर.

तेथे तो मरणासन्न अवस्थेत पडलेला आहे. आपल्या सैन्यातील एक जवान, नायक विक्रम सिंग. प्राण घातक इजा होऊन, तो बेशुद्धावस्थेत पडून आहे. त्याची केस छावणीतील डॉक्टरांच्या हाताबाहेर गेलेली आहे. आता एका तासाच्या आत त्याला तेथून आणून बेस वरील हॉस्पिटलात नेले नाही, तर तो निश्चित मरेल. विमान ताबडतोब तेथे उतरवून, त्याला विमानातून बेस वर आणून, तातडीने बेस हॉस्पिटलात पोहोचावयाचे आहे. म्हणूनच मी तिकडे निघालो आहे विमान घेऊन.

पण हे तुफान माझी वाट अडवतेय. हा झंझावात मला रोखून धरण्याचा प्रयत्न करतोय. या वादळाने मला वेठीस धरले आहे. वास्तविक काय संबंध माझा नि त्या जवानाचा! तो सैन्यातील एक जवान नि मी वायुदलातील एक वैमानिक, एवढाच! की, छावणीतील त्या छोटया धावपट्टीवर पूर्वी मी अनेकदा विमान उतरविले, तेव्हा



मला थकलेला पाहून तो स्वतःच्या हाताने गरमागरम चहा बनवून आणून देत होता, हा! की, बरेचदा मी त्याच्या घरून आलेली पत्रे त्याला आठवणीने पोचवलीत, तेव्हा तो कृतज्ञतेने म्हणायचा 'आप बहुत अच्छे है साहब, भगवान आपको लम्बी उमर दे', हा!

काहीही असो, त्याचा जीव वाचवायसाठी मी स्वतः येथे मृत्यूशी झुंजतोय. काही तरी ऋणानुबंध तर निश्चितच असतील त्याचे नि माझे..................त्याच्या आयुष्याची दोरी बळकट असेल तरच, सुखरूप निघेन मी या तुफानी झंझावातातून. नाही तर कठीणच आहे. फक्त प्रयत्नच माझ्या हाती आहेत, ते मी करतोच आहे. निर्णय नियतीच्या हाती आहे, निर्णय नियतीच्या हाती आहे! ईश्वराच्या आधीन आहे!

*

तशी कालची दुपार नेहमी सारखीच होती. अप्परअसम विभागील एक थंड दुपार. सकाळपासून सतत सात तास उड्डाण करून मी शिणलो होतो. दमून टारमॅकवर बसलो

होतो. अजून दोन तासाच्या उड्डाणाची एक फेरी करावयाची होती. पण हवामान बिघडत चालले होते. आभाळ भरून आलेले होते. दुरून वादळ उफाळून येत होते. उड्डाणाची शक्यता दिसत नव्हती.

मी नजरेने दूरवरची डोंगराळ क्षितिजे न्याहाळीत होतो आणि माझे मन कंट्रोल टॉवर वरच्या रॅडार सारखे फिरून दाही दिशांचा वेध घेत होते. येऊ घातलेल्या वादळी हवामानामुळे पुढचे उड्डाण रद्द करावे लागेल याची खंत मला वाटत होती.

तेवढ्यात बोचऱ्या थंड वाऱ्याची, एक तीव्र झुळूक आली व थेट हाडापर्यंत जाउन भिडली. मी फ्लाईंग-सूटची, छातीवरील झिप उघडली व हातापायावरील 'झिप्सही उघडल्या. थंडगार वारा सर्वांगाशी खेळू लागला. दमलेल्या पेशी व थकलेली हाडे सुखावल्या सारखी झाली.

देवदारांची पाने सळसळत होती. पावसाच्या सरी वर सरी येऊ लागल्या. उंच पठारावरील आमच्या विमानतळाच्या खालच्या बाजूने वाहाणारी नदी दुथडी भरून वाहात होती. पावसाची रिपरिप, देवदारांची सळसळ व नदीचा खळखळाट अवघ्या आसमंतात भरून राहिला होता. त्या झिलमिल वातावरणात, भिजून चिंब होत, मी टारमॅकवर, विमानाजवळच बसून होतो.

तशात तो इमर्जन्सी मेसेज आला होता. तातडीचा मेसेज......' कॅज्युअल्टी इव्हॅक्युएशन. नायक विक्रम सिंग सीरीयसली इल. रिक्वेस्ट इमिजिएट एअर-लिफ्ट टू बेस हॉस्पिटल.'

नायक विक्रम सिंग, जवानांची एक छोटी तुकडी घेऊन सीमांत विभागाची पाहाणी करण्यास निघाला होता. सीमेवरील जवानांच्या दैनिक कार्यक्रमातील प्रमुख ड्युटी हीच होती. अशी पाहणी करताना जवानांना सीमेवरील चढत्या उतारांवर उभ्या, उंच देवदाराच्या घनदाट निबिड अरण्यातील, शेवाळलेल्या निमूळत्या पायवाटांवरून गस्त घालावी लागते. हे काम अर्थातच फार जोखमीचे. जरासा पाय घसरला की देवदारांवर आपटत, अडकत, बाजूच्या हजारो फूट खोल दरीत भिरकावला जातो माणूस. अन खालच्या खळाळत्या पहाडी नदीतील प्रचंड खडकांवर आदळून, कपाळमोक्ष !

कडेकपारी पार करताना, बरेचदा ओल्या लवचिक बांबूंच्या झुलत्या शिडयांचा आधार घ्यावा लागतो. या शिडया पार करताना नकळत जरी खालच्या अरुंद खोल दरीत नजर गेली तरी घेरी येते व तोल जातो. कधी कधी तर मुसळधार पावसाने ठिसूळ झालेले कडे, अनवधानाने पाऊल पडताच ढासळतात व कोसळणाऱ्या व्यक्तीवर टनांनी माती पडून त्याची कबरच बनते.

मी स्वत: जवानांबरोबर राहून, अशा गस्ती घालून हे सर्व पाहिलेले–अनुभवलेले आहे. यामुळे जवानांबद्दल आदर व श्रद्धा बाळगतो मी. त्यांच्या सहायार्थ धावून जायचे तर, प्रसंगी स्वतःच्या प्राणांची पर्वाही करीत नाही. " जान की बाजी लगा देता हूँ. " अशी झुंज देणे–घेणे हा आता स्वभावच झालेला आहे.

अशाच एका गस्तीवर असताना विक्रम सिंगाचा पाय घसरला व तो तीन–चारशे फूट खाली कोसळला, पण सुदैवाने दरीत भिरकावला गेला नाही. देवदारांवर आदळून तेथेच अडकला. त्याच्या डोक्याला जबरदस्त मार लागलेला होता. पायाचे हाड मोडले होते व सर्गांग छिलले गेले होते. त्याच्या साथीदारांनी त्याला ताबडतोब उचलून आणून छावणीत परत नेले होते. छावणीतील डॉक्टरांनी फर्स्ट–एड दिली व इतर प्राथमिक उपचार केले. पण विक्रम सतत बेशुद्धावस्थेतच होता. केस त्या डॉक्टरांच्या हाताबाहेरची होती. म्हणूनच त्यांनी हा तातडीचा संदेश पाठवला होता. " नायक विक्रम सिंग सीरीयसली इल. रिक्वेस्ट इमीजियेट–लिफ्ट टू बेस–हॉस्पिटल. " मी पुन्हा एकदा तो संदेश वाचला.

एव्हाना आभाळ कोसळू लागले होते. मुसळधार पाऊस पडू लागला होता. तुफानी झंझावाताचे प्रचंड–अतिप्रचंड वादळी झोके, एकावर एक येऊ लागले होते. उड्डाण अगदी अशक्य झालेले होते.

मी टारमॅकवरून उठून आत ' स्क्रू रूम '- मध्ये गेलो. ओला फ्लाईट सूट बदलून, कोरडा घातला. वायरलेस–सेट छावणीशी ट्यून करून विक्रमसिंगाबद्दल चौकशी केली. व हे तुफान थोडे निवळताच निघतो असे कळवले.

पण कालची संध्याकाळ व रात्र वादळाचीच होती. रात्रभर राक्षसी झंझावाताने, तुफानी थैमान घातले होते. मी सतत जागे राहून, वायरलेसवर चौकशी करीत होतो.

तशात भल्या पहाटे साडेचार वाजता पुन्हा संदेश आला, " विक्रमसिंग डेंजरसली इल. रिक्वेस्ट इमीजियेट रिपीट इमीजियेट एअर–लिफ्ट. " मग मात्र माझ्याने राहवले नाही. मी ताबडतोब विमान उड्डाणासाठी तयार केले व त्या तशा वादळी हवामानातच टेक–ऑफ घेतला. सूर्योदयाचा समय असल्याने वादळ निवळेल असा माझा अंदाज होता, तो सपशेल चुकीचा ठरला होता.

◆

माझे विमान झंझावाताशी झुंजतच आहे. विमानाच्या दोन्ही इंजिनांवर मी फुल-पॉवर उघडली. इंजिने प्रचंड घोंघावताहेत. वादळवाऱ्याचे प्रखर थपेडे खात, वर खाली

# "माझे घर–आकाश"

फ्लाइट लेफ्टनंट

**अशोक मोटे**

## प्रत्यक्ष अनुभवावर आधारित कथा

फेकले जात, उडत उसळत विमान पुढे चालले आहे. विमानाचे फडफडते पंख अवाढव्य ढग कापीत चालले आहेत. छावणीच्या दिशेने पुढे चाललोय हेच मला समाधान आहे. पण तेथपर्यंत पोहचू शकेन की नाही ? पोहचलो तरी परत येताना या वादळातून विक्रमसिंगला सुखरूप आणू शकेन की नाही ?

अन्...अन् विक्रमच्या जीवनाची दोरी बहुधा बळकट असावी. पुढे गेल्यावर झपाटलेल्या झंझावाताचा आवेग कमी होऊ लागला. वादळ थोडे निवळू लागले. मला हायसे वाटले...पण...पण...

समोरच्या इन्स्ट्रुमेंट पॅनेलवरील डाव्या इंजिनाचा फायर-वॉर्निंग लाईट ऑन झाला. तो लालभडक रंग माझ्या डोळ्यात खुपू लागला. "म्हणजे डाव्या इंजिनाच्या आत आग लागलेली आहे व ते तावडतोब बंद करावयास हवे." मी विचार करू लागलो, "नाही तर आग लगेच सर्वत्र पसरून एक महाप्रचंड भडका उडेल व सारेच संपेल.'

वादळ थोडे निवळते न निवळते तोच हे आणखी एक संकट पुढे उभे. एक इंजिन बंद केले तर फक्त उरलेल्या एका इंजिनावर विमान या उंचीवर टिकणार नाही, उडत राहणार नाही. ते वजनाने आपोआप खाली उतरू लागेल अन् खाली तर साराच डोंगराळ विभाग ! अवाढव्य पर्वत नि उत्तुंग शिखरे. त्यावर आदळून चकनाचूर !

पण जास्त विचार करायला वेळच नाही. आग लागली तर तावडतोब खेळ संपणार. इंजिन बंद केले तर काही मिनिटांनी आय हॅव टु चूज द लेस्सर इव्हिल. मृत्यू काही तिनिटे पुढे ढकलला तर निदान विचार करायला वेळ तरी मिळेल. मिक्श्चर लिव्हर मागे ओढून, पेट्रोल बंद करून, मी डावे इंजिन बंद केले.

एका इंजिनावर विमान त्या उंचीवर टिकाव धरू शकले नाही. ते खाली उतरू लागले. आता शक्यतोवर वादळी ढग चुकवून मी आपले उतरते विमान चालवू लागलो. कारण फक्त एका इंजिनावर वादळाला तोंड देणे केवळ अशक्य होते.

पण विमान स्वतःच्या वजनाने खाली खाली उतरत चाललेले आणि मृत्यू महाकाय पर्वतांच्या रूपाने जवळ जवळ येत चाललेला. आदळणारच का मी जाऊन त्या पर्वतावर ! माझा अंत असा लिहिलेला आहे का ? काय करावे काही सुचत नाही. दिग्मूढ होऊन मी जवळ जवळ येत चाललेल्या भीमकाय पर्वत शिखरांकडे बघतो आहे. बेस वर परतण्याची ही शक्यता नाही नि छावणीवर पोहचण्याची ही नाही ! डोके सुन्न झाले, हृदय धडधडू लागले.

अन् तेवढ्यात डोक्यात एक प्रकाश चमकला. बाजूची दरी दिसली आणि लक्षात आले, वळण घेऊन या दरीतील नदी छावणीच्या दिशेने जाते, म्हणजे दरी छावणीपर्यंत मिळणार. नेहमीच्या वाटेने पर्वत ओलांडून छावणीकडे न जाता, या दरीतून उतरत उतरत वळण घेऊन जाते. म्हणजे विमान उतरत असूनही कोठे आदळण्याची शक्यता नाही व एका इंजिनावर मी सुखरूप छावणीच्या धावपट्टीपर्यंत पोहचेन ही. डोक्यावरचे ओझे एकदम उतरले, हृदयाची धडधड मंदावली.

म्हणजे विक्रमच्या आयुष्याची दोरी निश्चितच बळकट आहे तर !... पण नाही एका इंजिनावर मी छावणीवर पोहचू शकेन पण तेथून निघणार कसा ? डाव्या इंजिनात तर आग लागून ते आत बरेचसे नष्टही झाले असावे. मग विक्रमचे काय होणार ! हा विचार इतका असह्य झाला की मी तो झटकूनच टाकला. सध्या विमान छावणीपर्यंत नेऊन सुखरूप उतरविणे महत्त्वाचे आहे.

मी दरीतून वळण घेऊन उतरत पुढे चाललो आहे. मध्ये येणारे छोटे पहाड चुकवीत. समोर छावणी दिसू लागली. छावणीवरील धावपट्टीच्या सरळ रेषेत आणून, महत्प्रयासाने विमान सुखरूप उतरवले मी. चाके जमिनीला टेकताच, जिवात जीव आला.

मी विमानातून खाली उतरताच छावणीतील डॉक्टर धावतच आला व म्हणाला "अगदी वेळेवरच आलास तू मोटे, थोडा जरी उशीर झाला असता तर विक्रम हातचा गेला असता. आता अर्ध्या तासाच्या आत तू बेस वर नेऊन हॉस्पिटलमध्ये पोहचव, त्याला."

मी हताशपणे हसलो व म्हणालो "डॉक्टर आय एम सॉरी, पण विमानाचे डावे इंजिन बंद आहे. बहुदा आगीने बंद झाला असावा आतील भाग. एका इंजिनावर विमान येथून उडवून नेणे अशक्य आहे. पण मी बघतो डाव्या इंजिनाची काही दुरुस्ती शक्य आहे का ? आय विल ट्राय माय बेस्ट, पण यालाही वेळ लागेल."

तेवढ्यात जवानांनी विक्रमला स्ट्रेचरवर घालून विमानाजवळ आणले. जबर जखमा झालेला त्याचा देह पट्ट्यामध्ये गुंडाळलेला आहे. तो अजून बेशुद्धावस्थेतच आहे.

"आय एम सॉरी विक्रम सिंग" मी स्वतःशीच पुटपुटलो. रोज मी येथे उतरताच हसतमुखाने मला चहा आणून देणारा विक्रम आत माझ्यासमोर मरणासन्न अवस्थेत पडला आहे. आणि मी आपल्या समोरच त्याला असा मरू देणार ! माझ्या असहायतेची मलाच चीड आली.

"आय मस्ट डू समथिंग" मी स्वतःशीच पुटपुटलो "मला काही तरी केलेच पाहिजे."

मी विमानाचे डावे इंजिन उघडले. आणि तपासू लागलो....आणि आनंदाने ओरडलोच मी "डॉक्टर-डॉक्टर, गॉड इज विथ अस डॉक्टर"

"काय झालं मोटे" डॉक्टरने विचारले "इंजिन ठीक आहे का" त्याने आनंदोत्सुकतेने विचारले, "येस डॉक्टर येस" मी म्हणालो "इंजिन एकदम ठीक दिसते आहे, पण आत पाणी शिरले आहे, विमान वादळातून गेल्याने. म्हणजे इंजिनात आग न लागता नुसते पाण्यामुळे शॉर्ट सर्किट होऊन, तो फायर-वार्निंग लाईट ऑन झाला होता. किती चकवले मला या इंजिनाने ?"

आणि मी विचार करू लागलो की, बाजूच्या दरीत उतरण्याची ती कल्पना वेळेवर सुचली नसती तर दोन्ही इंजिने ठीक असूनही एका इंजिनावर उडून, नाहक मारला गेलो असतो मी नि विक्रमही मेला असता. वास्तविक इंजिन बंद करायचेच नव्हते ! पण फायर वार्निंग-लाईट ऑन होता, खरच आग लागलेली असती तर ! अशा वेळी चान्स घेण्यात अर्थच नसतो आणि धोकाही असतो. असो, झाले ते झाले. ज्या नियतीने शॉर्ट-सर्किट घडवून आणले, इंजिन बंद करविले, तिनेच दरीत उतरण्याची कल्पना सुचवून वाचविलेही. "डॉक्टर विक्रमसिंगला विमानात ठेवा, मी तावडतोब

परत निघतो" मी डावे इंजिन झाकीत म्हणालो.

जवान आनंदले. डॉक्टरही खूश होता. आता विक्रमसिंग निश्चितच वाचणार. छावणीतील धावपट्टीवर धावत माझे विमान आकाशाकडे झेपावले. वादळ आता पूर्ण निवळत आले आहे. ढग विरू लागले आहेत. पूर्वेकडील पर्वतावरील ढगाआडून बराच उंच गेलेला सूर्य डोकावतोय. उशिरा का होईना पण सूर्योदय झालेला आहे.

"आता परतल्यावर गरम पाण्याने अंघोळ, हेवी ब्रेकफास्ट व नंतर कालची राहिलेली झोप" असा सुखद विचार माझ्या मनात तरळतोय. मी विमान उंच घेऊन जातो पर्वत शिखरांच्या वर, ढगांच्या वर आता स्वच्छ निळया झालेल्या, संथ आकाशात. माझे विमान अलगद चाललेय बेसकडे.

"विमान दहा मिनिटात उतरेल, विक्रमसिंगसाठी ॲम्ब्युलन्स तयार ठेवावी, त्याला तावडतोब हॉस्पिटलात पोहोचवायचे आहे" मी विमानातील वायरलेस सेटवर बेसला संदेश दिला.

"ती सर्व तयारी आम्ही करतो मोटे, अन् दुसरे एक विमान तुझ्यासाठी तयार आहे. दुसऱ्या एका छावणीवरून इमर्जन्सी मेसेज आलेला आहे. त्यांना राशन व औषधे तावडतोब हवीत. तुझा ब्रेकफास्ट विमानातच असेल. बेसवर उतरताच ताबडतोब तू दुसरे विमान घेऊन नीघ. विक्रमसिंगची काळजी आम्ही घेऊ, हॅपी लँडिंग" बेसवरून वायरलेसवर संदेश आला.

"म्हणजे अंघोळही विसरा, झोप विसरा" मी स्वतःशीच विचार करू लागलो "मला जमिनीवर राहूच देत नाहीत हे लोक. एनी वे आय बिलाँग टू द स्काईज माझी जागा आकाशातच आहे. माझे घर—आकाशच !

□ □

पुस्तके

# स्वये श्री. व. पु. सांगती आपुल्या वडिलांची कीर्ती

सदानंद नाईक

सुप्रसिद्ध कथालेखक श्री. व. पु. काळे यांनी आपल्या वडिलांची म्हणजे श्री. पु. श्री. काळे यांची ओळख या पुस्तकाद्वारे वाचकांना करून दिली आहे. सुरुवातीलाच हे मुद्दाम सांगण्याचे कारण चरित्रनायक व चरित्र-कथाकार या दोहोंचीही कल्पना वाचकांना यावी. चांगल्या कसोटीवीराचा खेळ चालू असावा आणि श्री. विजय मर्चंटसारख्या समालोचकाचे समालोचन असावे, म्हणजे ते ऐकताना जी मजा येते, तशीच मजा हे पुस्तक वाचताना अनुभवता येते. व. पु. सध्या 'फॉर्मा'त आहेत. त्यामुळे या कथनातील वेधकता कोठेही ढळलेली नाही. अगदी जवळच्या व्यक्तीच्या परिचय शब्दांच्या माध्यमातून घडविणे, त्या व्यक्तीला शब्दबद्ध करणे ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. कारण व. पु. म्हणतात त्याप्रमाणे—

'त्यांच्याबद्दल (वडिलांबद्दल) लिहिताना मी ज्या काही निश्चित भावनेनं लिहिणार त्याची तीव्रता माझ्यापुरती मर्यादित असणार. तेव्हा, ज्या भावना केवळ माझ्यापुरत्या मर्यादित आहेत, त्या मी लोकांना विशद करून सांगण्यात काय अर्थ आहे?'

पण असे जरी असले तरी व. पुं. नी आपल्या भावना हळुवारपणे सादर केल्या आहेत. अशा वेळेला कथनात हळुवार येणारा रुक्षपणा या कथनात कोठेही आलेला नाही. व. पुं. च्या भावनांची तीव्रता वाचकाला जाणवल्याखेरीज रहात नाही.

या ठिकाणी चरित्रकथनाची, नेहमीची पद्धत त्यांनी स्वीकारलेली नाही. '१नोव्हेंबर १८८८ रोजी, वाईजवळ गावात—मेणवलीत—अण्णांचा जन्म झाला. अशी सुरुवात करण्याचे कारण नाही. ती झाली चरित्रलेखनाची पद्धत—' या निवेदनाबरोबर अण्णांची—(व. श्री. काळे यांची) जन्मतारीख व स्थळ वाचकाला सांगितले जाते. काही निवडक प्रसंगातून एक संपूर्ण चरित्र उभे केले गेले आहे. एखाद्या चित्रपटाप्रमाणे हा चरित्रपट कधी मागे तर कधी पुढे सरकतो आणि आपल्या मनावर चरित्रनायक पु. श्री. काळे यांचा ठसा अधिकाधिक स्पष्ट उमटत जातो.

कधीही न रागावणारे पण लॉंड्रीत टाकलेले आपले कपडे, लॉंड्रीतला माणूस वापरतो हे कळल्यावर त्याच्या तोंडात ठेवून देणारे. मुंबईला राजकमलमध्ये नोकरी करून महिन्या दोन महिन्यानी पुण्याला, घरच्या मंडळींना भेटायला जाणारे, कसलीही कुरकूर न करता कार्यरत असलेले, निष्काम कर्मयोगाची साधना करणारे, राजकमलचे आर्ट डायरेक्टर पण स्वतःच्या कपड्यांच्याबाबतीत बेफिकीर असणारे, मार्मिक आणि प्रासंगिक विनोद करणारे, व. पुं. चे रूमपार्टनर, लेखक, कवी आणि नेपथ्यकार श्री. पु. श्री. काळे यांचे हळुवार, कलात्मक दर्शन आल्हाददायक आणि आदरणीय वाटते.

व. पुं. नी सांगितलेले काही प्रसंग केवळ त्यांच्या वडिलांबद्दलच माहिती सांगतात असे नाही, तर त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींच्या स्वभावावरही ते चांगलाच प्रकाश टाकतात. ते प्रसंग बोलके आहेत. पुढील एक दोन प्रसंगावरून त्याची कल्पना येईल.

—'व्ही. शांतारामचे सेक्रेटरी ईश्वर अण्णांकडे आले. कंपनीच्या नोकरीबाबत त्यांना अण्णांकडून बाँड लिहून हवा होता. अण्णांनी त्यांना हसत हसत सांगितलं—

'तुम्ही अगोदर परमेश्वराकडे जा आणि काळ्यांकडून किती वर्षाचा बाँड लिहून घ्यायला हरकत नाही ते विचारा. तुम्ही ईश्वरच आहात पण ह्या बाबतीत परमेश्वराचा सल्ला घेतलेला बरा.'

हा प्रसंग सांगून व. पु. सांगतात, "अण्णांच्या ह्या असल्या उत्तरावर त्या ईश्वराचं काही चाललं नाही. नाहीतरी

साठीच्या जवळ पोहोचलेल्या गृहस्थाकडून करारपत्रांची आवश्यकता होती काय ?"

त्याच संदर्भात व. पु. आणखी एक गोष्ट सांगतात. "मुंबईत ऐन दंग्यांचे दिवस होते. त्यातून लालबाग परळपारखा विभाग. कंपनीतल्या नोकरांना कमीत कमी करीरोड अथवा लोअरपरळ स्टेशनपर्यंत मोटारीतून सोडण्याची व्यवस्था करणं कंपनीला तेवढं अशक्य नव्हतं. काही खास मंडळींसाठी मोटार अंधेरीपर्यंत जायची. पण–

आपलं माणूस सुखरूप परत कधी येईल, ह्याची सतत काळजी करण्यापलीकडे हातात काही नव्हतं.

अण्णा सकाळी आठ वाजता, कामावर जाताना डबा नेत. चपटया बाटलीत दूध नेत. गुंडांचा प्रतिकार एक हात पाठीवर आणि एक हात पोटावर ठेवून करावा असला उपदेश तेव्हा मंत्रीमहाशय देसाईंनी केला होता. त्याचा उल्लेख करून अण्णा म्हणायचे,

"तसे हात ठेवायची मला गरजच नाही. दुधाची बाटली कोटाच्या आतल्या खिशात असते. एखाद्या गुंडाने जरा सुरा मारलाच तर रक्ताऐवजी दूध येईल. तो गुंड मग म्हणेल की हा खरा ब्राह्मण आहे."

ह्या सारखे विनोद करून ते कामावर जायचे. आपल्या अण्णांच्या एकूण आयुष्याबद्दल सांगताना व. पु. लिहितात–" अण्णांच्या जीवनात तर अनेक अडचणी आल्या. आर्थिक अडचण नेहमीची. तिला अग्रहक्क द्यायला हवा. मानभंगाचे प्रसंग तर अगदी जवळच्या नातेवाईकांनी आणले. अण्णांना चित्रकारच न मानणारे सुद्धा त्या नातेवाईकातच होते. ह्या सर्वांना अण्णांनी उत्तर दिले ते श्रमाने– बंगल्याला त्यांनी नाव दिले ते "श्रम साफल्य" साहित्यिकांनी, नाटककारांनी, बंगल्यांच्या ह्या नावाचा टर उडविण्यासाठी उपयोग केला– तेही कधी अण्णांनी मनावर घेतलं नाही."

व. पु. नी अशा तऱ्हेने अगदी मोजक्या शब्दात आपल्या अण्णांच्या स्वभावातील, कलागुणातील वेगवेगळ्या पैलूंचे दर्शन घडविले आहे. आपल्या अण्णांबद्दल मोजक्या शब्दात त्यांनी खूप काही सांगितलं आहे. त्याचबरोबर अण्णांच्या संपर्कात आलेल्या संबंधीत मंडळीच बद्दलही (उदा. टर उडविणारे वरील साहित्यिक) प्रत्यक्ष काही न सांगता त्या त्या प्रसंगातून बरेच काही सांगितले आहे.

हे चरित्र वाचतांना आपण एखादे पुस्तक वाचीत आहोत, असे वाटत नाही, तर "मूडांत" आलेले व. पु. दिलखुलास गप्पांच्या ओघात आपल्या वडिलांच्याबद्दल सांगताहेत असा अनुभव वाचकाला येतो. व. पु. नी केलेले हे चरित्र कथन सहज उतरले आहे.

शेवटी सध्याच्या कागदटंचाईच्या काळांत एक गोष्ट खटकली ती सांगणे आवश्यक आहे. ती म्हणजे– या पुस्तकाची मांडणी. ती डोळ्याला सुख देणारी, कलात्मक असली तरी बराच कागद वाया गेला आहे आणि त्याचा भुर्दंड बिचाऱ्या वाचकाला भरावा लागणार हा विचार खटकतो. आणि त्याच वेळी असाही एक विचार मनात येतो, की स्वत: श्री. पु. श्री. काळे यांनी जर ही मांडणी केली असती तर सर्वच दृष्टीने काटकसरीची आणि त्या बरोबरच कलात्मकही झाली असती. श्री. सुभाष अवचट यांचे मुखपृष्ठ व सजावट कलात्मक आहे. ◻

सांगे वडिलांची कीर्ती
व. पु. काळे.
निशिगंध प्रकाशन, ठाणे
पृष्ठे ९४ (मूल्य ९ रुपये)

## चोरांच्या गोष्टी

एकदा विनोबांनी एक गोष्ट सांगितली होती. त्यात खरं बोलणारा एक चोर असतो. पण ह्या एका गुणामुळे ह्या चोराला राजाच्या दरबारात प्रधानपद प्राप्त होतं. रामनवमीच्या उत्सवात लहानं मुलांसमोर मी मोठी रंगवून सांगितली-होती ती गोष्ट. आणि त्यानंतर चार आठ दिवसांनी प्रत्यक्ष घडलेली एका चोराची गोष्ट मी ऐकली आणि माझं मन कसं उदास उदास झालं. कारण ह्या खऱ्या घडलेल्या गोष्टीतला चोर, देशात राजा अस्तित्वात नसल्याने प्रधान होणं शक्य नव्हतं. उलट, तो खरं बोलूनही त्याच्या वाट्याला फटके आले होते.

झालं काय, एक दिवस रात्रीच्या वेळी एका घरात एक चोर शिरला. ज्यांच्या घरात चोर शिरला त्या बाईंनीच सांगितली ही हकीगत. कर्मधर्मसंयोगाने माणसाना जाग येताच चोर सावध झाला. तो स्वयंपाक घरात लपला आणि शेवटी पळून जायला मार्ग नसल्याने माणसांच्या हाती सापडला. माणसाने त्याचं मनगट धरलं नि विचारलं, तू इथे कसा आलास ?

'आज सहा महिने झाले, माझं तुमच्या घरावर लक्ष आहे. मी व्यवस्थित प्लॅन करून मगच घरात शिरलो.– चोर खरं बोलला होता.

'तू काय काय चोरलंस ते मुकाटयाने काढून दे.' माणसाचा आवाज तीक्ष्ण झाला.

चोराने मुकाटयाने ५०० रु. नि घडयाळ समोर ठेवलं. त्या गृहस्थाने त्याच दिवशी बँकेतून ५०० रु. आणले होते. 'चोर प्रांजळ म्हणायचा !'

माणसाने क्षणभर विचार केला, सोडून द्यावं का ह्याला ? दुसऱ्याच क्षणी ठरवलं, याला अद्दल घडलीच पाहिजे. हा पुन: चोरी करील. पोलिसाच्या स्वाधीन करणंच उत्तम. चोर पोलिसाच्या ताब्यात गेला नि मरेपर्यंत फटके खाल्ले त्याने !

गोष्ट एवढ्याने संपली असती तर काही विशेष वाटलं नसतं. पण तिचा उत्तरार्ध कसा होता ?

पोलिस सब इन्स्पेक्टरने नंतर ह्या गृहस्थांना म्हटलं, काय काय चोरलं होतं चोराने ? माणूस भोळा. म्हणाला, '५०० रु. नि घडयाळ.'

'असं करा, ५०० रु. माझ्याकडे सध्या द्या. चोरीचा माल म्हणून दाखवायला प्रूफ हवं ना. अन् घडयाळ तुम्ही ठेवा. ते चोरीला गेलं असल्याचं ठाण्यावर बोलूच नका.'

गृहस्थाने ५०० रु. सब इन्स्पेक्टरच्या स्वाधीन केले. आणि बस ! त्यानंतर ते ५०० रु. आणि तो सब इन्स्पेक्टर ह्या दोहींचं त्याला दर्शनच झालं नाही. चोराने प्रांजळपणे परत केलेले पैसे चोरांना पकडणाऱ्या 'संभावित चोराने' लांबवले. पोलिस स्वत: चोर व्हायला लागल्यावर तो काय चोरी पकडणार ! फक्त चोराला फटकेच मारणार, तो चोर खरं बोलला तरी देखील.

विनोबांची गोष्ट नि ह्या बाईंनी सांगितलेली गोष्ट यांचा कुठे ताळमेळच जमेना माझ्या मनात !

–तारा पंडीत

# मक्काल कुराल

## जनतेचा आवाज

दिलीप चावरे

'मक्काल कुराल' (जनतेचा आवाज) हे तामिळ भाषेतील दैनिक म्हणजे भारतीय पत्रकारितेमधील एक नवीन प्रवाह आहे. मद्रासच्या काही पत्रकारांनी हे दैनिक चालविले आहे. दि. २ सप्टेंबर १९७३ रोजी या दैनिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. आज या दैनिकाचे वितरण प्रतिदिनी सुमारे ४४ हजार आहे. वृत्तपत्रसृष्टीत हा एक उच्चांकच मानावा लागेल.

परंतु 'मक्काल कुराल'च्या चालकांना (म्हणजेच पत्रकारांना) खपापेक्षाही त्याच्या स्वरूपाबद्दल अधिक अभिमान वाटतो. प्रसिद्ध काय होते आणि प्रत्यक्षात काय घडते, यात बरीच तफावत असते याची जाणीव सुजाण वाचकाला निश्चितच असते. परंतु ही तफावत आम्ही कमीत कमी ठेवली आहे, असा 'कुराल'करांचा दावा आहे. आणि हा दावा बहुतांशी वास्तवही आहे, असे मानण्याला बराच वाव आहे. जनतेची धारणा, जनतेच्या आशा, जनतेची आंदोलने आणि तिच्या आकांक्षा यांचे प्रतिबिंब 'कुराल'मध्ये उमटते असे 'कुराल'कारांना प्रामाणिकपणे वाटते. जनतेशी आणि विशेषतः श्रमजीवी वर्गाशी आम्ही सर्वाधिक एकरूप झाल्यानेच आम्ही यशस्वी झालो, असे 'कुराल' कारांचे म्हणणे आहे.

'मक्काल कुराल' या दैनिकाचे स्वरूप खरोखरच वेगळे आहे. त्याच्या मालकीवर कोणत्याही राजकीय अथवा आर्थिक गटाचा हक्क नाही. एका विचाराच्या पत्रकारांनी (आणि कामगारांनी) एकत्र जमून हे साहस केले आहे आणि ते यशस्वी करून दाखविले आहे. सध्याच्या भांडवलशाहीच्या युगात तर हे पत्र आपल्या वेगळेपणाने अधिकच शोभून दिसावे.

मद्रास युनियन ऑफ जर्नालिस्टस् या संघटनेचे सरचिटणीस 'मक्काल कुराल'चे संपादक आहेत. परंतु संघातीलच एक या भावनेने ते काम करतात. याच भावनेने अन्य सदस्यही काम करतात. याच संघभावनेने आतापर्यंत 'कुराल'ला अनेक संकटांमधून तारले आहे. 'कुराल'च्या स्थापनेची पार्श्वभूमी अशी—

वर उल्लेखिलेले सरचिटणीस श्री शन्मुगवेल आणि त्यांच्या काही पत्रकार मित्रांच्या चर्चेतून पत्रकारांच्या मालकीच्या वृत्तपत्राच्या योजनेचा उदय झाला. त्यापूर्वीही काही पत्रकारांनी सहकार्याने 'नवमणी' नावाचे वृत्तपत्र चालविले होते. परंतु सहकार खात्याने या पत्रावर लादलेल्या व्यवस्थापनाचे आणि संपादकवर्गाचे पटेना. संपादकांच्या स्वातंत्र्यावरच तेथे गदा येऊ लागली. संपादकवर्गाचा प्रतिकारही निष्प्रभ ठरू लागला याला उपाय काय? याला उपाय म्हणजे पत्रकारांनी स्वतःचे पत्र सुरू करणे, असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

पूर्वीचा कटु अनुभव जमेला धरून पुढची जुळवाजुळवी सुरू झाली. दिवंगत केंद्रीय मंत्री मोहन कुमारमंगलम् यांनी उत्तेजन दिले. अर्थात त्यावेळी ते मंत्री नव्हते. एक कार्यकर्ते होते.

आता प्रश्न होता भांडवलाचा! वृत्तपत्र सृष्टीत पाय रोवून उभे राहायचे, प्रस्थापित पत्राविरुद्ध सामना देऊन स्वतः जगायचे, ही किमया भांडवलाखेरीज साध्य होणे अशक्य वाटत होते. परंतु पाऊल मागे घेण्याची वेळ टळली होती. अखेर सात पत्रकारांनी एकत्र येऊन एक पब्लिक कंपनी स्थापन केली. मध्यंतरी श्री. शन्मुगवेल यांच्यासंबंधी काही समस्या निर्माण झाल्या होत्या. परंतु त्या देखील सामोपचाराने सोडविण्यात आल्या. अखेर मार्च १९७२ मध्ये 'न्यूजमेन असोसिएटस्' अस्तित्वात आली.

या वृत्तपत्राचा विकास 'आदर्शवादी' भूमिकेवरून करण्याचे ठरविण्यात आले. 'हे जनतेचे पत्र जनतेसाठीच आहे' असे आश्वासन देण्यात आले. आणि मदतीचा ओघ सुरू झाला. श्रमिक पत्रकार संघटनेच्या शाखांनी मदत करावी, असा आदेश पूर्वीच देण्यात आला होता. असे दोन लाख रुपये जमले. जून १९७३ मध्ये हे पत्र प्रसिद्ध होणार होते. परंतु मोहन कुमारमंगलम् यांचा एका विमान अपघातात अंत झाला, आणि 'कुराल'च्या योजनेला अचानक हादरा बसला.

परंतु कार्य चालूच होते. पत्रकार हा सर्व कलांमध्ये थोडाफार पारंगत असावा लागतो (जॅक ऑफ ऑल ट्रेडस्). परंतु या पत्रकारांना कायदा, सरकारी व्यवहार, हिशेब यातील काहीच माहिती नव्हती. अखेर एका चार्टर्ड अकौंटंटच्या मदतीने हे सव्यापसव्य पूर्ण करण्यात आले. मद्रासच्या कॉर्पोरेशन बँकेने मुदतीचे कर्ज आणि मूळ भांडवल दिले. अखेर स्वारी घोड्यावर स्वार झाली.

दि. २ सप्टेंबर १९७३ रोजी तामिळनाडूचे राज्यपाल श्री. के. के. शहा यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मजूरमंत्री श्री. के. व्ही. रघुनाथ रेड्डी यांनी 'मक्काल कुराल'चा पहिला अंक प्रकाशित केला. याप्रसंगी श्री. के. भक्तवत्सलम्, उजवे कम्युनिस्ट श्री. एम. कल्याणसुंदरम्, संघटना काँग्रेसचे पी रामचंद्रन्, अण्णा द्रवीड मुन्नत्र कळघमचे श्री. आर. एम. विराप्पन्, डावे कम्युनिस्ट श्री. एन. शंकरय्या आदी परस्परविरोधी विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते.

वृत्तपत्रीय कागदाच्या अभूतपूर्व टंचाईने या पत्रकारांचेही 'धाबे दणाणले होते. छपाईच्या अन्य साहित्याच्या किमतीही वाढत होत्या. आर्थिक बोजा आधीच जास्त असल्याने स्वतःचा प्रेस नव्हता. या सर्व प्रतिकूल परिस्थितीतही रोज खप वाढतच होता. आणि नोव्हेंबरमध्ये प्रतिदिनी ३० हजारापेक्षा जास्त प्रति खपू लागल्या. या दैनिकाने वाचकवर्गात आपली निश्चित प्रतिमा निर्माण केल्याचा हा पुरावाच होता. या अभूतपूर्व यशाची कारणे संपादकवर्ग पुढीलप्रमाणे देतो—

१) या पत्राची शैली व त्यातील मजकूर त्यात मुख्यतः सामान्याच्या दुःखाला वाचा फोडलेली असते. मात्र कोणत्याही एका व्यक्तिच्या, गटाच्या अथवा पक्षाच्या विरुद्ध हे पत्र नाही, परंतु सत्यकथनाच्या बाबतीत ते कोणाचा मुलाहिजाही ठेवणार नाही.


२) आपल्या वाचकवर्गावर सुसंस्कार करण्याचा 'कुराल' कारांचा प्रयत्न आहे. उणीवा प्रसिद्ध करून, उपाययोजनाही सुचविण्याचा मार्ग 'कुरात'कार अनुसरतात.

३) कोणत्याही यशाला संघटनेची जरूरी आहे. 'मक्काल कुराल'च्या मागे भारतीय श्रमिक पत्रकार संघटना उभी आहे.

४) येथे संघभावना आहे. मतभेदांना वाव नाही.

'मक्काल कुराल'मधील कर्मचारी बाहेर मिळवू शकले असते, त्याच्या निम्म्या वेतनावर विनातक्रार काम करतात. कारण त्यांना खात्री आहे की पुढे होणाऱ्या समृद्धीची फळे त्यांनाच चाखायला मिळणार आहेत.

'मक्काल कुराल'ची ही यशस्वी घोडदौड पाहून मुंबई, दिल्ली, हैदराबाद, कलकत्ता आणि त्रिवेंद्रम येथील पत्रकारही दैनिक काढण्याच्या योजनेवर विचार करीत आहेत. भारतीय श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. एस्. बी. कोलपे मुंबईत याच धर्तीवर एक मराठी दैनिक सुरू करण्याची योजना करीत आहेत. ☐ ☐



प्रभात चित्रसंस्थेचे अध्यक्ष वसंत साठे, व्ही. शांताराम आणि राजकपूर

## ॥ नजर ॥ नजर ॥

**ह. शि. खरात**

# राजकपूर सप्ताह आणि मनोरंजन

एक एप्रिल हा दिवस एप्रिल फूल म्हणून साजरा केला जातो. त्यामुळे संबंध एप्रिल महिनाभर थोडे अधिक एप्रिल फूलचेच वारे असते. एप्रिल फूल करणे ही एक गंमत असते. तो एक मनोरंजनाचाच भाग असतो. त्यामुळे लहानापासून थोरापर्यंत प्रत्येक जण आपण मूर्ख कसे झालो ह्या आनंदात किंवा मूर्ख होण्याच्या खुशीत असतो. अशा ह्या एप्रिल महिन्यात मुंबईत तीन गोष्टी घडल्या. तशा अनेक घडल्या असतील. पण मुंबईच्या सांस्कृतिक जीवनात प्रामुख्याने ह्या तीन गोष्टींचा उल्लेख करावा लागेल.

त्या तीन गोष्टी म्हणजे प्रभात चित्र-मंडळाने साजरा केलेला राजकपूर चित्रपट सप्ताह, साप्ताहिक प्रभंजन आणि सिनेमा मनोरंजन ह्या होत. प्रभंजन आणि मनोरंजन एकाचवेळी लोकांपुढे आले हा एक योगा-योगच. ह्या तीन गोष्टीपैकी प्रभात चित्र मंडळाने साजरा केलेला राजकपूर चित्रपट सप्ताह, निदान त्याचा उदघाटन समारंभ हृदयंगम झाला. पुंडलिका भेटी परब्रह्म आले गा, त्याप्रमाणे राजकपूरसाठी व्ही. शांताराम खास करून आले. दोघांची भाषणे बरी झाली. त्यातल्या त्यात राजकपूरने भावनापूर्ण भाषण करून आपल्या मनातील व्यथाही प्रेक्षकांना सांगितल्या. शांतारामबापूंनी राजकपूरच्या पहिल्या चित्रपटापासून शेव-टच्या चित्रपटापर्यंत प्रत्येक कृतीमध्ये राजकपूर कसा दिसतो हे सांगून कलेविषयी त्याच्या हृदयात भडकणारी 'आग' जिद्द ही आजही कशी जिवंत आहे, हे सांगितले. पण कधी कधी चांगल्या कलाकारालाही तडजोड करावी लागते. कारण त्याला जे सांगावयाचे आहे ते तो जिवंत राहिला तरच लोकांपुढे मांडील. म्हणून जिवंत राहाण्यासाठीच त्याला तडजोड करावी लागते असे सांगितले.

राजकपूरने व्ही. शांताराम ह्यांचा खरा शिष्य मीच आहे असे सांगितले. (मागे त्यांनी केदार शर्मा आपले गुरू आहेत असे म्हटल्याचे आठवते. चूकभूल द्यावी घ्यावी.) लोक जसे 'ये व्ही. शांताराम की फिल्म है' असे म्हणतात तसेच 'ये राजकपूर की फिल्मी है' असे लोकांनी म्हणावे अशी आपली उम्मीद व इरादा त्यांनी व्यक्त केला. एक तरी व्ही. शांताराम सारखी फिलम काढावी असे त्यांना फार मनापासून वाटते. अशाप्रकारे व्ही शांताराम ह्यांच्या चरणी लीन होऊन शेवटी मी तडजोड का करतो म्हणजे 'प्रेक्षकांना 'एप्रिल फूल' का करतो हे सांगितले. यशात सारे जग सहभागी होते परंतु अपयश आले की आपली मौत आप-ल्यालाच मरावी लागते असे सांगून पूर्वी-सारख्या ध्येयवादी कलाकारांच्या संस्था आता नाहीत. सारेच व्यवसाय बाजारी झाल्याने जगण्यासाठी तडजोड करावी लागते. बरे पूर्वीसारख्या प्रभात, न्यू थिएटर्स अशा संस्था न राहिल्याने 'कुक'शी नाहीतर एखाद्या नटी सेक्रेटरीशी स्पर्धा करण्याचे दुर्भाग्य आल्याने तसाच माल काढावा

लागतो वगैरे वगैरे दर्द मोकळा केला. राजकपूर मनापासून बोलत होता. त्याची तळमळ खरी होती. त्याचे जागते रहो, मेरा नाम जोकर चालले नाहीत पण बरसात, बॉबी चालले. बॉबीने तर कहरच केला. पण जे चालावेत असे त्याला वाटले होते ते आपटले. त्याला तो तरी काय करणार. पण केवळ एखादा 'कुक' किंवा सेक्रेटरी चित्र काढतो म्हणून राजला का वाईट वाटते हे कळले नाही. कारण आता जरी जमाना आला असला तरी त्याच्या पहिल्या चित्रपटाच्या वेळी इतर अनेक नामांकित संस्था होत्या. तरी आगमध्ये तडजोड आणि योगायोग हा मसाला आढळतोच. तेव्हा राजकपूरचे स्वसमर्थन फारसे पटले नाही.

तरीही आपण राजकपूरला मानतो. ते त्यांनी दिलेल्या भाबड्या आणि सामान्य माणसामुळे. राजच्या प्रत्येक चित्रपटात हा भाबडा सामान्य माणूस आढळतो. हा माणूस जीव तोडून आपले दुःख व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. आर. के. लक्ष्मणचा जसा 'यू सेड इट'मध्ये एक भाबडा माणूस असतो तसाच एक माणूस आर. के. फिल्ममध्येही असतो. ह्या छोट्या माणसाचं दुःख राजकपूर जे पोटतिडकीने मांडण्याचा प्रयत्न करतो त्याबद्दलच राजला आपण मानला पाहिजे. रशियामध्येही त्याचे चित्रपट लोकप्रिय झाले ते त्याने सादर केलेल्या ह्या प्रामाणिक भाबड्या माणसामुळेच. म्हणूनच राजकपूर हा एक महान छोटा माणूस वाटतो. निदान त्याच्या जागते रहो आणि मेरा नाम जोकरसाठी तरी आपण त्याला मानलेच पाहिजे.

राजकपूरने आपल्याला थोडेफार एप्रिल फूल केले असेल पण राजच्या भावाने म्हणजे शम्मी कपूरने मात्र मनोरंजन चित्रपट काढून साऱ्यांनाच जाम एप्रिल फूल केले आहे. 'इर्मा ला डूस' ह्या पाश्चात्य चित्रपटाची कॉपी करून चांगल्या कलाकृतीचा कसा सत्यनाश करावा ह्याचा आदर्शच त्यांनी घालून दिला आहे. काही जण म्हणतात की 'इर्मा' डोक्यातून काढून टाका आणि मग मनोरंजन बघा. तसे तर हिंदी चित्रपट बघताना डोके घरी ठेवूनच बघायला जा असे वरचेवर म्हणतात. च्यायला मग परमेश्वराने आम्हाला डोकेतरी कशाला दिले. नुसत्या टोप्या बदलायला! बरं 'इर्मा'ची कॉपी करायची तर त्यातील सगळ्याच गोष्टींची करायची. मग सुरुवात आणि शेवट. बदलायचा कशाला आणि अनेक ठिकाणी हिंदी मसाला कशाला भरायचा. निदान ही फर्मास गोष्ट भारतीय मातीत रुजवून मग तिची भारतीय धमाल कॉमेडी तरी करायची. पुलंनी नाहीका 'इन्स्पेक्टर जनरल'वरून अंमलदार निर्माण केला. पण कोण बेटा शंका घेतो की हा अंमलदार इंग्रजी आहे म्हणून. एखादा अकसबी कारागीर गणपती करायला जातो आणि त्याचे वानर होते हा प्रकारच शम्मी कपूरच्या हाताने घडला आहे. त्यामुळे मुळच्या गिरेबाज कॉमेडीची अक्षरशः विटंबना झाली आहे. 'इर्मा'ची 'व्हेन' त्याला पकडता आली नाही.

'इर्मा'ची गोष्टच वेगळी. शर्ले मॅकलेनसारखी बनेल पण लाजवाब वेश्या, जॅकलेमन सारखा भाबडा सखाराम आणि दिग्दर्शक बिली वायलर ह्या कसबी माणसाचं अफलातून डोकं. मग काय विचारता नुसती धमालच धमाल! तीच गोष्ट मनोरंजनची बघा. झीनत अमान. मांड्या दाखविणे म्हणजेच अभिनय असे तिला वाटत असावे. ह्या बाईला अस्सल वेश्या उभी करताच आली नाही. चेहऱ्यावर जरासुद्धा वेश्येची बेफिकीरी आणि दर्द नाही. अभिनयाची मुळात जाण नाही. साबणाच्या किंवा चहाच्या जाहिरातीत काम करावे तसे चेहऱ्याचे हावभाव. त्यात दिग्दर्शक शम्मीकपूर. अंगाला आकडी आल्यासारखे झटके देणे म्हणजेच अभिनय हा त्याच्या एकंदर चित्रपटाचा इतिहास जमा हिशोब. त्यामुळे साऱ्या चित्रपटाला आकडी आल्यासारखे झटके येतात. मध्येच झोपेतून उठल्यासारखे दिग्दर्शन करायचे नव्हे. मक्कल करायची. अरे थोडी सुद्धा तपश्चर्या नको. जरासुद्धा अंगाला झटके न देता 'इर्मात' मुस्टाशने जे काम केले आहे त्याच्या जवळपासही हा धूपछाँव पोहोचत नाही. राहता राहिला संजीवकुमार. त्याने थोडा बरा रिलीफ दिलाय. पण जॅकलेमन तो जॅकलेमन!

सुरुवात आणि शेवट ह्यांच्यात बदल केल्याने पटकथेची आधीच वाट लागली. त्यात एडिटिंग्च्या बाबतीत बोंबच. जरा 'इर्मा' बारकाईने तरी बघायचा होता. वेश्येच्या गल्लीचा सेट उभारलाय तो मुळीच वास्तव वाटत नाही. धूपछाँव हॉटेल ही तशा प्रकारचे न वाटता 'पॉश' हॉटेल वाटते. निशाची खोली वेश्येची न वाटता तो फ्लॅटच वाटतो. बरे तिची धंद्याची जागाही तशी वाटत नाही. कमाल म्हणज निशा 'शॉवर बाथ' घेते. बाकीच्या वेश्याही इतक्या खुबसूरत दाखविल्या आहेत की हिरॉईनपेक्षा त्या सुंदर वाटतात. त्यामुळे एकही अस्सल वेश्या आढळत नाही. अर्थात ह्या 'सोफेस्टिकेटेड' वेश्या असल्यास आमचे काही म्हणणे नाही. धूपछाँवचे म्हणजे शम्मीकपूरचे एकही वाक्य स्पष्ट ऐकू येत नाही. बरे संजीवकुमारचा नवाब एकदम बोगस वाटतो. जरा सुद्धा आवाजात बदल नाही. जॅकलेमनने ती किमया केली आहे. बरे हा नवाब पत्ते खेळत बसतो. अरे जरा सुद्धा शेरशायरी नाही. मजेदार शेरशायरी वापरून केवढी नवाबी धमाल करता आली असती. बरे जो काही उर्दू विनोद केला आहे तो कुणालाच कळत नसल्याने डोक्यावरूनच जातो. सुरुवातीला गाडीतला प्रकार, कुत्र्याचा प्रसंग व शेवटचा केलेला बदल कल्पना दारिद्र्याचा चांगला पुरावाच आहे. अशा अनेक गोष्टी आहेत की त्यामुळे फर्मास कॉमेडीत पाणी घालून घालून ती अगदी पाणचट झाली आहे.

संगीतसुद्धा कर्कश आणि भडक वाटते. ह्या फार्सवजा कॉमेडीला संगीत तसेच देता आले नसते का? संवाद जसे फालतू झालेत तसेच संगीताचे झाले. नेहमी सारखे हिंदी-पाश्चत्य स्टाईल. मारामाऱ्या तीन वेळा दाखविल्यात. सेलर्स आणि वेश्यांची मारामारी का दाखविली ते कळलेच नाही. तुम्ही म्हणाल ह्या चित्रपटात काहीच चांगले नाही का? तसा संजीवकुमारचा अभिनय आहे, पण एकंदर चित्रपट अगदी मामुली झाला आहे. मूळ 'इर्मा ला डूस'चे वजन त्याला अजिबात आले नाही. आणि तशी अपेक्षाही आपण करू नये. शम्मी कपूरला एवढ्याचसाठी आपण मानतो. कारण त्याने लोकांना चांगलेच एप्रिल फूल केलेय म्हणून.

मनोरंजनने एप्रिल फूल केले. अपवाद फक्त प्रभंजनचा. त्याने तरी अजून कुणालाच एप्रिल फूल केले नाही. जाहिरातीप्रमाणे तरी ते बिनधास्त नि बेधडक वाटते. निदान वाचकांचे मनोरंजन तरी करते. ☐ ☐

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## मीनाकुमारीची जागा घेणारी राखी

झाले; राखीची शेवटची पिक्चर्स येऊ लागली. ती चित्रपट संन्यास घेणार आहे की नाही, कुणास ठाऊक ? नट्यांचं काही सांगवत नाही. राखीचंही काही सांगवत नाही. गुलझारबरोबर ती सुखी झाली असण्याचाही धोका आहेच. मुलगी झाली आहे तिला. म्हणजे ती आता संसारसुख सोडून कशाला पडद्यावर येईल ? नाहीतरी आजकालच्या वरच्या थरातील मुली पडद्यावर लग्न करण्यासाठीच येतात असा आपला समज बनत चाललाय. पूर्वी कारकुनांच्या मुली राष्ट्रसेवा दलात जात नसत का, तसंच ! राखीची ' पगली ' मधली भूमिका प्रत्येकाने पहावी अशी माझी खास शिफारस आहे. या आठवड्यात एका वेळेला दोन ' पगली ' पडद्यावर आल्या आहेत. ' दोस्त 'मध्ये हेमा आणि ' पगली ' मध्ये पगली. ' दोस्त 'मध्ये हेमा. एक लाडावलेली श्रीमंताची मुलगी आहे, जिला माणसे कळत नाहीत. तिला रविंद्र कपूर या ' कॉमिडी कम व्हिलन 'शी लग्न करायचे नसते त्यामुळे ती त्याला तोंड सोडून ' गद्धेके बच्चे ' वगैरे शिव्या देते, आणि त्याच्या वैतागापासून छुटकारा मिळवण्यासाठी धर्मेंद्र या अपरिचित तरुणाला सरळ विचारते, ' माझ्याशी प्यारचे नाटक करशील काय ?' एकूणच हेमाने ही भूमिका ' पगली 'च्या लेव्हलवर केलेली आहे. पण ' पगली 'मध्ये राखीने ही भूमिका अस्सलपणे निभावली आहे. ती एकदा हवेत भाकऱ्या करत असते, तो प्रसंग घ्या किंवा, ती राकेश रोशनबरोबर हॉटेलात रहात असताना मध्यरात्री, राकेशला, तुला मुलं किती ? म्हणून विचारते, असले सवाल विचारताना; किंवा भर पावसात एका हॉटेलच्या बाहेर कुत्र्याची शेपटी सरळ करत बसलेली असते. तो प्रकार भलताच अस्सल वाटतो. पगलीच्या भूमिकेत, तिला आपण काय करतो, काय बोलतो किंवा वागतो याचे भान नसते. ही गोष्ट कोणीही केलीच असती पण तिचे डोळे विलक्षण पेटलेले दिसतात. वेड्यांचे असेच डोळे पेटतात. यापूर्वी संजीवकुमारसारख्या एखाद्याच अभिनेत्याचे डोळे पेटलेले (खिलोना, अनहोनी) आपण पाहिले आहेत. राखीची भूमिका अर्थात ' पगली 'ची नव्हती. तो एक ड्रामा होता. परंतु तिचा तो ' पगली 'चा नकाब उतरेपर्यंत आपण तर ती पगली आहे असेच समजत होती. हीच राखीची कमाल होती. बाळसे धरलेल्या मुलासारखा तिचा चेहेरा आहे. गोबरे गाल. मण्यासारखे गहिरे, बोलके डोळे. इवलेसे तोंड. बसकेच नाक. बहुतेक बंगाली बायकांचा चेहेरा असाच असतो. पण राखी ही खास बंगाली मादी वाटते. (ती केव्हाही भेटली तर आपण बंगला देशमध्ये असताना कसे मासे खात असू हे तुम्हाला सांगेल व गोडे मासे मिळाले तर मी तुम्हाला जेवायला बोलवीन म्हणून एक स्टँडिंग आमंत्रण देऊन ठेवील ! ) गोड्या पाण्यातले मासे खाऊन तिचं शरीर कुठल्याही बंगाली बाईप्रमाणे गच्च गराने (प्रोटीन) भरलेले आणि भारलेले आहे. मला आठवतं ती मला ' जीवन मृत्यु ' या तिच्या पहिल्या चित्राच्यावेळी भेटली होती. अजय विश्वासशी काडी मोडून ती सिनेमाच्या क्षेत्रात उतरली. त्यावेळी

सिनेमा क्षेत्रातही हिरॉइन्सचा तुटवडा होता. आम्हा पत्रकारांना ती भेटली त्यावेळी ती नाजूक गोड आणि सफेद तगरीच्या फुलासारखी टवटवीत वाटली. त्या दिवसापासून राखी आपल्या मनावर ' छा गई. ' राखी आणि रेखा या दोन नटच्यांपासून हिंदी सिनेमात एक नवा जमाना सुरू झाला. कॉंट्रॅक्टस जास्त आणि रीलीजेस कमी. राखीची अवघी दोन पिक्चर्स बाजारात आली होती. ' जीवन मृत्यु ' आणि ' पारस '. पण तिने कॉंट्रॅक्टस काय साईन केली होती. नर्गीस सारखी बुर्जुग अभिनेत्री ज्याला त्याला राखीची शिफारस करू लागली होती. राखी आणि रेखा यांना मिळालेल्या पिक्चर्समुळे या दोघीजणींनी सिनेमा धंद्यात निर्मात्यांना खुश करण्यासाठी कशालाही तयार होऊन अक्षरशः धमाल चालवली आहे असे म्हटले



जाऊ लागले.
त्यानंतर राखीला चमकविणारी दोन पिक्चर्स आली. शर्मिली आणि रेश्मा और शेरा. शर्मिलीमध्ये डबल रोलमध्ये तिने व्हँपची भूमिका अदा केली. अत्यंत क्रुएल बाई. ती ज्याप्रमाणे नायक शशी कपूरच्या प्रेयसीच्या हमशकलचा फायदा घेऊन त्याला धोका देते, तो भाग शशीकलेलाही अदा करता आला असता की नाही कुणास ठाऊक ? शर्मिलीतील तिची भूमिका इतकी खूबसुरत होऊनही हेमाच्या ' सीता और गीता 'मुळे मागे पडली. (एरव्ही त्यावर्षीचे अवॉर्ड राखीलाच जायचे ! ) शर्मिलीमुळे एक गोष्ट झाली. शशीकपूर आणि राखी यांची एक ' मेड फॉर इच अदर ' सारखी जोडी पडद्यावर आली. अर्थात त्यांचे राजेश-शर्मिला, किंवा धर्मेंद्र-हेमासारखे तुफान चालणारे चित्रपट लागले नाहीत.

' रेश्मा और शेरा 'मध्ये राखीला छोटीशीच भूमिका होती. लग्न होताच विधवा झालेल्या बाईचा शोक तिने अदा केला होता. राखीने त्या लहानशा भूमिकेत, बाई आभाळ कोसळल्यावर कशी मोडते हे दाखवले होते.

राखी आणि रेखा आता सर्व हिरो लोकांच्या बरोबर भूमिका करताना दिसू लागल्या होत्या. जणू त्यांच्यात स्पर्धाच लागली होती. राखीने देव आनंद (बनारसी बाबू) संजय (अनोखी पेहचान) राजेंद्र कुमार (अनबन) मनोजकुमार (बेईमान) राजकुमार (लाल पत्थर) राजेश खन्ना (ठोकर) अशा हिरोंचे हिरॉइनपद भूषवले आहे. यातील ' बेईमान ' सोडला तर एरव्ही तिच्या भूमिकाविषयी काहीच सांगण्यासारखे नव्हते. ' लाल पत्थर 'मध्ये तिचा मुकाबला हेमाशी होता, अनोखी पेहेचानमध्ये सिमीशी आणि बनारसी बाबूमध्ये योगिता बालीशी. या मुकाबल्यात ती उभी राहू शकेल इतक्याही तिला भूमिका नव्हत्या. एका इंग्रजी सिने-नियतकालिकाने ' लाल पत्थर ' मधील हेमाची भूमिका त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट आणि राखीची भूमिका सर्वात निकृष्ट ठरवली होती. वाटेल तशा भूमिका स्वीकारण्याचा हा परिणाम. ' बेईमान ' ' आखो आखो मे ' (नायक राकेश रोशन) ह्या तिच्या काही चांगल्या भूमिका. अर्थात सिनेमा धंदा होता. काही फ्लॉप भूमिका काही चांगल्या भूमिका हे चालणारच होतं. पण राखीने ' लाल पत्थर 'मध्ये हेमाच्या मुकाबल्यात जो मार खाल्ला तो आपल्या मनाला फारच लागला. (त्याचा सूड राखीने ' जोशीला 'मध्ये पाहुणा कलाकार म्हणून भूमिका करून घेतलाच ! ) याचवेळी तिचे गुलझारशी लग्न होणार असल्याच्या आणि ती सिनेमातून निवृत्त होणार असल्याच्या बातम्या उठू लागल्या. एरव्ही कोणतीही नटी निवृत्त होते—मुमुसारखी—

राखी—देव. हीरा आणि पन्नावर मात करणारी तिची बहीण राखी




तरी ती नेहमीच चटका लावून जाते असे नाही. पण राखीने तो लावला. ‘ दाग ’मध्ये तिची भूमिका जवळ जवळ शर्मिलाला सहाय्यक होती. पण राखीने कोर्टात जबानी देताना, राजेशला ‘ तुझ्या-माझ्यात दर्दका रिश्ता आहे ’, असा डायलॉग जबरदस्त रितीने अदा करून ती दर्द जागवून गेली, राखीला एक आवाज आहे–दर्द जागवणारा. मीनाकुमारीनंतर आवाज असलेली अभिनेत्री म्हणून राखीच होती. आधीच कुठच्याही बंगाली बाईप्रमाणे राखी आपल्या घरात आपल्या डोळ्यासमोर वावरावी असे वाटायचे. आणि तिच्या संथ, गहिऱ्या, दर्दिल्या आवाजाने ती आपली कुठची तरी तारच छेडून टाकायची. मीनाकुमारीनंतर ही बाई आपल्याला झपाटणार असे वाटू लागले होते. ‘ ब्लॅक मेल ’, ‘ हीरा-पन्ना ’, ‘ पगली ’, ‘ जोशिला ’ अशा चित्रपटातून ती इथे तिथे पहायला मिळायची पण आता अभिनेत्री म्हणून तिचे आयुष्य संपलेच होते. त्यामुळे अर्धवट चढलेल्या नशेप्रमाणे राखीच्या अदाकारीच्या प्रत्ययासाठी मन ओढतच राहणार आहे. ◘



देव नेहमीच झीनत सारख्या ‘ डार्लिंग डार्लिंग ’ची नजर दूरच्या मंझीलकडे नेत असतो.

विनोद खन्ना ‘ इम्तेहान ’साठी तनुजाला चित्रकलेची साधने हाजीर करतो आहे.





उमज पडेल तर
चित्रपटात
वकीलाच्या भूमिकेत

# आत्माराम भेंडे

## विलक्षण सामर्थ्याचा नट

माधव कुलकर्णी

बबन प्रभू
आत्माराम भेंडे
'झोपी गेलेला'चा
पन्नासावा प्रयोग



तो अभिनय अजून काल पाहिल्याइतका ताजा वाटतो आहे. 'सुंदर मी होणार' या पु. ल. देशपांडे लिखित, दिग्दर्शित नाटकाचा तो पहिला प्रयोग होता. 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाच्या अभूतपूर्व यशामुळे पु. लं. च्या नव्या नाटकाविषयीची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. त्यावेळी मी नाशिकला रहात होतो. पण नव्या नाटकांची पर्वणी साधण्यासाठी मुद्दाम मुंबईला येत होतो. महत्प्रयत्नानं मी एक तिकीट मिळवलं आणि केळेवाडीतल्या खुल्या नाट्यगृहात दाखल झालो. या प्रयोगात दाजी भाडवडेकर, पु. ल. देशपांडे, सुनिता देशपांडे, विजया जयवंत, आत्माराम भेंडे इत्यादी नामांकित नटमंडळींची कामं होती. मोठ्या भूमिका होत्या दाजी भाटवडेकर, सुनीता देशपांडे आणि पु. ल. देशपांडे यांच्या. त्यामानानं विजया जयवंत (बेबीराजे) आणि आत्माराम भेंडे (डॉक्टर) यांच्या भूमिका लहान होत्या. पण या दोघांनीच नाटक अक्षरशः खाऊन टाकलं बेबीराजेचा निरागस अवखळपणा विजयानं बेमालूम खुलविला तर डॉक्टरची पैलूदार भूमिका आत्माराम भेंडे रंगभूमीवर जगून गेले मी पाहिलेली भेंडे यांची ही पहिली भूमिका—प्रतिभेच्या सामर्थ्यानं झळाळणारी. भेंडे हा विलक्षण सामर्थ्याचा नट आहे याची जाणीव मला पहिल्या भेटीतच झाली.

माझी आणि भेंडेंची ही पहिली दृष्टभेट असली तरी या भूमिकेपावेतो भेंडेंनं आपल्या भूमिकेचं शतक केव्हाच ओलांडलं होतं. जीवनातले आणि नाटचक्षेत्रातले अनेक कडू-गोड अनुभव पचवले होते आणि त्यातूनच साहित्य संघाशी आपलं जमणार नाही-हा रंगमंच आपल्यासाठी नाही असा निर्णयही घेतला होता. पण पु. लं. नी या निर्णयाला भीक घातली नाही. 'साहित्य संघ कुणा एका व्यक्तीचा नाही; तो सर्वांचा आहे, आपण तिथे जाऊन काम करू.' अशी रास्त भूमिका पु. लं. नी घेतली आणि त्यासाठी जे गुणी नट गोळा केले त्यात आत्माराम भेंडे हे नाव महत्त्वाचं. पु. लं. च्याच 'तुझे आहे तुजपाशी'त काम करणारे अनंत वर्तक दिल्लीला गेले आणि त्यांची भूमिका ऐनवेळी भेंडेला करावी लागली. Show must go on ही भेंडेची भूमिका असल्यामुळे पुढेसुद्धा 'तो मी नव्हेच' या नाटकात प्रभाकर पणशीकरची भूमिका अल्पावधीत मो. ग. रांगणेकरांना त्यांच्याकडून बसवून घेता आली.

पण लिहिता लिहिता मी बराच पुढे आलो. आत्माराम भेंडे यांना समजून घेण्यासाठी बरंच मागे जायला हवं. त्यांना घरी आणि त्यांच्या परिसरात बापू म्हणतात. मलादेखील याच संबोधनाची सवय आहे. तेव्हा यापुढे बापू या नावानंच त्यांचा उल्लेख करणार आहे.

सावंतवाडीहून पंधरा मैलांवर असलेलं, तेरेखोल खाडीनजीकचं आरोंदा हे बापूंचं जन्मगाव. निसर्गसौंदर्यानं नटलेल्या या गावात बापूंचं बालपण गेलं. आरोंदा हे गोवा हद्दीला लागून आहे. मध्ये फक्त खाडी. दोन पैशात तरेनं हे अंतर तोडता यायचं. त्यावेळी गोव्यात अतिशय स्वस्त मिळणारी दारू पिण्यासाठी गावातली काही अस्सल मंडळी सायंकाळी तरेनं गोव्यात जायची व रात्री तर्र होऊन तरेनंच समाजवादी थाटात हा गरीब हा श्रीमंत असा भेदभाव न पाळता गळ्यात गळे घालून, एकमेकांना सांभाळीत परत यायची. चोरट्या सोन्याच्या व्यापाराचंही ते मोठं केंद्र होतं. पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे गोव्यातली अनेक सारस्वतांची मुलं इंग्रजी आणि मराठी शिक्षणासाठी आरोंद्याला येत असत. आरोंद्याच्या शाळाही नामांकित होत्या. याच शाळेत बापूंचं ४ थीपर्यंतचं शिक्षण झालं. बापूंचे वडील अतिशय कर्तबगार होते. कापडाचा व्यापार करणाऱ्या एका जॅपनीज कंपनीचे ते मॅनेजर होते. त्यामुळे त्यांना सतत फिरावं लागे. बापूंची आईदेखील या फिरस्त्यांमुळं चौकस आणि व्यवहारदक्ष झाली. पण भेंडे कुटुंबाचं दुर्दैव असं की, हा कर्तबगार माणूस अकाली देवाघरी गेला. त्यावेळी बापू ४–५ वर्षांचे होते. काही वर्षं त्यांना आजोबांचं छत्र लाभलं पण वडिलांचा हात पाठीवरून फिरल्याच्या आठवणी देखील उरल्या नाहीत. त्यांना त्यांच्याहून मोठे तीन भाऊ होते. त्यांच्या शिक्षणावर आईचा इतका पैसा खर्च झाला की, धाकट्याच्या शिक्षणासाठी जवळ काहीच उरलं नाही. चवथीनंतर चुलत्यांच्या आग्रहाखातर बापूंना आणि त्यांच्या आजोबांना घेऊन आई मुंबईत आल्या पण आजोबांना थोड्याच काळात देवाज्ञा झाली आणि दिराशी न पटल्यामुळे आईने स्वतंत्र संसार थाटला. पण पैशाचं काय ? वडील मुलगा लक्ष देईना. मधल्याचा थोडा आधार. ज्या एकावर खूप आशा केंद्रित झाल्या होत्या त्याचा अपघाती मृत्यु. बापूंच्या शिक्षणासाठी फी देणंसुद्धा आईंना अशक्य होऊन बसलं. शाळेतून नाव काढण्यासाठी ते शिक्षकांकडे गेले. परंतु या हुशार मुलाला वाऱ्यावर सोडायला शिक्षक तयार झाले नाहीत. अभ्यास, खेळ, नाटक, संगीत या सर्वांमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या बापूंना शाळेनं फ्री शिप दिली. शिवाय काही स्कॉलरशिप्स मिळाल्या आणि बापूंचं शिक्षण चालू राहिलं.

त्यावेळी नाटचसंस्था जवळजवळ नामशेष झाल्या होत्या पण काही क्लब्ज् हौशीनं नाटकं करीत होते. त्यातला चित्तरंजन प्रख्यात होता. 'टाकलेलं पोर' हे प्रबोधनकार ठाकऱ्यांचं नाटक याच समाजाने केलं. विठोबा झावबा यांच्याकडे या समाजाची सूत्रं होती. झावबा मोठे रसिक, गुणज्ञ आणि अभिनयपटू होते. त्यांनी आत्मारामाची स्त्री भूमिकेसाठी निवड केली आणि त्यांच्याकडूनच



कुटुंबकबिला

बापूंना अभिनयाचे पहिले धडे मिळाले. आत्माराम भेंडे यांनी आयुष्यात कुणाचा गंडा बांधला नाही. स्वतःच्याच वाचनातून, चिंतनातून आणि अवलोकनातून त्यांनी आपली कला वाढवली, फुलवली. केशवराव दाते, बाबूराव पेंढारकर हे त्यांचे गुरुतुल्य स्नेही. पण गुरू नव्हेत. पु. लं. बद्दलही त्यांना अतिशय प्रेम आणि आदर. पण या प्रभावळीत गुरु दक्षिणाच द्यायची झाली तर ती विठोबा झाववांनाच. विठोबांच्या मार्गदर्शनाखाली बापूंनी अनेक स्त्री भूमिका केल्या. अभ्यांच्या नाटकातील स्त्री भूमिकाही त्यावेळी केल्या आणि नंतर सर्व मोठ्या पुरुष भूमिकाही केल्या.

पण नाटकांच्या या उद्योगातून पैसा मिळत नव्हता आणि पैशाची तर त्यांना विलक्षण गरज होती. अशा परिस्थितीत बहुधा १९४१ साल असावं ते... आकाशवाणीचे श्रीकृष्ण सामंत त्यांना रेडिओवर घेऊन गेले. आवाजाची परीक्षावगैरे झालेली नसतानाही त्यांना भूमिका देण्यात आली आणि मग पाठोपाठ भूमिकांचं सत्रच सुरू झालं. त्यावेळी पुरुष कलावंतांना पाच रुपये आणि स्त्रियांना दहा रुपये मानधन मिळत असे. पण कुणाला किती Contracts द्यायची यावर हल्लीसारखं बंधन नसे. त्यामुळे भेंडेना असंख्य Contracts मिळाली आणि त्यांना चरितार्थाचा जणू एक मार्गच उपलब्ध झाला.

या रेडिओवरच कु. लिली इझिक्रेल आणि आत्माराम भेंडे यांची ओळख झाली आणि तिच्याशीच पुढे त्यांचं लग्न झालं. ह्याच आजच्या सौ. आशा भेंडे आज टाटा इंन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क या मान्यवर संस्थेत त्या डेमोग्राफी या विषयाच्या प्राध्यापिका आहेत. बापूसुद्धा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन मध्ये मोठे अधिकारी आहेत. चेंबूरला (देवनार) त्यांचा स्वतःचा उत्तम बंगला आहे. दोन गाड्या आहेत. नोकर-चाकर आहेत पण आज अशा रीतीनं वैभवात लोळणाऱ्या भेंडे दांपत्याच्या लग्नाची कहाणी मोठी गमतीदार आहे.

त्यावेळी बापूंनी VJTI चा Textile Engineer चा डिप्लोमा मिळवला होता पण रिट्रेंचमेंटमध्ये त्यांची नोकरी गेली होती. १९५० चा हा सुमार आहे. लिली आणि आत्माराम यांचं प्रेम जमलं आणि त्यांनी लग्न करायचं ठरवलं. त्यापूर्वी त्यांनी रेडिओवर आणि INT च्या नाटकात एकत्र भूमिका केल्या होत्या. पण घरी लग्नाचं सांगितल्यावर 'तो काय करतो ?' असं विचारणारच तेव्हा काय सांगायचं असा प्रश्न पडला म्हणून त्यांनी ही गोष्ट गुप्त ठेवली. तशो इझिक्रेल फॅमिली प्रागतिक मतांची. लिलीची आई मोठी समाजसुधारक (सुप्रसिद्ध कला समीक्षक निस्सीम इझिकेल हे लिलीचे बंधू ) बापूंची आईदेखील मोठ्या मनाची. परंतू बापूंना नोकरी लागेपर्यंत घरी बोलण्याची दोघांनाही हिंमत होईना. अखेर भेंडेला व्हॉलफॉल ब्रदर्समध्ये नोकरी लागली आणि या ज्यू-सारस्वत लग्नाला दोन्ही घरांनी संमती दिली. रजिष्टार कचेरीत जाऊन त्यांनी लग्नाची रीतसर नोटीस दिली. रिसेप्शन करणं बापूंना अजिबात मान्य नव्हतं म्हणून तोही कार्यक्रम रद्द करण्यात आला. नवीन नोकरी असल्यामुळे रजेचा प्रश्नच नव्हता. तेव्हा ऑफीस सुटल्यावर कचेरीत जायचं आणि लग्न नोंदवायचं असं ठरलं. पण कचेरी पाच वाजता बंद व्हायची. तेव्हा तासभर आधी विचारून यायचं भेंडेनं कबूल केल. चार वाजता भेंडेनं साहेबाला विचारलं—

'जरा लवकर जाऊ का ?'

'का ?'

'लग्नाला जायचं आहे'

'कुणाच्या ?,

'माझ्याच'

बापूंनी थंडपणानं दिलेलं हे उत्तर ऐकून साहेब भडकला.

'गाढवा, स्वतःचं लग्न होतं तर आलास कशाला ऑफीसात ? जा. लवकर चालता हो. आणि आठ दिवस येऊ नकोस. तुझी रजा मी मंजूर केली आहे.'

नवरदेव लग्ननोंदणी कचेरीत आले. नोंदणी विधी पार पडला. लीलीचे कुटुंबीय घरी परतले आणि बापूंच्या आईनं जेवायला बोलावलं असल्यामुळे हे नवविवाहित दांपत्य चक्क ट्रॅमनं गिरगावात आलं. ठाकूरद्वारच्या नॅशनल होस्टेलमध्ये त्यांचा नवा संसार सुरू झाला.

हे लग्न होण्यापूर्वी आणि झाल्यानंतरही नाटक हाच बापूंच्या जीवनाचा ध्यास होता. १९४२-४३ च्या सुमारास समाजवादी विचारसरणीच्या मंडळींनी इंडियन नॅशनल थिएटरची स्थापना केली. जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, कमलादेवी चटोपाध्याय इत्यादी नामवंत मंडळी INT च्या पाठीशी होती. कॉम्युनिस्ट मंडळींची 'इप्टा' ही सांस्कृतिक संस्था त्यापूर्वीच सुरू झाली होती. म्हणूनच असेल कदाचित की समाजवादी विचारसरणीच्या मंडळींना INT ची आवश्यकता वाटली असावी. INT च्या मराठी विभागासाठी माधव मनोहरांचं यशाची शिंगे हे नाटक निवडण्यात आलं आणि दिग्दर्शनाची जबाबदारी सोपविण्यात आली आत्माराम भेंडे यांच्यावर. बापूंचं हे पहिलं दिग्दर्शन. या नाटकापासूनच बापू रंगभूमीच्या नव्या प्रवाहाकडे ओढले गेले.

संगीताच्या अतिरेकानं मराठी रंगभूमी मारली असा एक जबरदस्त विचारप्रवाह त्यावेळी अस्तित्वात होता. त्यांनीच Reactionary नाटकं मराठी रंगभूमीवर आणायला सुरुवात केली. वास्तवता हा त्यांच्या डोळ्यासमोरील आदर्श होता. या वास्तवाच्या परिपोषणासाठी नेपथ्य, प्रकाशयोजना यात जाणीवपूर्वक बदल करण्यात आला. भेंडे आणि त्यांचे सहकारी यांच्याकडे नव्या सांप्रदायाचं नेतृत्व आपोआपच चालत आलं. INT साठी या मंडळींनी 'मधाचे मोहळ' 'झोपलेले नाग' 'फोन नं. ३३३३३' 'क्रॅप्स लास्ट टेप' 'नरो वा कुंजरोवा' 'साक्षीदार' 'माते तुला काय हवंय' (नटवर्य नानासाहेब फाटक यांची नव्या नाटकातली ही शेवटची भूमिका) इत्यादी बरीच नाटकं रंगभूमीवर आणली. असे हे प्रायोगिक नाटकांचे अग्रणी आज प्रायोगिक नाटकापासून दूर झालेले दिसतात. त्याचं कारण विचारलं तेव्हा बापूंनी प्रांजल उत्तर दिलं— 'आमचे प्रयोग मुख्यतः तंत्रविषयक होते. आज व्यावसायिक रंगभूमीनंदेखील हा तांत्रिक बदल मान्य केला आहे नव्हे त्याशिवाय तिचे आता चालत नाही. आमच्या डोळ्यासमोरचं मर्यादित ध्येय साकार झाल्याचा आनंद आम्हाला मिळाला आहे. आज आशय आणि आविष्कारात अनेक प्रयोग चालू आहेत. त्यातले जे प्रामाणिक आहेत त्याविषयी आम्हाला निश्चितच आस्था आहे. पण प्रामाणिकपणा कितपत आहे याचा मात्र शोध घ्यायला हवा.

'फार्स हा सुद्धा तुमचा एक प्रयोगच होता ना ?'

'अर्थातच पूर्वी गणपतराव जोशींसारखे प्रख्यात नटदेखील गंभीर नाटकांच्या मध्यंतरात छोटे छोटे विनोदी फार्स करीत असत. ह्याच परंपरेला नवं स्वरूप देण्याचं आम्ही ठरवलं. बबनप्रभूंनी काही इंग्रजी फार्स वाचले होते व त्यातल्याच एका फार्सचं स्वैर रूपांतर केलं होतं. आम्ही ते ठाकठीक केलं आणि जुन्या परंपरेची आठवण म्हणून 'झोपी गेलेला जागा झाला' या नावानंच आमचा नवा प्रयोगशील फार्स रंगभूमीवर आणला.

'फार्सची वैशिष्ट्ये कोणती ?'

'फार्स म्हणजे जीवनाकडे मिष्किलपणे पहाण्याची कलात्मक दृष्टी. व्यंगचित्रकाराप्रमाणेच जीवनातील विसंगतीवर, दांभिकपणावर मजेशीर कोरडे ओढणे आणि त्यासाठी विशिष्ट व्यंगचित्रात्मक पद्धतीने पात्रं रंगभूमीवर उभी करणं, त्यांच्या हालचाली ठरवणे ही आमच्या प्रयोगाची वैशिष्ट्ये होती. आमचा हा प्रयोग लोकांना अतिशय आवडला. त्यानंच प्रोत्साहित होऊन आम्ही 'दिनूच्या सासूबाई राधाबाई' हा दुसरा फार्स केला. आणि नुकताच आलेला 'पळा पळा कोण पुढे पळे तो' हा फार्स पाहिलात तर आमचा हा प्रयोग अजूनही चालू आहे हे तुमच्या लक्षात येईल. परंतु दुर्दैवानं फार्स हा प्रकार हौशी व व्यावसायिक मंडळींना अजून समजावा तितका समजलेला नाही (काही अपवाद वगळता) काही अश्लील कोटया आणि बराचसा धांगडधिंगा म्हणजे फार्स अशी अनेकांची समजूत आहे.

'तुम्ही स्वतंत्रपणे नाटयसंस्था चालविण्याचा प्रयत्न का करीत नाही.'

'नाही कसा ? INT ची सुरुवातीची दोनतीन नाटकं केल्यानंतर लगेच तेथील व्यापारी वृत्तीला कंटाळून मी व माझ्या सहकाऱ्यांनी खिशात दमडा नसताना 'कलाकार' ही संस्था सुरू केली व याच संस्थेतर्फे माधव मनोहरांचं 'आई' हे अनुवादित नाटक रंगभूमीवर आणलं. हल्ली 'पूर्णिमा' या आमच्याच संस्थेतर्फे 'पळा पळा...'चे प्रयोग होत आहेत.

'नाही बापू, माझा प्रश्न थोडा वेगळा आहे मला असं म्हणायचं आहे की १९६०–६१ पासून मराठी रंगभूमीचे नवं पर्व सुरू झालं. मुंबई-पुण्यातलं नाटक महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचू लागलं आणि नाटयव्यवसाय पुन्हा उभा राहिला. अशा संक्रमण काळात कुणा सिनेनटांची नाटकं दिग्दर्शित करणं किंवा कधीमधी कुणाच्यातरी नाटकात एखादी भूमिका करणं येवढयावरच तुम्ही समाधान का मानलंत ?'

'तुमचा प्रश्न रास्त आहे. पण माझ्या पूर्वायुष्याकडे नजर टाकलीत तर तुमच्या लक्षात येईल की मी सतत अस्थिर आणि हालाखीचं जीवन जगत आलो आहे. सहाजीकच अनेक वर्षे कष्ट केल्यानंतर मोठया नोकरीच्या रूपानं मिळणारं स्थैर्य मला नाकारता येणं शक्यच नव्हतं. कुटुंब प्रमुख म्हणून माझ्या मुलांना, सुखाचं आणि भरभराटीचं जीवन मिळवून देणं माझं कर्तव्य होतं आणि तेच मी बजावलं. मी स्वतःपेक्षा माझ्या कुटुंबाचा विचार केला. दिग्दर्शक म्हणूनही मी इतरांना मोठया भूमिका देऊन आधी पुढे आणलं. नट म्हणून माझं स्थान आज काय आहे याची मला कल्पना नाही. पण माझ्या मुलांना मी नावारूपाला आणतो आहे हे निश्चित. माझी मुलगी निमा (पूर्णिमा) M. A. with Sociology पहिल्या वर्गात पास झाली असून आता टाटा-इन्स्टिटयूटमध्ये रिसर्च असि. म्हणून काम करते आहे. पाश्चिमात्य संगीताचा तिचा अभ्यासही दांडगा आहे. माझा मुलगा नंदा आज सिनि. B. A. ला आहे. शिवाय पॉप म्यूझिकमधील त्याची प्रगती थक्क करण्याइतकी आहे. ताजमधल्या बीफ एनकाउंटरमध्ये त्याचे कार्यक्रम होत असतात. शिवाय अलेक पदमसी यांचा 'जीजस ख्राईस्ट सुपरस्टार' हा महत्त्वाकांक्षी प्रयोग मुंबईत चालू आहे त्यात नंदा (ज्यूडास) आणि निमा (लेडी मॅग्डलिन) लीडिंग रोल्स करीत आहेत.'

या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे बापूंचं जीवन सुखी आणि समृद्ध आहे असंच म्हटलं पाहिजे. त्यांच्या या यशामध्ये आशाताईंचा वाटा फार मोलाचा. एके काळची ही कथ्थक डान्सर पार्वती कुमारांची शिष्या. शिवाय अनेक नाटकामधली बापूंचीच हिरॉईन. पण त्यांनीसुद्धा हळूहळू आपल्या अभ्यासात लक्ष केंद्रित केलं आणि आपल्या विषयातला विशिष्ट अधिकार प्राप्त केला. बापूंना अनेक लहानमोठया प्रसंगात सांभाळणारी, धीर देणारी ही शांत, विचारी सुगृहिणी आज त्यांना सांगते आहे, 'आता मी घर सांभाळीन, तुम्ही आपल्या कलेला संपूर्णतः वाहून घ्या.'

आत्माराम भेंडे यांच्या अभिनयातील विविधता आणि कस अनुभवणाऱ्या माझ्यासारख्या मित्रांचं त्यांना आता एकच सांगणं आहे—

'देवानं तुम्हाला विपुल पैसा आणि सौख्य दिलं आहे. आता कुठल्यातरी नाटकात भूमिका करीत बसू नका. असं एखादंच नाटक रंगभूमीवर आणा की जे पाहून आम्ही थक्क होऊ, आमचे डोळे निवतील.

बापूंना रसिकतेचा हा हट्ट पुरवावाच लागेल. □ □


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. २७ एप्रिल ते ३ मे ७४

**कम्युनिस्टांच्या मान्यात बाबू जगजीवनराम**

सध्या दिल्ली राजधानी तशी सुस्तच आहे. लोकसभेचे अधिवेशन सुरू असले तरी त्याची दखल फारशी नाहीच. सध्या गाजत आहेत ती निरनिराळी राज्ये. गुजरात, बिहार, मध्यप्रदेश, पाँडेचरी अशी राज्ये राजकीय संघर्षात घुसळून निघत आहेत. पण या आठवड्याचा चंद्र भारताच्या स्वस्थानी आहे. त्याचबरोबर बाबू जगजीवनराम यांना शनी-मंगळ युतीचा परिणाम व मिथून चंद्राची प्रतिकूलता जाणवणार आहे. प्रामुख्याने कम्युनिस्टांकडून त्यांच्याबद्दलचे 'प्रतिगामी' चित्र पंतप्रधानांकडे रंगवले जाईल. त्यांच्यावर टीकेची झोड उठेल. श्रीमती इंदिरा गांधी थोड्याफार गोंधळाच्या मनःस्थितीत राहतील. महाराष्ट्रात राजकीय वादळ मोठ्या प्रमाणात घोंगावेल. एखादा आर्थिक निर्णय केंद्रात घेतला जाईल. टी. ए. पै यांना थोडा त्रास.

**मेष : मित्रांचे सहकार्य**

हा आठवडा आपणास काही महत्त्वाच्या कामात मोठे यश देऊन जाणार आहे. मित्र ही तुमची मोठी संपत्ती आहे. तुम्हाला नेहमीच श्रीमंत मित्र लाभलेले असतात. आठवड्याची सुरुवात मिथून चंद्राने होत आहे. शनिवार ते बुधवार तुमच्या कल्पनेतील औद्योगिक योजना सरकारमधील एखाद्या श्रेष्ठ मित्राच्या मदतीने साकार होण्याचा योग आहे. रेस, लॉटरी वा अन्य कोणत्याही अकल्पित धनाच्या नादी मात्र या वेळी लागू नका. लेखकांनी आपले वाङ्मय वैयक्तिक टीकेपासून दूर ठेवावे. अब्रू नुकसानीचा खटला त्यांच्यावर होण्याची शक्यता आहे. वृत्तपत्र व्यवसायातील या राशीच्या व्यक्तींनी अशीच काळजी घ्यावी. गुरुवार व शुक्रवार जमिनीच्या व्यवहाराला फायदेशीर आहेत. **महिलांस :** सार्वजनिक कार्यात मैत्रिणीबरोबर मतभेद होतील. नोकरी नसणाऱ्यांना नोकरी मिळेल. ◻

**वृषभ : कौटुंबिक आनंद**

रसिक वृत्ती व सौंदर्याची आवड हे तुमच्या स्वभावाचे खास वैशिष्ट्य आहे. त्याला अनुकूल असाच हा आठवडा आहे. शनिवार ते सोमवार रम्य वातावरणात घरातील सर्व कुटुंबाच्या सहवासात घालवाल. सारी दुःखे विसरून जाल. डोकेदुखी, अनेक दिवस सतावीत असलेला शारीरिक आजार कमी होत असल्याचा प्रत्यय येऊ लागेल. कलाक्षेत्रात ज्यांना प्रवेश मिळवायचा असेल त्याने सोमवारनंतर प्रयत्न करावा. सोमवार उपासनेला उत्तम असून त्या दिवशी तुमचा मंगलकार्यासाठी खर्च होईल. कापड व कागद व्यापार करीत असतील त्यांना बुधवार ते शुक्रवार खूप फायदा होईल. नाटक कंपनीचे नाटक शुक्रवार व शनिवार फायद्यात असेल. **महिलांस :** कुमारिकांच्या नृत्यगुणांचे कौतुक होईल. कलाक्षेत्रात नोकरी मिळेल. पैशाची कमतरता नाही. ◻

**मिथून : नोकरीबद्दल उद्वेग**

केतू बारावा व राशीत शनी मंगळाची युती नुकतीच होऊन गेली आहे. त्यांचे थोडे बहुत परिणाम या आठवड्यात दिसू लागणार आहेत. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वाचे भरपूर कौतुक करतील. पण त्याचबरोबर गोड बोलून असे काही नवे उद्योग तुमच्यावर सोपवतील की, तुम्ही अगदी वैतागून जाल. नको ही नोकरी असे होऊन जाईल. कामाचा ताण एवढा वाढेल की, तुम्हाला थोडीदेखील उसंत मिळणार नाही. घरात पत्नीच्या आजाराची काळजी निर्माण होईल. मुले मनाविरुद्ध वागतील. रविवार ते बुधवार थोडेफार त्रासाचे दिवस आहेत. गुरुवार व शुक्रवार व्यापारी व्यवहारात फायदा होईल. आर्थिक स्थिती सुधारेल. अपेक्षित पैसा मिळेल. **महिलांस :** प्रयत्नाच्या मानाने यश कमी. लघुउद्योगातील महिलांस थोडे अनुकूल वातावरण आहे. ◻

**कर्क : नोकरीत दक्ष राहा**

गेल्या आठवड्यात शनी-मंगळाची युती तुमच्या व्ययस्थानी झाली होती. या आठवड्याची सुरुवात बाराव्या चंद्राने होत आहे. त्यामुळे पहिले चार दिवस तरी जरा जपून वागावे. वरिष्ठांबद्दल अगदी जवळच्या मित्राकडेदेखील अनुदार उद्गार काढू नका. तुमच्याबद्दल संशय निर्माण होईल असे काही करू नका. खाजगी नोकरीतील नोकर लोकांनी मालकांच्या विरोधी कोणतीही भूमिका घेऊ नये. एरवी हा आठवडा इतर बाबतीत प्रतिकूल नाही. पैसा मिळून खर्च होईल. रेस व लॉटरीत पैसे येतील. पण चैन व हौसेखातर पैसे उडवाल. बेकारांना काम मिळेल. कोणताही स्वतंत्र उद्योग करायला प्रत्यक्ष सुरुवात करू नका. फक्त पूर्व योजना आखायला बुधवार ते शुक्रवार उत्तम आहे. परदेशी प्रवासाची इच्छा अचानक योग आणून पुरी होईल. **महिलांस :** परीक्षेत मोठे यश मिळेल. वधूपरीक्षेत 'पास' व्हाल. ◻

**सिंह : नेतृत्वाचा लाभ**

राजकारण व नेतृत्व हाच मुळी तुमच्या राशीचा महत्त्वाचा गुणधर्म आहे. याच गुणाच्या विकासाला उपकारक ठरावा असा हा आठवडा आहे. ज्यांना नव्याने राजकारणात प्रवेश करावयाचा असेल त्याने शनिवार ते बुधवार याच दिवसात करावा. कारण अपेक्षित यश मिळवून देणारे हे दिवस आहेत. सत्तारूढ पक्षातील या राशीच्या लोकांना त्यांच्या एकूण परिस्थितीप्रमाणे लाभ होणार आहे. नोकरीत अधिकारप्राप्ती होईल. निवडणुकीत यश मिळेल. स्वतंत्र असा कोणताही व्यवसाय मात्र यावेळी करू नका. व्यापारात अनपेक्षित अडचणी निर्माण होण्याची शक्यता. पत्रव्यवहारात काळजी घ्या. बेकारांना प्रामुख्याने विज्ञान पदवीधरांना नोकरी मिळेल. संशोधनाच्या क्षेत्रात प्रवेश मिळेल. शिक्षणाच्या अपेक्षा पूर्ण होतील. **महिलांस :** संसारात सुख लाभणार आहे. अडचणीवर मात कराल. हौस करता येईल. ◻

**कन्या : मनःस्वास्थ्य बिघडेल**

तुम्ही मुळांतच अतिभावनावश आहात. त्यामुळे एखादी घटना जरी मनाविरुद्ध घडली तरी तुमचा मनावरचा ताबा उडतो. तशी शनी-मंगळाची युती तुम्हाला काही तेवढी वाईट नाही. या आठवडयाची सुरुवात मिथून राशीच्या दशमस्थ चंद्राने होत आहे. त्यामुळे पहिला परिणाम तुमच्या मनस्वास्थ्यावरच होईल. यावेळी संयमच उपयोगी पडेल. वरिष्ठांच्या कोणत्याही निर्णयावर तीव्र भावना व्यक्त करू नका. आर्थिक स्थिती थोडीफार तंगच राहील. लोकांकडून येणारे पैसे वेळच्यावेळी मिळणार नाही. नोकरीत कामाच्या ताणामुळे थकल्यासारखे वाटेल. प्रामुख्याने रविवार ते गुरुवार उसंत मिळणे कठीण. तब्येतीला उष्णतेचा त्रास जाणवेल. दुय्यम व्यवसायात मंदीचा काळ आहे. व्यापारी असाल तर लोकाकडून त्रास होईल. वकिली मात्र यावेळी जोर करील. **महिलांस :** हाती घेतलेले काम अपुरे राहील. प्रवासात अडथळे. घरात भांडणं. नोकरीत त्रास. ◻

**तूळ : आकांक्षांना उत्तेजन**

आजच्या आघाडीवरील राशीत तुमची रास ' विन 'ला आहे. गुरू शनीचा त्रिकोण, गुरू हर्शलचा शुभ योग असे ग्रहमान तुम्हाला आहे. त्यामुळे पाऊल पुढेच पडत आहे. इच्छा पुऱ्या होत आहेत मन उत्तेजीत होत आहे. या आठवडयाची सुरुवात मिथुनेच्या भाग्यस्थ चंद्राने होत आहे त्यामुळे तुमच्या भाग्यचक्राची चाके यश आणि सफलता या दिशेने घोडदौड करणार आहेत. कुठे अडखळ नाही कुठे अडचण नाही. तुम्ही आजवर उराशी बाळगलेल्या आकांक्षा सफल होऊ लागतील. योग्य क्षेत्र मिळेल. आर्थिक व इतर सहकार्य मिळेल. नोकरीधंद्याची परिस्थिती सुधारेल. व्यापार व उद्योगात प्रगतीला वेग येईल. दुरावलेले मित्र पुन्हा सहकार्यासाठी हात देतील. पत्नीच्या कलागुणांनी मन प्रसन्न होईल. आर्थिक बाजू जरी हवी तेवढी भक्कम नसली तरी गरजेपुरता पैसा उपलब्ध होईल. नोकरीत बदल होईल. **महिलांस :** संसार आणि सार्वजनिक कार्य या दोन्ही ठिकाणी मनासारखे घडेल. आनंद मिळेल. ◻

**वृश्चिक : आर्थिक घसरगुंडी**

हर्शलसारख्या अद्भूत ग्रहाचे व्ययस्थानी आगमन झाले त्याचवेळी पैसा व खर्च यावरचा तुमचा ताबा उडून गेला आहे. तुमचा स्वभाव संतापी, अतिरेकी आहे. संयमाचे वावडे आहे. म्हणूनच या आठवडयात शनिवार ते सोमवार चांगल्या मित्राच्या सहवासात राहा. काही झाले तरी अपमान शमविण्यासाठी 'मदिरा व मदिराक्षीचा' पडणारा मोह टाळा. बुधवार ते शुक्रवार या दिवशीच कर्जाची कामे होतील. बँक अगर इतर संस्थेकडून उद्योगासाठी आर्थिक मदत मिळवण्याचे प्रयत्न सुरू असतील तर ते पुरे होतील. स्वतःचे घर होईल. सर्वसामान्य लोकांचा जागेचा प्रश्न सुटेल. नोकरीत तसे वाईट नसले तरी वरिष्ठाबरोबर नम्रतेने वागा. त्यामुळे फायदा होईल. अकल्पित धनलाभाच्या भानगडीत पडू नका. **महिलांस :** नवरोबांच्या तापट स्वभावाने दुरुत्तरे करू नका. नोकरीदार महिलांना उत्तम दिवस आहेत. ◻

**धनू : व्यावसायिक ताण**

तिसरा गुरू जरी उत्तम असला तरी बारावा राहू व सप्तमस्थानी शनी मंगळाचे तांडवनृत्य तुम्हाला कोणतेच समाधान मिळू देणार नाहीत. नवविवाहित तरुणांना अगर प्रेमिकांना शनिवार ते बुधवार शुभदायक आहेत. त्यांच्या मनासारखे काही तरी घडू शकेल. पण सर्वसामान्यपणे आठवडा थोडा फार गर्दीचा ताण वाढवणारा आहे. नोकरीत तुम्ही वरिष्ठ जागेवर असाल तर हाताखालचे लोक तुमच्यावर नाराज असतील. अविचाराने आपण घेतलेले निर्णय नुकसानीकारक ठरतील. हातून चुकादेखील होतील. लेखनात मात्र प्रगतीकारक घटना घडतील वाङमयाला मागणी येईल. अपुरे लेखन पुरे होईल. व्यवसायात श्रीमंत धनिकांचे आश्वासन मिळेल. तब्येतीला मात्र जपावे. **महिलांस :** रक्तदाब व डोकेदुखी असेल त्यांनी जपावे. नोकरीत बढती. ◻

**मकर : लॉटरीत लाभ**

तुमच्या भोवती झालेली कोंडी आता फुटलेली आहे व आता अनेक महत्त्वाचे ग्रह तुम्हाला सहकार्य देण्याचा पवित्रा घेऊन उभे आहेत. अतिश्रमाने मधूनमधून जरी थकल्यासारखे वाटले तरी देखील तुमची प्रतिष्ठा, दर्जा, कर्तृत्वाचे तेज वाढवणारा हा काळ आहे. यावेळी तुमच्याकडे नव्या नव्या संधीच्या लाटा येणार असून तुम्ही नको म्हटले तरी त्याचा स्पर्श तुम्हाला होईलच. प्रामुख्याने आर्थिकदृष्टया अत्यंत भरभराट करणारा असा हा काळ आहे. नोकरीची स्थिती सुधारणार आहे. कामाचा ताण कमी होईल. इंजिनियर व वाणिज्य पदवीधर नोकरीचे मानकरी ठरतील. इमारतीचे बांधकाम, पूल, कारखाने इत्यादी क्षेत्रात वावरणारे इंजिनियर लोकप्रिय ठरतील. यावेळी गुरुवार व शुक्रवार हे दिवस महत्त्वाचे आहेत. तुमच्या मनातील कल्पनेला, ठरलेल्या उद्देशाला चालना देणारे आहेत. राजकारणात तुम्ही पुन्हा मुसंडी मारू शकाल. **महिलांस :** कलाक्षेत्राशी संबंध येईल. तरुणींना सिनेमात प्रवेश मिळेल. इच्छा पुरी होईल. ◻

**कुंभ : उच्चपदाचा लाभ**

कुंभ राशीच्या व्यक्तींना या आठवडयात मोठ महत्त्वाचे स्थान लाभणार आहे. याच व्यक्ती या आठवडयात सर्व क्षेत्रात आघाडीवर गाजतील. क्षेत्र कोणतेही असो ह्या व्यक्तींचे नाव यश व कीर्ती यांचा सुगंध दरवळून टाकील. व्यापारी क्षेत्रात तुम्ही असाल तर सरकारी उद्योगात तुमचा खास सल्ला घेतला जाईल. तुमचा स्वतःचा कोणताही उद्योग असो त्याच्या वाढीच्या अनेक योजना दृष्टिपथात तर काही प्रत्यक्षात येऊ शकतील. एखादा नवा धंदा सुरू होईल. परिस्थितीप्रमाणे त्याला परदेशी भांडवलदाराचे सहकार्य मिळू शकेल. नोकरीत बरे दिवस येत आहेत. शनिवार ते गुरुवार इच्छापूर्तीचा काळ आहे. प्रमोशन मिळणार आहे. मालक वा वरिष्ठ अधिकारी खूश राहातील. स्वभाव गोड ठेवा. काम होईल. राजकारणात तुमचे स्थान पक्के होईल. उच्च पदाचा लाभदेखील होण्याची शक्यता आहे. पैशाचे व्यवहार व्यवस्थित पार पडतील. स्त्री सहवास घडेल. **महिलांस :** कापड उद्योगात भाग घ्या. भरभराट होईल. नोकरीपेक्षा उद्योग करा. ◻

**मीन : अविचाराला थारा नको**

तुमच्या राशीचा स्वामी आहे गुरू व तोच येऊन बसला आहे व्ययस्थानी. विचार व बुद्धीचे नियंत्रण हा गुरू करतो. बाराव्या गुरूमुळे आपली बुद्धी स्थिर राहात नाही, विचाराचे नाते राहात नाही. बरे काय व वाईट काय, मित्र कोण व शत्रू कोण याचा विवेक राहात नाही. सध्या याच मनःस्थितीत तुम्ही आहात. तशातच पहिले तीन दिवस चंद्राची कृपा नाही तर शनी-मंगळाने स्वास्थ्यच हरवून टाकले आहे. वृद्ध मातोश्रीला यावेळी जपले पाहिजे. तुम्ही भाडेकरू असा वा घरमालक असा, जागेसंबंधीची कोणती ना कोणती डोकेदुखी निर्माण होईल. वीज, पाणी, आग, अपघात याचा त्रास संभवतो. आपण निराश होऊ नका. यातून परमेश्वरी कृपा तुम्हाला अभय देईल. रात्री दत्ताचे ध्यान करा. सकाळी गुरुचरित्र वाचा. सोमवारी नोकरीत अनपेक्षित त्रास होईल. महत्त्वाचा कागदच सापडणार नाही. पैसा मिळेल. **महिलांस :** प्रवासाचा बेत तूर्त आखू नका. लेखिकांचे लेखन 'साभार परत' येईल. ◻ ◻

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

## □ कुमार गंधर्व आणि माझा शाडूचा कान

पुण्या-मुंबईला कुमारची (म्हणजे कुमार गंधर्वांची) मैफिल असली की मला तिकडे हजेरी लावावीच लागते. हजेरी लावली नाही तर लोक विचारतील याचे भय वाटते. त्यामुळे सगळ्या लोकांच्या डोळ्यांच्या मस्टरवरती मी काळजीपूर्वक सही गिरवतो. मग मला बरे वाटते. लोकांनाही बरे वाटते. सरतेशेवटी, अधिकात अधिक लोकांना अधिकात अधिक बरे वाटावे यासाठी तर आपली धडपड चाललेली असते. निदान चालायला हवी. असो.

खरे म्हणजे गाण्यातले काही म्हटल्या काही मला समजत नाही आणि उमजत पण नाही. काही लोकांना गाणे उमजते. काही लोकांना ते समजते आणि उमजते. नाडकर्ण्यांच्या त्या ज्ञानेश्वराला संगीत, नृत्य, साहित्य, नाट्य, शिल्प, चित्र, खाद्य, पेय, अर्थ(शास्त्र)– सारे आपले कसे सहजासहजी उमजते. पण आपल्याला जे जे उमजते ते काही आपण लगेच सांगत सुटत नाही. नाडकर्ण्यांच्या ज्ञानेश्वराचे तसे नाही. आपल्याला जे जे उमजते ते जर आपण 'झरोक्या'तून सांगत सुटलो नाही तर खुद्द आपणच सुटू (आणि मग आपल्याला मल्लखांब करावा लागेल.) अशी धास्ती त्याला वाटते. गाण्यातले तसे आणखीही कशा कशातले मला काही समजतउमजत नाही. पण आता गाण्याचा विषय चाललेला असल्यामुळे बाकीच्या गोष्टींबद्दल बोलणे मला अत्यंत अयोग्य वाटते. विषयांतराचा मला तिटकारा आहे.

तर सांगायचा मुद्दा असा की गाण्यातले मला काही कळत नाही. बैठकात ऐकलेल्या रागांपेक्षा प्यायलेली कॉफी मला अधिक सुखावते, आणि कुमारपेक्षा श्रोतृवृंदातल्या सुकुमार ललना मला अधिक आकर्षक वाटतात. गाणे सुरू होताना, चालू असताना आणि संपताना मी घड्याळाकडे पाहतो आणि आजचे कुमारचे गाणे जवळजवळ तीन तासांचे, तीन तास आणि अडतीस मिनिटांचे, तब्बल चार तासांचे, झाले असा समयसूचक व समयोचित अभिप्राय व्यक्त करतो.

अभिप्रायावरून आठवले. कुमारचे गाणे मला ओ की ठो कळत नसले तरी चलाख आणि सुळसुळीत अभिप्राय देऊन मी आपले अज्ञान नीट झाकून ठेऊ शकतो. उदाहरणार्थ, कोणीतरी मला आवर्जून विचारते, 'काय, कसा वाटला आजचा मालकंस ?' मी बेताबेताने सांगतो, 'बोलू नका यार. मोठा मजा येऊन राहिला आहे.' 'कुमारचे गाणे ऐकताना, एखादा मोर आपला पाचूपिसारा उभारून आत्ममग्न होऊन नाचतो आहे असे वाटते. एखाद्या माहेरी आलेल्या नवविवाहित मुलीचे विभ्रम आणि कुमारचे सूरविभ्रम सारखेच. कुमारचे गाणे म्हणजे मधाची धार, बकुळीचा गजरा, गाभाऱ्यातली दीपज्योती, निळ्या आकाशातली बगळ्यांची पांढरी माळ, कुमारचे गाणे म्हणजे हे आणि कुमारचे गाणे म्हणजे ते' अशी काव्यात्मक वर्णने करण्यात मी पटाईत आहे. त्यामुळे माझ्या जाणकारीचा टपोर बुडबुडा टिकून आहे.

कळत नसूनही कुमारच्या गाण्याला मी आवर्जून जातो, कारण कुमारच्या गाण्याला जाणे हा आजच्या रसिकतेचा एक शिष्टसंकेत मी निग्रहाने पाळतो. त्याकरता मला चायनीज फूड आवडते, एक्झिस्टेन्शिॲलिझम आणि बांधिलकी या दोन्ही गोष्टींबद्दल मी आस्था दाखवतो, दारूबद्दल मी उमटपणे बोलतो. कॉंटिनेंटल आणि जॅपेनीज चित्रपट हाराकिरी करू पहातो.

कुमार गंधर्वांना नुकतीच पन्नास वर्षे पुरी झाली. त्यांचे अभिनंदन करण्याच्या निमित्ताने आमची चलाखी प्रामाणिकपणे तुम्हाला सांगितली. माझा कान शाडूचा आहे की काय, कोण जाणे. कुमार गंधर्वांनासुद्धा तो 'धरता आलेला' नाही, पण कुमार गंधर्वांच्या नावाने आपले आपण कान पकडणारे शेकडो समजउमजदार सच्चे शौकिन आहेत हे मला ठाऊक आहे.

—अनंतराव

